रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९▌अंक २४७ ▌पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28


## हिंदुरावांच्या दाव्याने खळबळ

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर विविध आरोप-शंका उपस्थित होत आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांनी थेट प्रफुल्ल पटेल यांचे नाव घेत, मंत्रालयातील एका फाईलवर सही करण्यास उशीर झाल्यामुळे अजित पवार यांना नियोजित कारप्रवासाऐवजी विमानाने जावे लागले आणि त्याच विमानाचा अपघात झाल्याचा दावा केला आहे. दरम्यान, याआधीच रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत कोणाचेही नाव न घेता अशाच आशयाचे संकेत दिले होते. मात्र, हिंदुराव यांच्या वक्तव्यातून प्रफुल्ल पटेल यांचे नाव समोर आल्याने खळबळ उडाली आहे.


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹


## महामार्गाबाबत पुन्हा डेटलाईन

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय महामार्ग ६६ अंतर्गत मुंबई (पनवेल) ते गोवा/महाराष्ट्र सीमा असा सुमारे ४८५ किमीचा चारपदरी मार्ग जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत दिली. काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांच्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, डिसेंबर २०११ पासून १२ पॅकेजमध्ये सुरू असलेल्या या प्रकल्पातील ४६५ किमी काम पूर्ण झाले असून, उर्वरित २० किमीवर काम सुरू आहे. जमिनीच्या अडचणी, मंजुरींतील विलंब आणि काही कंत्राटदारांची संथ गती यामुळे प्रकल्प लांबला, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**वे|ध|क**

## लाचखोर सहाय्यक अधीक्षकास अटक

**नवी मुंबई :** सुदाम लोटन चव्हाण (५७), सहाय्यक अधीक्षक व शाखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय कार्यालय, वाशी, नवी मुंबई यांना आठ हजारांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. तक्रारदार हे खासगी शिक्षक (जिनियस लर्निंग सेंटर) असून, त्यांच्या विद्यार्थ्यास 'अध्ययन अक्षमता' असल्याने फेब्रुवारी २०२६ च्या एस.एस.सी. परीक्षेसाठी लेखनिक (रायटर) मिळावा यासाठी अर्ज करण्यात आला होता. •> पान २ वर

## विद्यार्थ्यांचे 'अपार' रखडले

**अलिबाग :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी डिजिटल स्वरूपात उपलब्ध करण्यासाठी राज्य सरकारने अपार आयडी अनिवार्य केला आहे. रायगड जिल्ह्यात या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असून, एकूण विद्यार्थ्यांपैकी ८८.२१ टक्के विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार झाले आहेत. ही टक्केवारी राज्याच्या ८६.७८ टक्के सरासरीच्या जवळपास आहे. मात्र, आधार कार्ड नसणे किंवा त्याचे प्रमाणीकरण न झाल्यामुळे सुमारे २५ हजार ७३० विद्यार्थ्यांचे अपार आयडी अद्याप प्रलंबित असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली.

# मंत्रालयात लाचखोरी!

- मंत्री नरहरी झिरवाळांच्या दालनातील प्रकाराने खळबळ
- लिपिकाला २५ हजारांची लाच घेताना पकडले




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मंत्रालयाच्या इमारतीतच मोठी कारवाई करत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) ने राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या दालनातील लिपिकाला २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. थेट मंत्र्यांच्या कार्यालयात झालेल्या या कारवाईमुळे मंत्रालयासह राजकीय व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दरम्यान, 'चौकशीत माझ्याशी संबंध सिद्ध झाला तर मी राजीनामा देईन,' अशी स्पष्ट भूमिका झिरवाळ यांनी मांडली आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागातील लिपिक राजेंद्र ढेरंगे याने एका तक्रारदाराचा निलंबित मेडिकल परवाना पूर्ववत करण्यासाठी ५० हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार एसीबीकडे आली होती. त्यापैकी २५ हजार रुपये स्वीकारण्याचे ठरल्यावर एसीबीने सापळा रचला आणि ढेरंगे याला पैसे घेताना ताब्यात घेतले.

### इतिहासातील तिसरी मोठी कारवाई

दरम्यान, मंत्रालयात मंत्र्यांच्या दालनात एसीबीने कारवाई करण्याची ही तिसरी वेळ आहे. यापूर्वी काँग्रेस सरकारच्या काळात राजेंद्र दर्डा यांच्या कार्यालयावर अशी कारवाई झाली होती. त्यानंतर भाजपचे नेते एकनाथ खडसे महसूलमंत्री असताना त्यांच्या कार्यालयातील स्वीय सहाय्यकावर लाचखोरीप्रकरणी कारवाई झाली होती. आता नरहरी झिरवाळ हे तिसरे मंत्री ठरले असून, त्यांच्या कार्यालयात थेट एसीबीने धडक दिली आहे.

### महायुती सरकारसाठी नामुष्की

अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुती सरकारमध्ये आधीच संवेदनशील स्थितीत आहेत. त्यातच थेट मंत्र्यांच्या दालनात झालेली ही कारवाई सरकारसाठी मोठी नामुष्की ठरली आहे. काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाने याप्रकरणी मुख्यमंत्र्यांकडे झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

कारवाईनंतर एसीबी अधिकाऱ्यांनी मंत्र्यांच्या कार्यालयाचा तात्पुरता ताबा घेत तपास सुरू केला. तपास पूर्ण होईपर्यंत कार्यालयाचे कामकाज थांबवण्यात आले. प्राथमिक चर्चेनुसार, आरोपीने लाचेची मागणी करताना मंत्र्यांच्या खासगी सचिवाचे नाव वापरल्याची शक्यता व्यक्त होत आहे; मात्र याबाबत अधिकृत दुजोरा अद्याप नाही. दरम्यान, मंत्रालयातून अटक करण्यात आलेले अन्न व औषध प्रशासनाचे लिपिक राजू ढेरिंगे यांची १६ तारखेपर्यंत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. ढेरिंगे यांच्यासोबत या लाचप्रकरणात कोणा वरिष्ठांचा सहभाग आहे का? याचा तपास करायचा असल्याची माहिती एसीबीने कोर्टात दिली. त्यामुळे, १६ फेब्रुवारीपर्यंत एसीबी कोठडी सुनावण्यात आली आहे.

> या प्रकाराला मी कुठेही पाठीशी घालणार नाही. मंत्री किंवा पीए यांच्याशी त्याचा संबंध नाही. पण, चौकशीतून काही माझ्यापर्यंत आलं, तर मी राजीनामा देईन.
>
> – मंत्री नरहरी झिरवाळ

### नेमके प्रकरण काय?

एका तक्रारदाराने एसीबीशी संपर्क साधला होता. त्याचा औषधांच्या दुकानाचा परवाना निलंबित करण्यात आला होता. ही निलंबन कारवाई रद्द करण्यासाठी राजेंद्र ढेरंगे या मंत्रालयातील लिपिकाने ५० हजार रुपये लाच मागितली होती. याबाबतची तक्रार प्राप्त होताच एसीबीने पडताळणीनंतर सापळा रचला, त्यात ढेरंगे सापडले. त्यांचे कार्यालय आणि निवासस्थानी एसीबीकडून शोधाशोध सुरू आहे. ढेरंगे यांच्यावर गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. दरम्यान, एसीबीने नरहरी झिरवाळ यांचे कार्यालय सील केले आहे. या लाचेच्या व्यवहाराचे धागेदोरे नेमके कुठपर्यंत पोहोचले आहेत, याचा तपास सुरू केला आहे. अटक करण्यात आलेल्या लिपिकाने सुरुवातीच्या चौकशीत काही धक्कादायक नावे घेतल्याची चर्चा आहे. ज्यामुळे मंत्र्यांचे खासगी सचिवही संशयाच्या भोवऱ्यात असल्याचे बोललं जात आहे.

# शिक्षकांची हकालपट्टी

## सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल व्यवस्थापनाची मनमानी




**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील लोधीवली येथील सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूलमध्ये गेली तीन वर्षे सेवा देणाऱ्या पाच शिक्षकांना कोणतीही पूर्वसूचना, लेखी नोटीस किंवा चौकशी न करता सेवेतून कमी केल्याचा आरोप समोर शिक्षकांनी केला आहे. •> पान २ वर

> रुजू झाल्यापासून मुख्याध्यापक आणि व्यवस्थापनाकडून मानसिक त्रास दिला जात आहे. शाळा ख्रिश्चन समाजाची असल्यामुळे त्याच समाजातील शिक्षकांची भरती करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती आम्हाला मिळाली. आमचे पीएफही भरलेले नाही. आता दोन महिन्यांनंतर नोकरी सोडण्यास सांगितले जात आहे.
>
> – पीडित शिक्षक


> रुजू झाल्यापासून मुख्याध्यापक आणि व्यवस्थापनाकडून मानसिक त्रास दिला जात आहे. शाळा ख्रिश्चन समाजाची असल्यामुळे त्याच समाजातील शिक्षकांची भरती करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती आम्हाला मिळाली. आमचे पीएफही भरलेले नाही. आता दोन महिन्यांनंतर नोकरी सोडण्यास सांगितले जात आहे.
>
> – पीडित शिक्षक


## भरधाव रिक्षा पलटी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील दहिवाड परिसरात भरधाव वेगातील ऑटो रिक्षा पलटी होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात रिक्षाचालक सुजित सुधीर सकपाळ (२५, रा. साकडी-कुसगाव) यांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघेजण किरकोळ जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

कर्णरिसॉर्टपरिसरातूनदहिवाड गावाच्या दिशेने जात असताना रिक्षा (क्र. एमएच ४६ बीडी ८५५३) चालकाने वाहनावरील नियंत्रण गमावल्याने रिक्षा पलटी झाली. प्राथमिक माहितीनुसार, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अति वेगाने वाहन चालविल्यामुळे •> पान २ वर

# रायगडात मध्यरात्रीपर्यंत घुमणार डीजेचा आवाज

## जिल्हाधिकाऱ्यांकडून वर्षातील १५ दिवस सशर्त सूट

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या सुधारित नियमांनुसार रायगड जिल्ह्यात २०२६ सालात निवडक १५ दिवस ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरास रात्री १२ वाजेपर्यंत सशर्त सूट देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या आदेशानुसार ही मुभा सकाळी ६ ते मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार असली तरी राज्य शासनाने घोषित केलेल्या शांतता क्षेत्रांमध्ये ही सूट लागू होणार नाही.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम, •> पान २ वर

### 'या' दिवसांचा समावेश

शिवजयंती (१९ फेब्रुवारी), होळी पौर्णिमा (२ मार्च), डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल), ईद-ए-मिलाद (२६ ऑगस्ट), गणपती उत्सवातील दुसरा दिवस (१५ सप्टेंबर), गौरी विसर्जन (१९ सप्टेंबर), अनंत चतुर्दशी (२५ सप्टेंबर), साखरचौथ विसर्जन (३० सप्टेंबर), नवरात्री उत्सव (१७ ते २० ऑक्टोबर), दिवाळी लक्ष्मीपूजन (८ नोव्हेंबर), ख्रिसमस (२५ डिसेंबर) आणि ३१ डिसेंबर या दिवसांचा समावेश आहे.




# महाडकरांवर पाणीटंचाईचे संकट

## रस्ता खोदताना जलवाहिनी फुटली; लाखो लीटर पाणी वाया




**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड-रायगड मार्गाच्या रुंदीकरणाच्या कामादरम्यान करंजखोल गाव हद्दीतील नातेखिंड परिसरात नगरपालिकेची मुख्य जलवाहिनी फुटल्याने लाखो लीटर पाणी वाया गेले. हे काम करणाऱ्या अक्षय कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराकडून डोंगर खोदाई सुरू असताना ही घटना घडली. ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर घडलेल्या या प्रकारामुळे महाड शहरावर पाणीटंचाईचे संकट ओढावण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गेल्या पाच वर्षांपासून संथ गतीने सुरू असलेल्या महाड-रायगड मार्ग रुंदीकरण प्रकल्पाच्या अखेरच्या टप्प्यात, नातेखिंड, करंजखोल येथे खिंड फोडून रस्ता रुंद करण्याचे काम सुरू आहे. या ठिकाणी कोथर्डे येथून येणारी महाड नगरपालिकेची सुमारे ६०० मिमी व्यासाची लोखंडी जलवाहिनी रस्त्यालगत आहे. संबंधित जलवाहिनी आधी सुरक्षितपणे हटविणे किंवा संरक्षित करणे आवश्यक असतानाही खोदाईला सुरुवात करण्यात आल्याचा आरोप होत आहे. खोदाईदरम्यान मोठे दगड जलवाहिनीवर कोसळल्याने एअर व्हॉल्व्ह फुटला आणि मोठ्या प्रमाणात पाणी वाहून गेले.

महामार्ग विभागाच्या म्हणण्यानुसार, जलवाहिनी हटविण्याबाबत नगरपालिकेशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र नगरपालिका प्रशासनाने ती हटविण्याऐवजी सिमेंट जॅकेटिंग करून सुरक्षित करण्याची भूमिका घेतली होती. अनेक महिने जॅकेटिंग न झाल्याने काम रखडले होते. याप्रकरणी विचारणा केल्यावर महामार्ग विभागाच्या सहाय्यक कार्यकारी अभियंता अक्षरा डहाके जगताप यांनी सांगितले की, नगरपालिकेने जलवाहिनीचे जॅकेटिंग केल्याचे कळवल्यानंतरच खुदाईला सुरुवात करण्यात आली. त्यामुळे नुकसानीची जबाबदारी नगरपालिकेची आहे.

दरम्यान, नागरिकांकडून वेगळेच प्रश्न उपस्थित केले जात आहेत. जलवाहिनी असलेल्या पूर्वेकडील भागात आधी खुदाई का करण्यात आली? पश्चिमेकडील बाजूने काम सुरू केले असते, तर रुंदीकरणासाठी अतिरिक्त जागा उपलब्ध होऊन जलवाहिनी सुरक्षितपणे हलवता आली असती, असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. तसेच नियोजितपेक्षा कमी रुंदीकरण होत असल्याचीही चर्चा आहे. महामार्ग विभाग आणि नगरपालिका यांच्यातील जबाबदारीच्या वादात मात्र महाडकरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# खोपोलीत रोजगार मेळाव्याला प्रतिसाद



## जिल्हा कौशल्य विकास केंद्राचा उपक्रम

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित बेरोजगार तरूणांना खासगी औद्योगिक क्षेत्रात नोकरीची संधी मिळवून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकतामार्गदर्शनकेंद्राच्यावतीने खोपोलीत केटीएसपी मंडळाच्या बी.एल. पाटील तंत्रनिकेतन कॉलेजमध्ये ११ फेब्रुवारी रोजी पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा भरविण्यात आला होता. या मेळाव्यात खालापूर तालुक्यातील नामांकित कंपन्यांनी सहभागी झाल्या होत्या. तरूणांच्या मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांची थेट नियुक्ती करण्यात आल्याचे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार यांनी सांगितले.

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या बी.एल. पाटील तंत्रनिकेतन कॉलेजच्या सभागृहात रोजगार मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्याच्या प्रारंभ सरस्वती पूजन करून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर, बी.एल. पाटील तंत्रनिकेतनचे गव्हर्नर राजू ठक्कर, संचालक भास्कर लांडगे, प्रा. प्रशांत माने, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार यांच्यासह सर्व कंपन्यांचे अधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते.

पारख फुड्स अँड ऑईल लिमिटेड, अल्टा लुबरीट्रीज सॅनो स्पेशल स्टील, वर्टसीला इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, इर्मॅजिका वर्ल्ड एंटरटेनमेंट, एल अँड टी कन्स्ट्रक्शन स्किल्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, प्रसोल केमिकल्स, पतंजली फुड्स, हुतामाकी,जे. एस.डब्ल्यू लि, टाटा स्टील लिमिटेड १९ कंपन्यासाठी ६१४ रिक्त जागा भरण्यासाठी मुलाखती घेण्यात आल्या.

आयुष्यात आपल्याला काहीतरी बनायचं त्यासाठी मिळालेल्या संधीच सोनं करा, असे मत बी.एल. पाटील तंत्रनिकेतन कॉलेजचे प्रा. प्रशांत माने यांनी व्यक्त करीत रोजगार मेळावा कॉलेजमध्ये आयोजित केल्याबद्दल आभार व्यक्त केले.

# निवडक

## रेल्वे स्टेशनबाहेरून दुचाकी चोरी

**नेरळ :** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत नेरळ रेल्वे स्टेशन परिसरातून दिवसाढवळ्या वाहनचोरीची घटना घडली. स्टेशनबाहेर उभी केलेली सुमारे ४० हजार रुपये किमतीची बजाज मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. मालक परत आल्यानंतर वाहन गायब असल्याचे दिसून आले. परिसरात शोध घेऊनही वाहनाचा तपास लागला नाही. या घटनेची माहिती नेरळ पोलिसांना देण्यात आल्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. जवळील दुकानदारांची चौकशी करण्यात आली. पार्किंग व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

## घरफोडीत रोकड, चांदीचे दागिने लंपास

**म्हसळा :** म्हसळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सकलपकोंड येथे रात्रीच्या वेळी घरफोडीची घटना उघडकीस आली. अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातील साहित्य अस्ताव्यस्त करून कपाटातील रोकड व चांदीचे दागिने चोरून नेले. सकाळी प्रकार लक्षात येताच कुटुंबियांनी पोलिसांत धाव घेतली. परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. शेजाऱ्यांची चौकशी करण्यात आली. चोरीस गेलेल्या वस्तूंची यादी तयार करण्यात येत आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## पाईपलाइन वादातून दांडक्याने मारहाण

अलिबाग : पोयनाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाण्याच्या पाइपलाइनच्या कामावरून सुरू असलेला वाद अचानक हिंसक झाला. चर्चा सुरू असताना आरोपीने हातातील फावड्याच्या दांडक्याने फिर्यादीच्या डोक्यात मारहाण केली. जखमी खाली कोसळल्याने नागरिकांनी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. काही काळ परिसरात तणावाचे वातावरण होते. जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले जात आहेत.

## एस.टी. बस व कारची समोरासमोर धडक

**अलिबाग :** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत चौककर्जत मार्गावरील वळणावर एस.टी. बस व कारची समोरासमोर धडक झाली. अपघातात कारमधील दोघेजण जखमी झाले असून, दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना उपचारासाठी हलविण्यात आले. क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात आली. पोलिसांच्या मदतीने वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## महिलेसमोर अश्लील हातवारे

**अलिबाग :** खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंगणात एकटी असलेल्या महिलेसमोर शेजारील आरोपीने अश्लील हातवारे केले. महिलेने घाबरून घरात जाऊन दरवाजा बंद केला. तरीही आरोपी दरवाजा ठोठावत आत घुसण्याचा प्रयत्न करत होता. या घटनेचा महिलेला मानसिक धक्का बसला आहे. शेजाऱ्यांनी आवाज ऐकून धाव घेतल्याने आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांनी गुन्हा नोंद करून आरोपीचा शोध सुरू केला आहे. परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते. दरम्यान, आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांकडून विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

# पनवेलमध्ये नोटाला ७ हजार २०१ मते

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पनवेल तालुक्यातून नोटाला ७ हजार २०१ मते मिळाली आहेत. यातील ३ हजार ५५३ मते जिल्हा परिषदेला तर ३ हजार ६४८ मते पनवेल पंचायत समितीला मिळाली.

जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समितीची निवडणूक सात फेब्रुवारी रोजी पार पडली. तर ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी पनवेल शहरातील व्हीके हायस्कूल येथील मतमोजणी केंद्रात पार पडली. यावेळी भाजपने शेकाप महाविकास आघाडीचा धुव्वा उडवत एकहाती सत्ता प्रस्थापित केली. यावेळी नागरिकांनी नोटालादेखील आपली पसंती दिली आहे. जिल्हा परिषदेच्या आठ मतदार संघातून वडघर मध्ये नोटाला सर्वाधिक ६५० मते मिळाली, तर सर्वात कमी वावेघर मतदार संघात २९६ मते मिळाली. पंचायत समितीच्या करंजाडे गणात नोटाला सर्वाधिक ४८२ मते मिळाली. तर सर्वात कमी वावंजे गटात नोटाला ९३ मते मिळाली. नोटाला पसंती देणारांना उभे असलेल्या उमेदवारांपैकी एकही योग्य वाटला नाही. त्यामुळे त्यांनी नोटाचे बटण दाबले आकडेवारीतून दिसून आले आहे.

# अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवले

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत मधुबाग बसस्टॉपवरून अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने फुसलावून नेल्याची घटना घडली. याबाबत तिच्या कुटुंबियांनी तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. साक्षीदारांचा शोध घेण्यात येत आहे. मुलीच्या शोधासाठी विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पान १ वरून

## शिक्षकांची हकालपट्टी

४ फेब्रुवारी रोजी मुख्याध्यापिका व शाळा व्यवस्थापन समितीने हा निर्णय घेतल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. या घटनेमुळे स्थानिक शैक्षणिक वर्तुळात नाराजी व्यक्त होत आहे.शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, रुजू झाल्यापासून त्यांना सातत्याने मानसिक त्रास दिला जात होता. 'मराठी शिक्षक नको' अशा भूमिकेतून जाणीवपूर्वक कमी लेखणे, कोणतीही अधिकृत कागदपत्रे न देणे आणि आता अचानक सेवेतून कमी करणे हा अन्याय असल्याचे त्यांनी सांगितले. तीन वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावूनही अशी वागणूक मिळाल्याने शिक्षकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, मुख्याध्यापकांनी शिक्षकांना 'दोन महिने शाळेला सेवा द्या, त्यानंतर दुसरी नोकरी शोधा' असे सांगितल्याचा दावा शिक्षकांनी केला आहे. तसेच पीएफची रक्कमही जमा करण्यात आलेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या सर्व आरोप-प्रत्यारोपांमुळे प्रकरणाची अधिकृत चौकशी होण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे.

शिक्षकांची नियुक्ती कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने केली जाते. ती कायमस्वरूपी नसते. तीन वर्षांनंतर त्यांना दुसरी नोकरी शोधण्यास सांगितले जाते. हा निर्णय शाळा व्यवस्थापन समितीचा असतो.

– सिसिल्यम्मा सेबॅस्टियन, मुख्याध्यापिका

## भरधाव रिक्षा पलटी

हा अपघात घडल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. अपघातात रिक्षाचेही मोठे नुकसान झाले.

जखमींमध्ये फिर्यादीसह अनिकेत शशिकांत धयाळकर (२४), रोहिणी हिरामण धयाळकर आणि अंतरा शशिकांत धयाळकर (रा. नांदगाव, ता. महाड) यांचा समावेश आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. मृतदेह शवविच्छेदनासाठी महाड ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महाड एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

## रायगडात मध्यरात्रीपर्यंत घुमणार डीजेचा आवाज

२०१७ नुसार जिल्ह्याच्या गरजेनुसार वर्षातील १५ दिवस ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरास सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. या अधिकाराचा वापर करत रायगडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी १ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत निवडक १५ दिवसांसाठी ही सूट जाहीर करणारी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. या आदेशानुसार श्रोत्यांसाठी असलेली बंदिस्त ठिकाणे जसे श्रोतृगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष वगळता इतर सर्व ठिकाणी ध्वनीची निर्धारित मर्यादा पाळून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्यास परवानगी राहणार आहे. सूट देण्यात आलेल्या दिवसांमध्ये शिवजयंती (१९ फेब्रुवारी), होळी पौर्णिमा (२ मार्च), डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल), ईद-ए-मिलाद (२६ ऑगस्ट), गणपती उत्सवातील दुसरा दिवस (१५ सप्टेंबर), गौरी विसर्जन (१९ सप्टेंबर), अनंत चतुर्दशी (२५ सप्टेंबर), साखरचौथ विसर्जन (३० सप्टेंबर), नवरात्री उत्सव (१७ ते २० ऑक्टोबर), दिवाळी लक्ष्मीपूजन (८ नोव्हेंबर), ख्रिसमस (२५ डिसेंबर) आणि ३१ डिसेंबर या दिवसांचा समावेश आहे. दरम्यान, राज्य शासनाने घोषित केलेल्या शांतता क्षेत्रांमध्ये ही सूट लागू राहणार नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या कलम १९ (अ) अन्वये संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

## ...अधीक्षकास अटक

विद्यार्थ्यांच्या आईने तक्रारदार यांना अधिकृत पत्र देऊन पुढील कार्यवाही करण्यास सांगितले होते. सदर लोकसेवकाने विद्यार्थ्यास लेखनिक देणे तसेच परीक्षेचे विषय बदलून देण्यासाठी रु. १०,०००/- रुपयांच्या लाचेची मागणी केली. तक्रारीनंतर पडताळणीत मागणी सिद्ध झाली. तडजोडीनंतर रु. ८,०००/- स्वीकारण्याचे मान्य करण्यात आले. शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी सापळा रचून शासकीय पंचासमक्ष आरोपीने रु. ८,०००/- (रु. ५०० च्या १६ नोटा) स्वीकारताच दुपारी १२.४६ वा. त्यास रंगेहाथ पकडण्यात आले. पुढील गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरू आहे. ही कारवाई धर्मराज सोनके, पोलीस उपअधीक्षक, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# महाशिवरात्रीनिमित्त अखंड भजनांचा गजर

## कमळ नागरी पतसंस्थेचा पुढाकारातून कार्यक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग यांच्या वतीने सालाबादप्रमाणे महाशिवरात्रीनिमित्त अखंड भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हा भजन सोहळा रंगणार आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण काशीविश्वेश्वर मंदिर, अलिबाग शेजारी असून, भजनांच्या गजराने परिसर दुमदुमून जाणार आहे. भजनप्रेमींसाठी हा दिवस एक प्रकारे आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे. या उपक्रमाचे यंदाचे हे सलग दहावे वर्ष आहे. नामांकित भजनी मंडळींसह स्थानिक भजन गटही या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. भक्तिमय वातावरणात अखंड नामस्मरण आणि भजनांचा सुरेल संगम अनुभवण्याची संधी यानिमित्त उपलब्ध होणार आहे. सर्व भजनप्रेमींनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कोकणातील अग्रगण्य पतसंस्था म्हणून ओळख असलेली कमळ नागरी सहकारी पतसंस्था गेली ३४ वर्षे बँकिंग क्षेत्रात सातत्याने प्रगती करत आहे. चालू आर्थिक वर्षात एकत्रित व्यवसायाचा १००० कोटींचा टप्पा गाठण्याचा संस्थेचा मानस आहे. आर्थिक क्षेत्रापुरते कार्य मर्यादित न ठेवता गोशाळा, डायलिसिस सेंटर, पोळी-भाजी केंद्र, रक्तदान शिबिरे, शैक्षणिक सहाय्य आणि धार्मिक उपक्रम अशा विविध सामाजिक क्षेत्रांतही संस्थेचा सहभाग उल्लेखनीय आहे. भजनी परंपरा जपण्यासाठी आणि भजन मंडळींना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम दरवर्षी सातत्याने राबविला जात असून, यंदाही मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम पार पडणार आहे.

## जुन्या वादातून लोखंडी रॉडने हल्ला

**अलिबाग :** अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुन्या वादाच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीवर लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी हल्ला केला. शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. जखमी व्यक्तीवर सध्या उपचार सुरू आहेत. घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला. पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. साक्षीदारांचे जबाब घेतले जात आहेत.



### शुध्दीपत्रक

माझे अशिल श्री. रोहन अजित ताम्हाणे आणि श्री. अजित ताम्हाणे, तर्फे मे. ताम्हाणे आणि कं. ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर्स यांच्यावतीने मी दिनांक १३.०२.२०२६ रोजी दै. कृषीवल मध्ये जाहिरात दिली होती, त्यात परिच्छेद क्रं.३ मध्ये माझे प्रत्युत्तर हे चुकून दिनांक २०.०१.२०२६ रोजी दिले आहे असे आले आहे. सदरचे प्रत्युत्तर हे 'दिनांक ३१.०१.२०२६' रोजी दिले आहे.

सर्व संबंधितांनी सदरची चूक वरील दुरुस्तीप्रमाणे दिनांक १३.०२.२०२६ ची जाहिर नोटीस वाचावी.

दिनांक १४ फेब्रुवारी,२०२६

**(संदिप सूर्यवंशी)**
सी-४, श्री वक्रतुंड कॉ. ऑप. हौ. सोसा.,
प्लॉट क्रं.५६५, सेक्टर क्रं.५, चारकोप,
कांदिवली - पश्चिम, मुंबई - ४०० ०६७ .

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे-बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ मीटर | रुपये | पैसे |
| मंगल विलास आगिवले | २२ | २ | ०-६२-५० | ० | ९० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सही/-
**ॲड. अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- १४/०२/२०२६
मो. नं. ९९२२३६८१२१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीनें कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती. रिमा रविंद्र वगळ, रा. गिरगांव, मुंबई, महाराष्ट्र यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. याबाबत विद्यमान मालकांनी माझे अशिलांसोबत साठेकरार केलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | जुना ग.नं. | क्षेत्र (चौ.मी) बिनशेती | आकार (रु. पे) |
|---|---|---|---|---|
| किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड | २०६/२/२ | ६०४/ब/२ | ३-०३-०० | ३०.३० |

वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहित असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. तरीही वर नमूद मिळकतीत कोणाचाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, चार्ज, पोटगी, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात बाद प्रलंबित असल्यास अथवा अन्य कोणताही दंगदावा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेकरीता खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाच्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १३/०२/२०२६

**ॲड. विजय वि. पाटील,**
ॲकॉन्स एन्क्लेव्ह, फ्लॅट नं. १०४,
पहिला मजला, डॉ. पुष्पलता शिंदे
हॉस्पिटल समोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९७६७५२८८८०

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. रघुनाथ पोसू पाटील, रा. मु.पो. चिंचोटी,ता. अलिबाग, जि. रायगड २) श्रीमती सविता विश्वनाथ पाटील, रा. आंदोशी, मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड ३) श्रीमती रेवती रघुनाथ शेळके रा. घरनं. १७८४, सराई सोमेश्वर मंदिरा जवळ, चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| महाजने ता. अलिबाग | ३८३ | ०-६८-६० पो. ख. ०-०८-४० ०-७७-०० | १५.८८ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १३-०२-२०२६.

**ॲड. प्रदिप गो. तांडेल**
ओम निवास श्री. स्वामी समर्थ नगर,
पिंपळभाट चेंढरे अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

### अलिबाग येथिल मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो यांच्या न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज १३२/२०२५
नि.क्र १४/ड

सौ.सीमा केदार ओक — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

**दुरुस्त जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, अर्जदार हिचे वडील कै. कलाक्कुनाथ मोहनदास दिनांक २०/०८/२०२० रोजी मौजे - आश्विनी हॉस्पिटल, चौल नाका ता.अलिबाग, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार हिची आई कै. के. विजया मोहनदास दिनांक १९/०२/२०२१ रोजी मौजे रिलायन्स हॉस्पिटल, कोपरखैरणे रेल्वे स्टेशन च्या बाजूला, एम आय डी सी, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. असून त्यांस अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत .

कै.कलाक्कुनाथ मोहनदास व कै. के. विजया मोहनदास यांचे वारस म्हणून दाखला मिळावा याकरिता अर्जदार यांनी या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांना कै. कलाक्कुनाथ मोहनदास व कै. के. विजया मोहनदास यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा दि. १२/३/२०२६ पर्यंत स्वत: किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचाही कसलाही प्रकारची हरकत न असल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे कै के. कलाक्कुनाथ मोहनदास व कै. के. विजया मोहनदास यांचे वारस म्हणून वारस दाखला देणेस कोणत्यही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येऊन मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकुम अर्जदार यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोद घ्यावी.

आज दि. १३/माह, ०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
(लिपिक)
दिवाणी न्यायाधीश
व. स्तर अलिबाग

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व. स्तर अलिबाग

## निवडक



### निर्मला घरत यांचा केला सन्मान

**पनवेल** : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे निकाल नुकतेच लागले. त्यात उरण पंचायत समितीवर महाविकास आघाडीने बाजी मारली. महाविकास आघाडीच्या माध्यमातून उरण तालुक्यातील जासई गणातून पंचायत समितीवर विजयी झालेल्या शेकापच्या निर्मला नरेश घरत यांनी शुक्रवारी (दि.१३) सुखकर्तावर महेंद्र घरत यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी त्यांचे पुष्पगुच्छ, शाल देऊन सन्मान केला आणि पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यकर्त्यांसोबत त्यांनी संवाद साधला.यावेळी महेंद्र घरत म्हणाले, महाविकास आघाडीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी मनापासून मेहनत घेतली. उरणमध्ये सर्वसामान्य जनता आपल्या मागे आहे. त्यामुळे उरणमध्ये आपली सत्ता आली आहे. यावेळी उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत, उरण तालुका शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस रवी घरत, जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत, गव्हाणचे माजी उपसरपंच सचिन घरत, जासई ग्रामपंचायत सदस्य आदित्य घरत, जासई काँग्रेस अध्यक्ष रमेश पाटील, माणिकशेठ घरत, दत्तात्रय घरत आदी उपस्थित होते.

### सहा लाखांची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल ग्रामीण** : मोबाईल हॅक करून बँकेच्या अकाउंटमधून सहा लाख ६१ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाता विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात आठ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अविनाश शिंदे हे कामोठे, सेक्टर ३५ येथे राहत असून त्यांना एका मोबाईल क्रमांकवरून बँकेची एपीके फाईल आली. ती फाईल ऑटो डाउनलोड झाली. त्यानंतर अकाउंट वरून पैसे काढण्याचा मेसेज आला. त्यांनी कस्टमर केअरला फोन केला. मात्र प्रोसेस होईपर्यंत त्यांचा मोबाईल हॅक झाला आणि मोबाईलमधून सहा लाख ६१ हजार रुपये रक्कम अकाउंटवरून काढली गेली.

### मोहोपाडा रसायनीत कवी संमेलन

**रसायनी** : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मोहोपाडा रसायनी शाखेतर्फे मार्चच्या शेवटच्या आठवड्यात कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. खालापूर तालुक्यातील कवींनी कवी संमेलनात सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मोहोपाडा रसायनी शाखेतर्फे करण्यात आले आहे. कविता ही स्वरचित असावी.अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक आशयाच्या कविता असाव्यात.कविता १२ ते १५ ओळींची असावी. कुठेही प्रकाशित झाली नसावी.
सर्वोत्कृष्ट तीन कविता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका या मासिकात प्रसिद्ध करण्यात येतील.सहभागी कवींना प्रमाणपत्र देण्यात येतील.या बाबतीत अंतिम निर्णय परिक्षकांचा असेल. कविता पाठवण्याची अंतिम मुदत दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ असून रोहिदास कवळे (कार्यवाह सांस्कृतिक अभिव्यक्ती), कृपा निवास, मु. रिस भटवाडी, पो. मोहोपाडा रसायनी, ता. खालापूर, जि. रायगड. पिन ४१०२२२ या पत्त्यावर पाठवाव्यात किंवा ई मेल rk.9370035676@gmail.com वर पाठवाव्यात आणि कवी संमेलनाची दिनांक नंतर कळविण्यात येईल, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मोहोपाडा रसायनी शाखेने केले आहे.

### फी बँक खात्यावर घेऊन फसवणूक

**पनवेल ग्रामीण** : जे बी फिटनेस जिममध्ये येणाऱ्या जिम मेंबरची फीची रक्कम परस्पर स्वतःच्या बँक खात्यावर घेऊन आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी आशिष राजू पवार (राहणार आदई) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात दहा फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. जयश्री बोरणारे यांचा जे बी फिटनेस नावाने जिमचा व्यवसाय नवीन पनवेल सेक्टर सहा येथे आहे. त्या ठिकाणी आशिष राजू पवार हा ट्रेनर आहे. तो जीम मेंबर ची फी भरून घेत असे. नोव्हेंबर महिन्यात जिमचे बॅलन्स पेमेंट तपासून पाहत असताना जिम मेंबरची फी बाकी असल्याचे जयश्री यांना दिसले. आणि बँक स्टेटमेंट व जिममध्ये असणारे चालू जीम मेंबर यांच्यामध्ये तफावत दिसून आली. त्यानंतर आशिष पवार यांनी नोकरी सोडत असल्याचे सांगितले आणि कामावर येणे बंद केले. त्यानंतर एका जिम मेंबरने जयश्री यांना तीन महिन्याच्या पॅकेजमध्ये वार्षिक पॅकेज आशिष यांनी दिली असल्याचे सांगितले आणि ते पैसे त्याच्या स्वतःच्या बँक खात्यावर घेतले. त्यांनी जिममधील बुकांची पडताळणी केली असता अनुक्रमांकमध्ये बदल केल्याचे दिसले आणि जिमच्या रेट कार्ड प्रमाणे पैसे घेतलेले दिसून आले नाहीत. अशी एकूण पाच लाख दहा हजारांची फसवणूक केली.

### पीएनपी महाविद्यालयात महिला सुरक्षा आणि कायदा कार्यक्रम संपन्न



**अलिबाग** : प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षातर्फे महिला सुरक्षा आणि कायदा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक पीएनपी बी. एड. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा. ॲड. रुतिशा पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक प्रा. ॲड. रुतिशा पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महिलांसाठी असणारे कायदे कलम आणि गुन्हा घडल्यानंतर होणारी शिक्षा याविषयी सखोल माहिती दिली. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना मुंबई विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण कक्ष कशा प्रकारे कार्य करते याकडे लक्ष केंद्रित केले. तसेच कवितेद्वारे विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विज्ञान विभाग प्रमुख प्रा. पूजा पाटील, प्रास्ताविक डॉ. अमृता कुमारी यांनी केले तर आभार डॉ. रसिका म्हात्रे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रा. वृषाली घरत, प्रा.पूजा पाटील, प्रा.रुपाली पाटील, प्रा.जयश्री ठाकूर, प्रा. संजना पाटील, प्रा. हर्षल काठे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायगडातील आदिवासी महिलांची भरारी

## ।। पहिली मच्छिमार सहकारी संस्था स्थापन ।। साळोख धरण परिसरातील महिलांचे ऐतिहासिक पाऊल

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील साळोख धरण परिसरातील आदिवासी महिलांनी एक ऐतिहासिक पाऊल उचलत जिल्ह्यातील पहिली आदिवासी महिलांची मच्छिमार सहकारी संस्था स्थापन केली आहे. 'जिजाऊ मच्छिमार सहकारी संस्था' या नावाने नोंदणीकृत झालेल्या या संस्थेत सर्व सदस्य आदिवासी महिला असून संस्थेचे नेतृत्व देखील महिलांकडेच राहणार आहे.



कोकणविभागातीलठाणे,रायगड सीमा भागातील नारळाची वाडी आणि फोड्याची वाडी येथे कातकरी व ठाकर आदिवासींचा मोठा वावर आहे. उपजीविकेसाठी या समुदायाचा मासेमारी, शेती, भाजीपाला लागवड तसेच जंगलातील नैसर्गिक उत्पन्नावर आजही मोठा आधार आहे. अनेक महिला दर आठवड्याला ९० ते १०० किलोमीटरचा प्रवास करून मुंबईत जंगलातील उत्पादने विक्रीस नेतात.

सन १९८४ मध्ये बांधलेल्या साळोख धरणातील मासेमारीचे टेंडर वर्षानुवर्षे बाहेरील कंत्राटदारांना दिले जात होते. स्थानिक आदिवासींना प्राधान्य न मिळाल्याने महिलांना हक्काच्या जलस्रोतामध्येही लपूनछपून मासेमारी करावी लागत होती. पकडले जाणे, अपमानास्पद वागणूक आणि कंत्राटदारांकडून होणारा त्रास हा त्यांच्या रोजच्या जीवनाचा भाग बनला होता.

या अन्यायाविरुद्ध स्थानिक नेत्या सुनीता कांबडी, तसेच निसर्ग सामाजिक संस्था आणि कोरो इंडिया यांनी एकत्रित प्रयत्न सुरू केले. तब्बल अकरा महिन्यांच्या सततच्या बैठका, लोकजागृती, लोकवाटा जमा करणे आणि प्रशासकीय अडचणींवर मात केल्यानंतर अखेर संस्थेची अधिकृत नोंदणी पूर्ण झाली.

२६ जानेवारी २०२६प्रजासत्ताक दिनानिमित्त धरणात मासे सोडून मत्स्य पुनर्भरणाचा कार्यक्रम पार पडला. याच दिवशी 'जिजाऊ मच्छिमार सहकारी संस्थे'ला तलाव ठेका मिळाल्याची अधिकृत नोटीस फलकावर धरण परिसरात लावण्यात आली.

कातकरी आणि ठाकर समुदायांची सामूहिक संसाधन व्यवस्थापनाची परंपरा पुन्हा दृढ करण्याचा संस्थेचा हेतू आहे. जमीन, जंगल, जल या तिन्ही घटकांच्या एकत्रित उपजीविका मॉडेलचे पुनरुज्जीवन करण्यासाठी 'जिजाऊ' संस्था कार्यरत राहणार आहे.

आमच्या महिलांनी अनेक वर्षे अपमान, भीती आणि असुरक्षिततेमध्ये मासेमारी केली. हक्काचा जलस्रोत असताना त्याचा उपयोग करण्यासाठी लपूनछपून जावे लागते, ही आमच्यासाठी अत्यंत वेदनादायक गोष्ट होती. पण आम्ही हार मानली नाही. गावोगाव जाऊन चर्चा केल्या, महिलांना एकत्र केलं आणि अडथळ्यांना तोंड देत शेवटी 'जिजाऊ मच्छिमार सहकारी संस्था' उभी केली. आज हा तलाव आम्हाला कायदेशीररित्या मिळाला आहे, हा आमच्यासाठी स्वाभिमानाचा क्षण आहे. महिलांच्या नेतृत्वात चालणारी ही संस्था केवळ रोजगार देणार नाही तर आमच्या पुढच्या पिढीसाठी सुरक्षित आणि सन्मानजनक भविष्य तयार करेल. निसर्ग सामाजिक संस्था आणि कोरो इंडिया यांनी दिलेल्या साथीसाठी आम्ही मनापासून आभारी आहोत. आता हा तलाव आणि ही सहकारी संस्था आमच्या महिलांची ताकद, आमचा हक्क आणि आमचा अभिमान आहे.''

> स्थानिक आदिवासी महिलांनी आपल्या हक्कासाठी उभे राहून मिळवलेला हा विजय केवळ रोजगाराचे साधन निर्माण करणारा नसून सन्मान, स्वावलंबन आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक ठरत आहे.
> – सुनिता कांबडी, (अध्यक्ष)
> जिजाऊ मच्छिमार सहकारी संस्था'

# सहयोगचा वर्धापनदिन उत्साहात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादितचा २६ वा वर्धापनदिन आणि यशस्वी २५ वर्षांची गौरवशाली वाटचाल उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य भजन महोत्सवाला सभासद, ठेवीदार, हितचिंतक आणि भजन रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



या भजन महोत्सवात नामवंत कलाकारांनी आपली सुरेल मैफल सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संगीत चक्री भजन जुगलबंदीत गायक कृष्णा देशमुख व वैभव थोरवे यांनी रंगतदार सादरीकरण केले. पखवाज साथ गणेश लोभी व तबला साथ समीर हडप यांनी कार्यक्रमाला भव्यता प्रदान केली.श्री गणेश महिला प्रासादिक भजन मंडळ, वेलवली (अलिबाग) यांच्या गायिका जागृती कृष्णा पाटील यांनी पखवाज साथ सागर जंगम व तबला साथ विजय शिंदे यांच्या सहकार्याने भक्तिरसाची उधळण केली. गोकुळेश्वर प्रासादिक भजन मंडळ, वेश्वी येथील गायक निलेश जंगम तसेच हनुमान प्रासादिक भजन मंडळ, बेलकडे येथील गायक अनंत म्हात्रे यांनी पखवाज साथ गणेश पाटील यांच्या सहयोगाने कार्यक्रमाची रंगत उत्तरोत्तर वाढविली.

या भजन महोत्सवाच्या यशस्वी आयोजनात माजी जिल्हा सरकारी वकील प्रसाद पाटील यांचा मोलाचा सहभाग लाभला.

रौप्यमहोत्सवी वर्षात संस्थेने ५० कोटी रुपयांच्या ठेवींचा ऐतिहासिक टप्पा गाठत सहकार क्षेत्रात भक्कम स्थान निर्माण केले आहे. सभासदांना २५% लाभांश वाटप तसेच ठेवींवर १०% परतावा देऊन संस्थेने सहकार चळवळीत एक आदर्श पायंडा पाडला आहे.

आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदकेंद्री धोरण यामुळे संस्थेचा नावलौकिक अधिक वृद्धिंगत होत आहे. वर्धापनदिनानिमित्त मान्यवरांनी संस्थेस भेट देऊन शुभेच्छा व अभिष्टचिंतन व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रम भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# गोपीनाथ मुंडे सानुग्रह अनुदानातून ओमले कुटुंबाला दिलासा

**। तळा । प्रतिनिधी ।**

चरईखुर्द ग्रामपंचायत हद्दीतील तळघर गावातील अपघातात मृत्युमुखी पडलेल्या कै. चंद्रकांत काशीराम ओमले यांच्या कुटुंबाला महाराष्ट्र शासनाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतून २ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली असून सदर रक्कम कै.चंद्रकांत ओमले यांच्या पत्नीच्या बँक खात्यावर थेट हस्तांतरित करण्यात आली आहे. सरपंच प्रविण आंबार्ले यांच्या पाठपुराव्यासह कृषी विभागाच्या सहकार्यामुळे ही मदत मिळाल्याने कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

कै.चंद्रकांत ओमले यांच्या आकस्मिक निधनामुळे कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले होते. घरखर्च आणि मुलांचे शिक्षण या सर्व गोष्टींचा ताण वाढला होता. अशा परिस्थितीत शासनाच्या गोपीनाथ मुंडे सानुगृह अनुदान योजनेअंतर्गत मदतीचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सरपंच प्रविण आंबार्ले यांनी तात्काळ संबंधित कागदपत्रांची पूर्तता करून कृषी विभागाशी सातत्याने पाठपुरावा केला. तालुका कृषी अधिकारी हनुमंत कांबळे कार्यालयातील पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात आला.अखेर २ लाख रुपयांचे अनुदान मंजूर होऊन ते थेट ओमले कुटुंबाच्या बँक खात्यात जमा झाले.या वेळी सरपंच आंबार्ले म्हणाले, शासनाच्या विविध योजना गावातील गरजू नागरिकांपर्यंत पोहोचणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे.ओमले कुटुंबाला योग्य वेळी मदत मिळाली, याचा आनंद आहे. गावकऱ्यांनीही ग्रामपंचायतीच्या या प्रयत्नांचे कौतुक केले आहे.

### डॉ. अरविंद पाटणकर यांचे निधन

**अलिबाग** : अलिबाग सह राज्याच्या वैद्यकीय क्षेत्रात बालरोग तज्ज्ञ म्हणून प्रख्यात असणारे डॉ. अरविंद पाटणकर यांना गुरुवारी (दि.१२) राहत्या घरी देवाज्ञा झाली.



निधनासमयी त्यांचे वय ८४ वर्षे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा सून व नातू असा त्यांचा परिवार आहे. अलिबाग तालुक्यातील ग्रारीण भागासह रायगड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात लहान मुलांचा डॉक्टर म्हणून डॉ. अरविंद पाटणकर यांच्या नावाची ख्याती आहे. डॉ.अरविंद पाटणकर यांच्या पार्थिवाच्या अंतिम दर्शनासाठी रायगड जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, क्रीडा, वैद्यकीय आणि शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांनी आपली हजेरी लावली होती.

### ३१ लाख ५० हजारांची फसवणूक

**पनवेल** : ग्रुप मध्ये पैसे गुंतवणूक केल्यास फायदा होईल असे सांगून ३१ लाख ५० हजारची फसवणूक केल्या प्रकरणी रश्मी पुनिया आणि यतीन शहा यांच्या विरोधात १० फेब्रुवारी रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हरेंद्र सिंह यांना व्हाट्सअप ग्रुपमध्ये सामील करण्यात आले. यावेळी ग्रुप मध्ये पैसे गुंतवणूक केल्यास फायदा होईल असा मेसेज ग्रुपमध्ये आला. आणि त्यांनी पैसे गुंतवले.

# मिलिंद जाधवांनी छत्रपतींच्या प्रेरणेने सर केला भैरवगड

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यातील मोरोशी गावाजवळ असलेल्या अत्यंत अवघड आणि धोकादायक प्रकारात मोडणाऱ्या भैरवगडाची मोहीम रायगड जिल्ह्याच्या श्रीवर्धन तालुक्यातील दुर्गप्रेमी मिलिंद जाधव यांनी यशस्वीरित्या पूर्ण केली.

शिवशौर्य ट्रेकर्सच्या वतीने आयोजित केलेल्या मोहिमेत मुंबई, ठाणे, आंबेजोगाई परिसरातील एकवीस गिर्यारोहकांनी सहभाग घेतला होता.इतर कोणत्याही गडदुर्गांच्या मोहिमेत किमान चाळीस-पन्नास ते अगदी दोनशेपर्यंत गिर्यारोहकांचा समावेश असतो.मात्र भैरवगडाची चढाई अत्यंत अवघड असल्याने नियोजनाच्या दृष्टीने गिर्यारोहकांची संख्या मर्यादित ठेवली जाते.एका बाजूला डोळे भिरभिरायला लावणारी खोल दरी.या दरीलगत उंच कातळात खोदलेल्या जेमतेम एक माणूस जाईल अशा अरुंद पायऱ्या, त्यातल्या काही पायऱ्या १८१८



साली इंग्रजांनी उध्वस्त केल्यामुळे इथली चढाई आणखीनच अवघड झाली आहे.

या पायऱ्यांच्या दुसऱ्या बाजूला अगदी खेटून असलेली उंच कातळ भिंत,काही ठिकाणी कातळभिंतीच्या कडेने खोदलेल्या जागेवर एक पाऊल ठेवता येईल अशा परिस्थितीत दोरी धरून चालत जाण्याची करावी लागणारी कसरत शिवाय हा कातळ डाईक या प्रकारात मोडत असल्याने संपूर्ण मोहीमच धोकादायक मानली जाते. अनावधानाने घडलेली छोटीशी चूकसुद्धा मृत्यूला कारणीभूत ठरू शकते.सहाजिकच गिर्यारोहण तंत्र आणिसुरक्षासाधनांशिवायहीमोहीम शक्य होत नाही त्यामुळे प्रशिक्षित आणि अनुभवी गिर्यारोहकच यात सहभागी होत असतात.

> मुठभर मावळ्यांच्या शौर्याने पराभूत झालेल्या मोगली सत्तेप्रमाणेच इंग्रज सत्ताही हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थानांपासून भयभीत झाली होती.म्हणूनच या गडदुर्गांची मोडतोड करून त्यांनी इतिहास पुसण्याचा प्रयत्न केला.पण काळ कितीही बदलला,तरी छत्रपतींच्या विचारांची मशाल विझली नाही.विझणार नाही. त्याच मशालीची धग उरात भरुन महाराष्ट्रभरातील दुर्गप्रेमी आज तेच गड सर करत आहेत. ही केवळ गडचढाई नसून इतिहासाशी साधलेला संवाद आणि स्वराज्याला अंत:करणापासून दिलेली मानवंदना आहे.
> – मिलिंद मधुकर जाधव, दुर्गप्रेमी.

# कळंबुसरे येथे यंदाचा शतक महोत्सवी शिवरात्री उत्सव

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील कळंबुसरे गावात यंदाही महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात येणार असून यंदाचे महाशिवरात्री उत्सवाचे हे शतक महोत्सवी वर्ष असल्यामुळे यावर्षीचा शिवरात्रीचा उत्सव भव्य व व दिमाखदार स्वरूपात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती कळंबुसरे येथील ग्रामस्थांनी दिली.

१९२७ पासून कळंबुसरे येथील प्राचीन मंदिरात स्वयंभू कळंबेश्वराच्या महाशिवरात्रीचा उत्सव संपूर्ण कळंबुसरे ग्रामस्थ एकत्र येत, मोठ्या भक्ती भावाने व विविध धार्मिक कार्यक्रम साजरे करत हा उत्सव मोठ्या आनंदात साजरा करत आहेत. कळंबुसरे ग्रामस्थांतर्फे भजन, कीर्तन, हरिपाठ, महाआरती, महाप्रसाद आदी कार्यक्रमांचे आयोजन या निमित्ताने करण्यात आले आहे. १४ फेब्रुवारी रात्री किर्तन. १५ फेब्रुवारी या मुख्य दिवशी मोठ्या उत्साहात महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यात येणार आहे.

# आर्डे गावाजवळील नाल्यावर सिमेंट बंधारा

## दीड किलोमीटरपर्यंत पाणी अडवले

**। नेरळ । प्रतिनिधी।**

आर्डे गावाच्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहणारा नाला उन्हाळ्यात कोरडा असतो.मात्र स्थानिक पातळीवर जनावरे आणि पशु-पक्षी यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी त्या नाल्यातील पाणी सिमेंट बंधारा बांधून अडवण्यात आले आहे.काही दिवसांपूर्वी त्या बंधाऱ्याला लोखंडी प्लेट टाकण्यात आल्याने साधारण दीड किलोमीटर पर्यंत पाण्याचा साठा झाला आहे.



पाषाणे ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या आर्डे गावाच्या हद्दीत मोठा नाला असून हा नाला मुरबाड तालुक्यातुन वाहत येतो आणि कर्जत तालुक्यात आल्यावर या नाल्यातील पाणी पोश्री नदीत जाते.मात्र हा नाला उन्हाळा सुरु झाला कि कोरडा पडतो आणि त्यामुळे नाल्यातील पाणी आटल्याने या भागातील जाणारे तसेच पशु-पक्षी यांच्या पिण्याचे पाण्यासाठी थेट पोश्री नदीमध्ये जावे लागत असते. ते लक्षात घेऊन स्थानिकांनी मागणी केल्यानंतर जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागाने सिमेंट बंधारा बांधला. त्या सिमेंट बंधाऱ्यात साठणारे पाणी हे स्थानिकासाठी मदतगार ठरत आहे. त्या पाण्याचा वापर या भागातील शेतकरी भाजीपाला करण्यासाठी देखील वापरत असतात आणि त्यामुळे सिमेंट बंधारा शेतकऱ्यांच्या फायद्याचा ठरत आहे.

आर्डे येथील नाल्यात बांधण्यात आलेले सिमेंट बंधाऱ्याला लोखंडी झडपा बसवण्यात आल्या असून त्याचा फायदा या उन्हाळ्यात कोरड्या असलेल्या नाल्यात तुडुंब पाणी साठले आहे.त्या पाण्याची क्षमता साधारण दीड किलोमीटर पर्यंत पोहचली असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत.

## नात्यात विरघळणार प्रेमाचा गोडवा | व्हॅलेंटाईन डेला बेकरी व्यावसायिकांकडे ऑर्डरचा ओघ

# यंदा बेंटो अन् सिक्रेट मेसेज केकची तरुणाईत क्रेझ

**। पाली/ वाघोशी । प्रतिनिधी ।**

प्रेम व्यक्त करण्याचा सण अर्थात व्हॅलेंटाइन डे च्या निमित्ताने बाजारात भेटवस्तूंची रेलचेल असली, तरी यंदा सेलिब्रेशनसाठी केकला सर्वाधिक पसंती दिली जात आहे. विशेषतः तरुण व जोडप्यांसाठी डिझाइन केलेले बेंटो केक आणि हार्ट शेप केकना मोठी मागणी असून, बेकरी व्यावसायिकांकडे ऑर्डरचा ओघ वाढला आहे.

केवळ दोघांसाठी पुरेसा असणारा छोटा पण आकर्षक बेंटो केक यंदा आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. यासोबतच, सिक्रेट मेसेज केक ही नवीन संकल्पना प्रेमी युगुलांमध्ये लोकप्रिय झाली आहे. या केकवर




### भेटकार्ड व टेडी बेअरची जागा केकने घेतली

हे केक वजनाने हलके आणि दिसायला क्युट असल्याने प्रवासात नेण्यासाठी किंवा छोट्या सेलिब्रेशनसाठी सोयीचे आहेत. पूर्वी केवळ भेटकार्ड, चॉकलेट किंवा टेडी बेअर दिले जायचे, आता त्याची जागा 'कस्टमाइज्ड केक'ने घेतली आहे. तसेच लाल गुलाब आणि चॉकलेट हार्ट्सनी सजवलेल्या हार्ट शेप डिझाईन केक्सना आजही तितकीच मागणी.

वरून काहीही दिसत नसले तरी, केक कापल्यावर किंवा त्यातील विशिष्ट भाग बाजूला केल्यावर आत लपवलेला प्रेमसंदेश समोर येतो. केवळ केकच नाही, तर त्यासोबत येणाऱ्या इवल्याशा संदेशांनी नात्यातील गोडवा वाढवण्याचा प्रयत्न सध्या तरुण पिढी करताना दिसत आहे.

शुद्ध साहित्य आणि वैयक्तिक आवडीनुसार सजावट मिळत असल्याने ग्राहक होम बेकर्सकडे वळत आहेत. तसेच सर्वच केकची दुकाने आता विविध केकने सजली आहेत. आणि व्हॅलेंटाईन डेच्या दरम्यान येणाऱ्या विविध दिवसांमध्ये देखील केक घेतले जात आहेत. या दुकानातून विविध ऑफर्स सुद्धा दिल्या जात आहेत. विविध प्रकारे ही दुकाने सजलीदेखील आहेत.

> व्हॅलेंटाइन डे निमित्त हार्ट शेप आणि लाल रंगाच्या केक्सना नेहमीच पसंती असते. मात्र, यंदा बेंटो केकसाठी मोठ्या प्रमाणावर आगाऊ नोंदणी झाली आहे. आमच्याकडे अनेक ऑर्डर्स आधीच बुक झाल्या आहेत, तरीही काही ग्राहक ऐनवेळी येऊनही केक्सची मागणी करतात. यंदा सिक्रेट मेसेज केकची क्रेझ जास्त असून, प्रेमी युगुलांना आपल्या जोडीदाराला सरप्राईज देण्यासाठी हे केक हवे आहेत.
> – निवेदिता भावे,
> संचालिका, डॉ टेल

# संप, बंद आणि नंतर

मोदी सरकारच्या कामगारविरोधी धोरणांच्या विरोधात गुरुवारी देशभर एक दिवसाचा बंद पाळण्यात आला. यात सर्व डावे पक्ष व कामगार संघटना सहभागी झाल्या होत्या. देशाच्या अनेक भागात बँका, विमा कंपन्या, शाळा, कॉलेजे, कारखाने, दुकाने बंद होती. देशात पूर्वापार चालत आलेले २९ कामगार कायदे रद्द करून त्यांच्या जागी चार कामगार संहिता लागू करणे याला सर्वांचा मुख्य आक्षेप होता. याखेरीज मनरेगा योजनेतील बदल, नवीन शैक्षणिक धोरणातील आक्षेपार्ह तरतुदी इत्यादींनाही या बंदमधून विरोध करण्यात आला. केरळसारख्या डाव्या पक्षाचे राज्य असलेल्या राज्यात बंद पूर्ण यशस्वी झाला. तमिळनाडू, तेलंगणा, आंध्र, पंजाब, बंगाल, झारखंड इत्यादी ठिकाणी त्याचा कमीअधिक परिणाम जाणवला. त्या मानाने, एकेकाळी औद्योगिक राजधानी असलेल्या मुंबईत व महाराष्ट्रात त्याचा प्रभाव दिसला नाही. गंमत म्हणजे सध्या गिग वर्कर्स किंवा स्कूटरवरून हमाली करणाऱ्या कामगारांविषयी बरेच बोलले जाते. त्यांच्या हक्कांसाठी डाव्या पक्षांनी बराच आवाज उठवला होता. पण ते मात्र फारच कमी प्रमाणात या संपात सहभागी झाले. त्यामुळे घरपोच वस्तू पोचवण्याचा धंदा काल सर्वत्र विनाव्यत्यय चालू राहिला. अनेक शेतकरी संघटनांनी ठिकठिकाणी निदर्शने केली. त्यांचा चांगला परिणाम जाणवला. एकत्रित विचार केला तर आपल्या धोरणांना देशात भरपूर विरोध आहे हे मोदी सरकारच्या लक्षात येईल. अर्थातच, ते याबाबत संवेदनशील आहेत का हा मोठाच प्रश्न आहे. तसे ते असते तर कालच्या संपाची गरजच पडली नसती. दुसरीकडे मध्यमवर्ग व आम जनताही अशा बंदबाबत आता उदासीन झाली आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. वास्तविक डावे पक्ष व या कामगार संघटना सामान्यांच्या हिताच्या रक्षणासाठीच सतत झगडत असतात. त्यासाठीच ते जिवाचे रान करतात. पण देशातील मध्यमवर्ग आणि त्याच्या प्रभावाखाली असलेली बहुसंख्य जनता किंवा बहुजन समाज आता आपल्या खऱ्या प्रश्नांबाबतच बेफिकीर झाल्याचे चित्र आहे. त्यामुळेच तो असे संप वा बंद यांच्याकडे उदासीनपणे किंवा रागाने पाहतो. यामुळे आपण आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत आहोत हे त्याला कळत नाही.

### हायर अँड फायर

पूर्वीचे कामगार कायदे हे सामान्य कामगारांना संरक्षण देणारे होते. आता तीनशे कामगार असलेल्या कारखान्यात कोणतीही नोटीस न देता व सरकारची परवानगी न घेता एका फटक्यात कामगारांना काढून टाकण्याचे अधिकार मालकांना मिळाले आहेत. याच मालकांवर पूर्वीही फार बंधने होती असे नव्हे. पण किमान ३०० च्या वर कामगार असलेल्या मोठ्या कंपन्या एकाएकी बंद करता येणे शक्य नव्हते. सरकारदरबारी दाद मागणे शक्य होते. सरकारांना निवडून यायचे असल्याने त्यांच्यावर लोकांचा किमान दहा-वीस टक्के दबाव असे व सरसकट सर्व कामगारांना काढून टाका असे करता येत नव्हते. आता मात्र कामगारांना काढण्यावरचे आपले नियंत्रण सरकारने स्वतःहून हटवत आणले आहे. त्यामुळे सरकारचा उरलासुरला धाक संपुष्टात येणार आहे. कामगारांना लवाद किंवा न्यायालयात जाण्याचा एक मार्ग खुला असतो. पण तिथेही अजब प्रकारचे सरकारी निर्णय आडवे येणार आहेत. शिवाय अशा खटल्यांचे निकाल वर्षानुवर्षे लागत नाहीत हे सर्वांनाच ठाऊक आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे सरकार आज मनरेगातील बदल किंवा नवे कामगार नियम हे काही अभावितपणे किंवा अज्ञानातून करत नाहीय. याचे परिणाम काय होणार हे सरकारला चांगले ठाऊक आहे. किंबहुना, मालकांवरचे कामगारांचे ओझे कमी व्हावे आणि परकीय मालकांना इथे येण्यासाठी आकर्षित करावे याच हेतूने हे बहुतांश बदल करण्यात आले आहेत. भारतात कामगारांच्या नेमणुका व त्यांना काढून टाकणे अर्थात हायर अँड फायर फार वेळखाऊ आहे. सबब इथे परकीय गुंतवणूक होत नाही अशी सर्वांची नेहमीची लाडकी तक्रार असते. त्यांना हे सांगायला हवे की, भांडवलशाहीची मक्का असलेल्या अमेरिकेत देखील कामगार संघटना जोरात काम करतात व त्या आपल्या हक्कांसाठी भांडत असतात. पण तिथले उद्योग बंद पडत नाहीत. पडले तर त्याला चिनी उद्योगांची स्पर्धा जबाबदार आहे असे म्हटले जाते. कामगारांना कधी कोणी दोष देत नाही.

### मनरेगावर कुऱ्हाड

भारतात मात्र याच्या उलटे सर्व चालू असते. मध्यंतरी इन्फोसिसचे नारायणमूर्ती म्हणाले की, तरुणांनी दिवसाला १६ तास तरी काम करायला हवे. तरच भारताची प्रगती होईल. नव्या कामगार संहितेमध्ये त्याच दृष्टीने शिफारशी आहेत. दिवसाला सलग बारा तास काम करवून घेण्याची मुभा मालकांना देण्यात आली आहे. ही मर्यादा सहज ओलांडून १४-१६ तासांवर जाणे शक्य आहे. महिलांना रात्रपाळी असेल तर यापूर्वी पुरेसे संरक्षण दिले जाणे अनिवार्य होते. आता हे बंधन हटवण्यात आले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे पूर्वी हे सर्व कायदे होते. आता या संहिता म्हणजे नियम असणार आहेत. कायद्यामध्ये बदल करणे कठीण असते. यासाठीच्या दुरुस्त्या विधिमंडळात मांडाव्या लागतात. नव्या बदलांनुसार हे नुसतेच नियम असल्याने ते अधिकाऱ्यांच्या पातळीवर देखील बदलले जाऊ शकतात. कामगार संघटनांना मान्यता देण्याबाबतही असेच बदल केले गेले असून कामगारांमध्ये फूट पाडण्याचा हा उद्योग आहे. दुसरीकडे ग्रामीण शेतमजुरांचेही दाणापाणी तोडण्यात येणार आहे. पूर्वी मनरेगामध्ये वर्षभर रोजगार उपलब्ध होता. आता वर्षातील दोन वा तीन महिने हा रोजगार बंद ठेवला जाणार आहे. शेतीतील पेरणी, कापणीचे जे हंगाम असतात त्यामध्ये ही योजना अधिकृतरीत्या बंद ठेवता येणार आहे. यामुळे शेतमजुरांना कमी मजुरीवर शेतीतच राबायला जाणे अपरिहार्य होणार आहे. शिवाय, दुष्काळ किंवा अतिवृष्टी वगैरे असेल तर काम बंद असल्याने तडफडावे लागणार आहे. याचा परिणाम असा होणार आहे की, हे मजूर छोट्या व मोठ्या शहरांकडे स्थलांतरीत होणार आहेत. तिथे बांधकामे व इतर उद्योगातील लोकांना कंत्राटी कामगार हवाच असतो. मनरेगातील बदलांमुळे तो आपोआप पुरवला जाणार आहे. देशात सध्या एकीकडून दुसरीकडे वस्तू पोचवणारे स्कूटरवरचे हमाल उर्फ गिग वर्कर्स यांची संख्या वाढत चालली आहे. सरकार त्यांना संरक्षण देण्याचा आव आणतंय. त्यांच्यासाठी वैद्यकीय विमा इत्यादीची तरतूद करते आहे. परिणामी मनरेगातून बाद होणारा हा अर्धशिक्षित ग्रामीण मजूर गिग वर्कर, मॉलमधला कर्मचारी किंवा कुठेतरी सिक्युरिटी गार्ड वगैरे होण्यात धन्यता मानणार आहे. या कामगार कायद्यांना विकासाची कोणतीही दिशा नाही. कारण गिग वर्कर्सना आयुष्यात पुढे कोणतेही भवितव्य नाही. आयुष्यभर जरी ते हीच हमाली करीत राहिले तरी त्यांच्या कौशल्यात कोणतीही वाढ होण्याची शक्यता नाही. शिवाय ज्या क्षणी ते काम थांबवतील त्या क्षणी त्यांचे उत्पन्न शून्य असेल. कालच्या संपानंतर डाव्या पक्षांनी या तथाकथित विकासाबाबत सतत जनतेचे प्रबोधन करून व्यापक चळवळ उभारण्यावर भर द्यायला हवा.

विचार

# लघु उद्योगांसाठी 'जेम पोर्टल'

*लहान व्यापारी आणि उत्पादकांना सक्षम करण्यासाठी भारत सरकारने 'जेम' ही पारदर्शक ई-मार्केट प्लेस लॉंच केली आहे. या पोर्टलवर नोंदणीकृत उद्योगांकडूनच शासकीय वस्तू आणि सेवांची खरेदी करणे बंधनकारक आहे. यात विक्रेत्यांना वेळेवर पेमेंटची हमी दिली जाते. नोंदणीकृत विक्रेते विविध सरकारी विभागांच्या वार्षिक खरेदी योजनांची संपूर्ण माहिती पोर्टलवरच मिळवू शकतात.*




डॉ. दीपक शिकारपूर

आपल्या देशाचा सार्वजनिक खरेदी खर्च ३४० अब्ज रुपये आहे. हा खर्च वार्षिक ग्रॉस डोमेस्टिक प्रोडक्ट (जीडीपी) च्या १५ ते २० टक्के इतका आहे. या सरकारी व्यवसायात पुरवठादार होणे हे अनेकांचे स्वप्न असते. आता तर 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया'सारख्या योजनांमुळे आयात कमी करण्यावर सरकारचा भर आहे, पण केंद्र आणि राज्य खरेदी संस्थांमध्ये अनेकदा अकार्यक्षमतेचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण केल्याने विविध विकास योजना आणि प्रकल्पांसाठी संसाधने कमी किमतीत खरेदी करण्यात मदत होऊ शकते. अनेक लघुउद्योग सरकारी पुरवठादार होण्यासाठी प्रयत्नशील असतात. अनेकांना त्याची प्रक्रिया अवघड आणि अनेक अडथळ्यांची वाटते. त्यामुळे अनेकजण त्याचा नाद सोडतात आणि इतरत्र प्रयत्न करतात. भारतातील एकूणच व्यवसायसुलभतेला चालना देण्यासाठी सरकारने अलिकडच्या वर्षांमध्ये अनेक उपाययोजना सुरू केल्या आहेत. आजच्या स्पर्धात्मक जागतिकीकरणाच्या अर्थव्यवस्थेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी या उपाययोजनांनी लहान व्यापारी आणि उत्पादकांना मदत केली आहे. लहान व्यापारी आणि उत्पादकांना सक्षम करण्यासाठी भारत सरकारने एक पारदर्शक 'ई-मार्केटप्लेस' सुरु केले आहे. त्याला 'जेम' म्हणून ओळखले जाते. केंद्र शासनाने राष्ट्रीय खरेदी धोरणांतर्गत खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात बदल केले आहेत. शासकीय वस्तू आणि सेवा खरेदीसाठी केंद्र शासनाने हे पोर्टल विकसित केले आहे. हे पोर्टल एका 'स्पेशल पर्पज व्हेईकल'द्वारे व्यवस्थापित केले जाते.

केंद्रीय वाणिज्य विभागाअंतर्गत विभाग ८ (सेक्शन ८) कंपनी त्यासाठी स्थापन केली आहे. यासाठी पात्रतेचे निकष तसे सोपे आहेत. बोली सादर करण्याच्या शेवटच्या तारखेनुसार, बोलीदाराने संबंधित क्षेत्रातील अनुभवासह किमान गेल्या चार वर्षांपासून भारतात कार्यरत असणे आवश्यक आहे. बोली लावणाऱ्याची सरासरी वार्षिक आर्थिक उलाढाल किमान रुपये ५० लाख असावी. 'जेम पोर्टल' हा एक ऑनलाईन प्लॅटफॉर्म आहे, जिथे विविध सरकारी विभाग आणि सरकारी मालकीच्या उपक्रमांद्वारे सामान्य वापराच्या वस्तू आणि सेवांच्या ऑनलाइन खरेदीची सुविधा असते. हे २०१६ मध्ये पारदर्शक, कार्यक्षम आणि जलद सार्वजनिक खरेदीद्वारे लहान आणि स्थानिक व्यवसायांसाठी ग्राहकांना सुरक्षित करण्यासाठी सुरू करण्यात आले . https://bidplus.gem.gov हे त्याचे संकेतस्थळ आहे. हे पोर्टल ई-बिडिंग, रिव्हर्स ई-ऑक्शन आणि मागणी एकत्रीकरणासाठी साधने पुरवते, जेणेकरुन खरेदीदार आणि विक्रेते या दोघांनाही वाजवी दर मिळण्यास मदत होईल. सर्व पुरवठादारांसाठी सर्वसमावेशक बाजारपेठेचा विचार करून सार्वजनिक सरकारी खरेदीमधील प्रक्रियेवर सकारात्मक परिणाम करणे हे त्याचे ध्येय आहे. तथापि, पोर्टल नोंदणी अत्यावश्यक आहे. जेम पोर्टलवरील विक्रेते मालकी /भागीदारी/प्रोप्रायटरी उद्योग, स्टार्टअप्स किंवा अगदी लिमिटेड कंपन्या असू शकतात. ते त्यांच्या मालाची सरकारी संस्थांद्वारे खरेदीसाठी पोर्टलवर सहजपणे यादी मांडू शकतात आणि सरकारी बोली आणि लिलावांमध्ये भाग घेऊ शकतात. सामान्य आर्थिक नियम, २०१७ मध्ये नवीन नियम क्रमांक १४९ जोडून सरकारी युजर्सद्वारे जेम पोर्टलद्वारे खरेदी वित्त मंत्रालयाने अधिकृत आणि अनिवार्य केली आहे. जेम पोर्टलवर व्यवहार करायचे काही फायदे आहेत.

डिजिटली सक्रिय मार्केटप्लेस म्हणून हे पोर्टल सर्व सरकारी विभाग तसेच विक्रेत्यांसाठी अगदी सहज आणि थेट उपलब्ध आहे. विक्रेत्यांसाठी विपणनाचे (मार्केटिंग) प्रयत्न बरेच कमी झाले आहेत. विक्रेत्यांना विविध शासकीय विभागांच्या निविदांचे पालन करण्याची गरज नाही. एकदा त्यांनी त्यांची उत्पादने ऑफर केली की, सरकारी विभाग स्वतः विक्रेत्यांशी संपर्क साधतात. पुरवठादाराच्या किंवा विक्रेत्याच्या हमी किंवा वॉरंटीविरुद्ध स्वीकारलेली उत्पादने नियमित माल तपासणी, चाचणी आणि मूल्यमापन प्रक्रियेपासून मुक्त असतात. विक्रेते त्यांच्या उत्पादनांची वैशिष्ट्ये स्व-परिभाषित करण्यास मोकळे आहेत. शिवाय, या उत्पादनांमध्ये कोणती वैशिष्ट्ये असावीत किंवा नसावीत यावर कोणतेही निर्बंध नाहीत. विक्रेते त्यांची उत्पादने कधीही आणि त्यांना पाहिजे तितक्या वेळा अपग्रेड करू शकतात. वर्षातील कोणत्याही वेळी बाजाराच्या परिस्थितीनुसार उत्पादनांच्या किमती वाढवता किंवा कमी केल्या जाऊ शकतात. त्यामुळे विक्रेत्यांना कच्च्या मालाच्या किमतीतील चढउतारांची किंवा विनिमय दराच्या मूल्यांची भीती बाळगण्याची गरज रहात नाही, कारण त्याचा बोजा खरेदीदारांवर सहज टाकला जाऊ शकतो. विक्रेत्यांना वेळेवर पेमेंटची हमी दिली जाते. नोंदणीकृत विक्रेते विविध सरकारी विभागांच्या वार्षिक खरेदी योजनांची संपूर्ण माहिती पोर्टलवरच मिळवू शकतात.

जेम पोर्टलवर विक्री करण्यासाठी, संबंधित खरेदीदार आणि विक्रेत्यांना ऑनलाइन जीईएम पोर्टल नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावी लागेल. त्यासाठी व्यवसायाच्या अधिकृत प्रतिनिधीचे पॅनकार्ड आणि आधार कार्ड, व्यवसायाच्या अधिकृत प्रतिनिधीची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी मागील तीन वर्षांच्या प्राप्तिकर विवरणपत्रांची प्रत, व्यवसाय इन्कॉर्पोरेशन आणि कॉर्पोरेट ओळख प्रमाणपत्र किंवा संबंधित व्यवसायाचे एमएसएमई प्रमाणपत्र किंवा संबंधित व्यवसायाचा उद्योग आधार क्रमांक (उपलब्ध असल्यास), व्यवसायाचे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, संबंधित व्यवसायाच्या रद्द केलेल्या चेकच्या प्रतीसह बँक खाते तपशील, व्यवसायाच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या जागेचा पत्ता पुरावा आदी दस्तावेज/ओळखपत्रे आवश्यक आहेत. जेम पोर्टलवर खरेदीदार किंवा विक्रेता म्हणून नोंदणी पूर्णपणे विनामूल्य आहे. भारत सरकार नोंदणीसाठी कोणतेही शुल्क आकारत नाही. तथापि, सल्लागार किंवा एजंट नियुक्त केला आणि तो नोंदणी करत असल्यास त्याचे सल्लागार शुल्क भरावे लागेल. उत्पादने तयार करणारा कोणताही विक्रेता आणि त्याचा व्यापार किंवा सेवा/उत्पादने वितरीत करणारा प्रदाता या पोर्टलवर विक्रेता बनून नोंदणीसाठी अर्ज करू शकतो. 'जेम'वर नोंदणीकृत विक्रेते दोन प्रकारात वर्गीकृत केले जाऊ शकतात- मूळ उपकरण निर्माता (ओरिजिनल इक्विपमेंट मॅनुफॅक्चरर) आणि पुनर्विक्रेता. हा उत्पादनाचा निर्माता किंवा सेवेचा मूळ प्रदाता असू शकतो. तो आपले उत्पादन किंवा सेवा प्लॅटफॉर्मवर नोंदणीकृत 'पुनर्विक्रेत्या'ला विकतात. तो नोंदणीकृत खरेदीदार किंवा संबंधित सरकारी एजन्सींना पुनर्विक्री करतो.

जेम पोर्टलवर नोंदणी केल्यानंतर, विक्रेत्यांना आपली उत्पादने किंवा सेवा निर्दिष्ट श्रेणींमध्ये सूचीबद्ध कराव्या लागतात. पोर्टलवर त्याचे तपशील देऊन ऑर्डर प्राप्त झाल्यावर माल पाठवणाऱ्या व्यक्तीला वितरित करणे आवश्यक आहे. ऑर्डर वितरीत केल्यानंतर प्रेषणकर्ता उत्पादनाची तपासणी करून ऑनलाइन स्वीकृती किंवा नकार जारी करतो. 'कन्साइनी' ऑर्डर स्वीकारतो तेव्हा तो/ती 'कन्साइनी'ची पावती आणि स्वीकृती प्रमाणपत्र तयार करतो. ते जारी केल्यानंतर खरेदीदार बिलावर प्रक्रिया करतो आणि ते देयक प्राधिकरणाकडे पाठवतो. ऑर्डर स्विकारल्यापासून दहा दिवसांच्या आत देय रक्कम अदा केली जाते. जेम पोर्टलवर सर्व खरेदी प्रक्रिया ऑनलाइन आणि पारदर्शकतेने पार पाडल्या जातात. यामुळे भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार कमी होण्यास मदत होते. परिणामी, खरेदी प्रक्रियेची कार्यक्षमता वाढते. जेम पोर्टलवर अनेक विक्रेते सहभागी होत असल्यामुळे खरेदीदारांना चांगल्या दर्जाच्या वस्तू आणि सेवांसाठी स्पर्धात्मक दर मिळू शकतात. जेम पोर्टलमुळे खरेदी प्रक्रियेतील कागदपत्रे आणि इतर औपचारिकता कमी होतात. त्यामुळे वेळ आणि पैशाची बचत होते. पोर्टलवर विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवा उपलब्ध आहेत. त्यामुळे खरेदीदारांना त्यांच्या गरजेनुसार योग्य वस्तू आणि सेवा निवडण्यास मदत होते. इथे स्थानिक विक्रेत्यांना सरकारी खरेदीमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन असते. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

deepak@deepakshikarpur.com
**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

# व्हॅलेंटाईन डे गरजेचा आहे का?

अंतरा पारंगे

दरवर्षी १४ फेब्रुवारी रोजी प्रेमाचा सण म्हणून व्हॅलेंटाईन डे जगभरात साजरा केला जाणारा जातो. या दिवशी आपल्या प्रिय व्यक्तीप्रती प्रेम केले जाते. यानिमित्त आपल्या प्रिय व्यक्तींना गुलाब किंवा खास भेटवस्तू दिली जाते. खर तर हा दिवस संत व्हॅलेंटाईन यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ साजरा केला जातो, ज्यांची कहाणी प्राचीन रोमन काळाशी जोडलेली आहे. १४ फेब्रुवारी हा दिवस प्रत्येक नात्याचा मान राखावा तसेच आपल्या प्रिय व्यक्तीविषयी आदर व प्रेम व्यक्त करण्यासाठी साजरा केला जायचा. आणि हा त्यामागील मुख्य हेतू होता. मात्र आता व्हॅलेंटाईन वीक साजरा केला जातो. शहरातील ही क्रेझ हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. याचा गंभीर परिणाम आताच्या तरुण पिढीवर होत आहे, हे कोणाच्या लक्षात येत नाही. आपली भारतीय संस्कृती आपल्या कुटुंबावरच नाही तर निसर्ग, पशु-पक्षी यांच्यावर प्रेम करायला शिकवते, तर मग आपल्याला हा व्हॅलेंटाईन डे साजरा करण्याची गरज असावी असे वाटत नाही.

व्हॅलेंटाईन वीक ७ फेब्रुवारीपासून साजरा केला जातो. प्रॉमिस डे, चॉकलेट डे, टेडी डे, हक डे, किस डे आणि मग १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाईन डे साजरा केला जातो. व्हॅलेंटाइन डे च्या निमित्ताने बाजारात गुलाब, चॉकलेट, केक, ग्रीटिंग कार्ड्सची दुकाने सजलेली दिसतात. भेटवस्तूंची जोरदार खरेदी सुरु असते. बाजारात एका गुलाबाची किंमत तब्बल तीस रुपयांवर पोहोचली तरी खरेदीसाठी तरुणाईत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळते. यानिमित्ताने सर्व बाजारपेठांमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होत असते. परंतु, हा खर्च खरंच महत्वाचा आहे का? निःस्वार्थ प्रेम व्यक्त करायला खरंच भेटवस्तूंची गरज असते का?

हा खर्च करायचाच असेल तर तो चांगल्या पद्धतीने आणि चांगल्या गोष्टींसाठी केला जाऊ शकतो. जसे की, गुलाब, चॉकलेट, केक, ग्रीटिंग कार्ड्स यावर खर्च करण्यापेक्षा एखाद्या अनाथाश्रमात किंवा वृद्धश्रमात जाऊन त्यांना मदत करता येईल.

तरुणांनी प्रॉमिस डेला आपल्या मित्र किंवा मैत्रिणीला काही प्रॉमिस करण्याऐवजी आपल्या आईवडिलांना त्यांचा सांभाळ करण्याचे प्रॉमिस करू शकतो. चांगले शिक्षण घेऊन आपल्या पायावर उभे राहून त्यांची जबाबदारी घेण्याचे प्रॉमिस करता येऊ शकतो. निराधारांना कपडे, खाऊचे वाटप करून त्यांना आधार दिला जाऊ शकतो. हक डेला वृद्धाश्रमात जाऊन त्यांना प्रेमाचे आलिंगन देऊन त्यांना दिलासा देता येईल.

व्हॅलेंटाईन डे विशेष करून तरुणांमध्ये जास्त साजरा केला जातो. हा दिवस साजरा करणारे तरुण-तरुणी शक्यतो महाविद्यालयात शिक्षण घेणारे असतात. म्हणजेच कोणीही कमावणारे नसतात. याचाच अर्थ असा होतो की, ही मुलं आपल्या आई-वडिलांच्या जीवावर असे डे साजरे करत असतात. आपले आई-वडिल मुलांना चांगल्या शाळेत शिकायला पाठवतात. सगळ्याच पालकांची सारखीच परिस्थिती नसते. काही पालक मेहनत करून आणि पैशांची जमवाजमव करून आपल्या मुलांना शिक्षण देत असतात. मात्र ही तरुण पिढी अशा डेंच्या नावाखाली उधळपट्टी करताना दिसून येतात. काही तरुण इतरांसारखे मैत्रिणीला महागडे व्हॅलेंटाईन गिफ्ट देण्यासाठी चुकीच्या मार्गाला जातात. वडिलांच्या पाकिटातून पैसे चोरणे,



घरातील महागडी वस्तू परस्पर विकणे अशा घटना आपल्याला ऐकायला मिळतात. अशा या गुन्हेगारी कृत्य करण्यास प्रवृत्त करणाऱ्या या डेची गरज असल्याचे वाटत नाही.

फेब्रुवारी हा महिना परीक्षेचा कालावधी असतो. मात्र, या दिवसात या डेमुळे अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या शैक्षणिक वातावरण बिघडले जाते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होऊन त्यांचे भवितव्य बिघडले जाते.

गंभीर बाब तर ही आहे की, व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने प्रेम व्यक्त करण्यापेक्षा शारीरिक आकर्षणाचा देखावा करण्यात येतो. अशी परिस्थिती सध्या आहे. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे, हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने तरुण-तरुणी बगीचे, समुद्रकिनारी, हॉटेल्स किंवा रस्त्यातही गळ्यात गळे घालून बसलेले दिसून येतात. या चार दिवसांमध्ये तरुणी आपल्या मित्राच्या प्रेमळ दिखाव्याला भुलून लैगिक अत्याचाराला बळी पडतात. अशी अनेक उदाहरणे आजवर उघडकीस आली आहेत, प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात.

प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे. मात्र प्रेमाच्या नावाखाली गुन्हेगारी कृत्य करण्यास प्रवृत्त करणाऱ्या, अनैतिक कृत्यास प्रोत्साहन देणाऱ्या या डेची भारतात गरज आहे असे वाटत नाही.

लोकसंसद

## दिलासादायक! अकृषिक (एनए) परवानगीची अट रद्द!



राज्यातील जमिनींचे हस्तांतरण सुलभपणे व्हावे आणि बांधकाम प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य जमीन महसूल कायद्यात मोठा बदल करण्यात आला आहे. आता निवासी, वाणिज्य, व्यावसायिक इत्यादी कोणत्याही कारणांसाठी करण्यात येणाऱ्या बांधकाम ाकरिता आवश्यक असणारी आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात येणारी जमिनीच्या अकृषिक (एनए) परवानगीची अट रद्द करण्यात आली आहे. नागरिकांना यापुढे कोणत्याही प्रकारच्या बांधकामांसाठी स्थानिक प्राधिकरणाकडे अर्ज सादर करावा लागेल. एकवेळ अकृषिक शुल्क भरल्यानंतर स्थानिक प्राधिकरणाकडून बांधकाम नकाशाला मंजुरी दिली जाणार आहे. त्यामुळे वेगळ्या अकृषिक परवानगीची गरज भासणार नाही. राज्य शासनाने या संदर्भातील शासन आदेश नुकताच जारी केला आहे. यापूर्वी राज्यात कोणत्याही प्रकारच्या बांधकाम ासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून जमीन अकृषिक परवानगी घेणे आवश्यक होते. जमीन बिनशेती केल्याशिवाय बांधकाम करता येत नव्हते. आता नागरिकांना अकृषिक परवानगीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात हेलपाटे म ारण्याची आणि दीर्घकाळ वाट पाहण्याची गरज नाही. राज्य शासनाकडून वेळोवेळी जमीन महसूल विषयक अनेक जाचक आणि गुंतागुंतीचे कायदे आणि अटी सुलभ करण्याच्या निर्णयांमुळे राज्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# १४ फेब्रुवारी - भारतीयांसाठी 'काळा दिवस'

आतंकवाद हा आजमितीला साऱ्या जगाची डोकेदुखी बनला आहे. स्वातंत्र्यानंतर आजतागायत भारतावर अनेक दहशतवादी हल्ले झाले ज्यामध्ये सहस्रो निरपराध नागरिकांसह, कितीतरी पोलीस आणि सैन्य अधिकारी मारले गेले. १४ मार्च २०१९ या दिवशी पुलवामा येथे झालेला आतंकवादी हल्ला हा सुद्धा त्यापैकीच एक होता. भारतीय तरुण व्हॅलेंटाईन डेच्या गुलाबी वातावरणात रंगलेले असताना जम्मू काश्मीरच्या एका भागात देशासाठी कर्तव्य निभावताना देशाचे ४० तरुण सैनिक शहीद झाले तर शेकडो जण घायाळ झाले. या हल्ल्याने अनेक कुटुंब उध्वस्त झाली. शहिद झालेल्या जवानांना समर्पित आणि या हल्ल्याचा निषेध म्हणून भारत सरकारने १४ फेब्रुवारी हा दिवस यापुढे मकाला दिवसफ म्हणून पाळण्याची घोषणा केली. जैश-ए-मोहम्मद या आतंकवादी संघटनेने या हल्ल्याचे दायित्व स्वीकारले. आदिल अहमद दारचा त्यांनी एक व्हिडीओ प्रसारित केला ज्यामध्ये तो स्वतःला फ़िदायिन म्हणवून घेत आहे. या हल्ल्यानंतर देशभर संतापाची लाट पसरली. आतंकवादी आणि त्यांच्या समर्थकांवर यापुढे कोणतीही कारवाई करण्याचे स्वातंत्र्य देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी यांनी या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांना दिले. जगभरात आजतागायत जे आतंकवादी हल्ले झाले त्यातील सर्वात घातक हल्यांपैकी एक असा पुलवामा हल्याचा उल्लेख केला जातो. यंदाच्या १४ फेब्रुवारीला या घटनेला ७ वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हापासुन दरवर्षी हा दिवस हा देशभरात 'काळा दिवस' म्हणून पाळला जातो. आजमितीला किती तरुणांना या दिवसाविषयी माहित आहे. जगातील अनेक देशांत १४ फेब्रुवारीला साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन डे' हा काही भारतीय सण नाही. तरीही तो देशभरात उत्साहाने साजरा केला जातो. तरुणांमध्ये या दिवसाची अधिक क्रेझ असते. या दिवसाला अधिक रोमँटिक करण्यासाठी वृत्तवाहिन्या, विविध चॅनल्सवर चालणारे डेलीसोप, बॉलिवूड कलाकार आणि त्यानिमित्ताने आपला व्यवसाय चालवणाऱ्या कंपन्या त्यामध्ये भर घालत असतात. भारतात या दिवशी प्रेमाच्या नावाखाली स्वैराचारच अधिक चालत असल्याचे मागील काही वर्षांतील घटनांवरून लक्षात आले आहे. या दिवशी गर्भनिरोधक साधनांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. हॉटेल्स, लॉज या दिवशी गजबजलेले असतात, यावरून प्रेमाच्या नावाखाली आपल्याकडे काय चालते हे लक्षात येईल. प्रेमाला आजतागायत भारतीय संस्कृतीने कधीच विरोध केलेला नाही. जगाच्या पाठीवरील निरपेक्ष आणि निस्सीम प्रेमाचे सर्वोत्तम उदाहरण द्यायचे झाल्यास भगवान श्रीकृष्ण आणि राधाराणी यांच्या नात्याचा उल्लेख करावा लागेल. प्रेम म्हणजे काय हे जाणून घ्यायचे आहे त्याने एकदा तरी भागवत वाचावे. प्रेमाच्या नावाखाली या दिवशी चालणारा बाजार कित्येक मुलींचे आयुष्य उध्वस्त करतो. व्हेलेंटाईन डे नंतर पुढील २-३ महिन्यांत गर्भपात करून घेणाऱ्या अविवाहित मुलींचे प्रमाण कमालीचे वाढलेले असते. भारतीय संस्कृतीला न शोभणाऱ्या या दिवसाचे भारतात एव्हढे स्तोम कशासाठी? १४ फेब्रुवारी या दिवशीचे भारताच्या दृष्टीने काय महत्व आहे हे आजच्या महाविद्यालयीन तरुणांना विचारल्यास त्यापैकी ९५ टक्के मुले तरी या दिवशी व्हॅलेंटाईन डे असतो हेच उत्तर देतील, कारण आपले देशाप्रतीचे प्रेम केवळ स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या वर्षातील दोन दिवशीच जागृत झालेले असते. तळपते ऊन, मुसळधार पाऊस आणि कडाक्याच्या थंडीतही समस्त भारतीयांच्या रक्षणासाठी सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या सैनिकांप्रती आपल्या प्रत्येकांत सद्भावना केव्हा जागृत होणार? त्यांच्या त्यागाचे आणि बलिदानाचे मोल आपल्याला केव्हा कळणार ?

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१४ फेब्रुवारी**

१) श्री. शरद नथुराम माहिमकर नागाव, अलिबाग, १४-२-१९४०

२) श्री. अमर गोविंद म्हात्रे नवगाव, अलिबाग, १४-२-१९५२


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. श्री. कलावती भवानजी देढिया स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**



**स्व. श्री. तेजराजजी हिम्मतमलजी नानेशा, पुण्यतिथी अलिबाग**


# अंमली पदार्थ विक्रीचा पर्दाफाश

## • भंगार विक्रीच्या नावाखाली सुरु होता भयंकर प्रकार

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईत भंगार विक्रीच्या नावाखाली चक्रावून टाकणारा प्रकार समोर आला आहे. पोलीसांनाही याची माहिती मिळताच ते ही हादरून गेले आहेत. भंगार विक्रीच्या नावाखाली चक्क अंमली पदार्थांची विक्री केली जात होती. अशा टोळीचा नवी मुंबई अंमली पदार्थ विरोधी पथकाने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत तब्बल २२ लाख रुपये किमतीचे ४३.६ ग्रॅम हिरोईन आणि २६ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई नेरूळ सेक्टर २८ येथील रेल्वे पटरी परिसरात करण्यात आली. या कारवाईनंतर




एकच खळबळ उडाली आहे.

नेरूळ रेल्वे स्टेशनजवळील सार्वजनिक पुलाच्या बाजूला झोपडीत भंगाराचे दुकान होते. तिथे भंगारच विकला जाणार असा सर्वांचा समज होता. पण त्याच्या आत भयंकर प्रकार सुरू होता याचा साधा संशय ही कुणाला आला नाही. याच भंगारच्या आडून सर्रास अंमली पदार्थांची विक्री केली जात होती. याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार चार पोलीस अधिकारी व १५ पुरुष व महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने दुपारी १२.३० वाजता नेरूळ पोलीस ठाण्याच्या मदतीने छापा टाकला. छाप्यात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ आढळून आल्याने संबंधितांना ताब्यात घेण्यात आले.

यामध्ये महिलांसह पुरूषांना अटक करण्यात आली. एकूण सात जणांना या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. त्यात राकेश सचिन वाघरी, राजेंद्र भीमा काळे, अनिता संजय पवार, राजू बाबू राठोड, शिवराज लक्ष्मण पवार, कमळाबाई बाबू राठोड आणि सुमन राजू राठोड या आरोपींचा समावेश आहे. सर्व आरोपी हे नेरूळ रेल्वे स्टेशन सार्वजनिक पुलाजवळील झोपडीत वास्तव्यास होते. त्यांच्याविरोधात नेरूळ पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, मुख्य आरोपी राजू राठोड याच्यावर यापूर्वीही नेरूळ पोलीस ठाण्यात विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणातील विशाल आणि गंगा काळे हे दोघे फरार असून त्यांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. तसेच आरोपी राजू राठोड याचे भंगार दुकान अनधिकृत जागेवर असल्याने ते तिथून काढून टाकण्या बाबत नवी मुंबई महानगरपालिकेशी पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. नवी मुंबईत अंमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई सुरू असून अशा बेकायदेशीर धंद्यांविरोधात कारवाईचा धडाका कायम राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील आडी महाड खाडी वरचीवाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. स्वयंभू मंदिरात सकाळी अभिषेकाने उत्सवाची सुरुवात होणार असून दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजता स्वयंभू मंदिरात अभिषेक व महाआरती होईल. त्यानंतर ११.३० वाजता तीर्थप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता हळदीकुंकू कार्यक्रम, तर दुपारी ३ वाजता गावातून पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. संध्याकाळी ६ वाजता महाआरती, रात्री ७ वाजता मान्यवरांचे स्वागत समारंभ, रात्री ८.३० वाजता महाप्रसाद आणि रात्री ९.३० वाजता मनोरंजन कार्यक्रम होणार आहे. तसेच सोमवार दि.१६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.०० वाजता सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली असून रात्री ८ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाचे आयोजन ग्राम विकास मंडळ आडी (वरची वाडी), बाल मित्र मंडळ (मुंबई) आणि शिवशक्ती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

## क्षत्रिय मराठा कदम परिवाराचे वार्षिक कुलसंमेलन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

प्राचीन कदंब राजवंशाचा इतिहास समाजाला कळावा तसेच राज्यभरातील कदम कुटुंबियांना नोकरी व्यवसायात सहकार्य मिळावे, घराण्यातील नामवंतांचा सन्मान करणे ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून, क्षत्रिय मराठा कदम परिवार या संस्थेने आजतागायत सात राज्यस्तरीय कुलसंमेलनांचे आयोजन केले आहेत. यंदाचे आठवे राज्यस्तरीय कुलसंमेलन ऐतिहासिक कांगोरीगडाच्या पायथ्याशी वसलेल्या वडघर बुद्रुक या गावामध्ये २१ व २२ फेब्रुवारी रोजी होणार असून, महाराष्ट्रासह गोवा, मध्यप्रदेश, बडोदा, तेलंगणा आणि इतर राज्यातूनही मान्यवर संमेलनात उपस्थित राहणार आहेत.

व्यवसाय तसेच विविध कारणांमुळे विविध ठिकाणी वास्तव्यास असलेल्या कदम घराण्यातील व्यक्ति या कुलसंमेलनानिमित्ताने एकत्र येणार असून, घराण्याचा जाज्वल्य वारसा जपण्याचा मानस या मेळाव्यातून केला जाणार आहे. या कुलसंमेलनाच्या पहिल्या दिवशी २१ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी सात वाजता कुलदेवता श्रीतुळजाभवानीचा जागर गोंधळ तसेच मागील स्नेहसंमेलनाच्या छायाचित्रांचा स्लाईड शो दाखवला जाणार आहे. तसेच रविवार २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ग्रामदेवता जननी देवी दर्शन, पवित्र कदंब वृक्षाचे पूजन त्यानंतर कदम कुळाचे ध्वजारोहण करण्यात येणार आहे. तसेच पोलादपूर तालुक्यातील सुप्रसिद्ध उद्योजक, उद्यानपंडित पुरस्कार विजेते रामचंद्र रावजी कदम शेठ यांच्या चरित्रपर लिहिलेल्या 'शून्य ते शिखर' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. याप्रसंगी आखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. सतीश कदम, सुप्रसिद्ध उद्योजक मनोज कदम, कोकण इतिहास परिषद सदस्य प्रवीण कदम, डॉ. सदानंद गावडे कदम, मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष कुमार कदम आणि मोडीलिपी अभ्यासक सुनील कदम या मान्यवरांची व्याख्याने होणार आहेत.

## दोन लाचखोर तलाठी ताब्यात

**पालघर :** जिल्ह्यातील जव्हार तहसीलमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करत दोन ग्राम महसूल अधिकाऱ्यांना (तलाठी) लाच घेताना रंगेहाथ अटक केली आहे. गजानन नागेश जोहरे (४०) आणि सीताराम विष्णू इंधन (२५) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून ही कारवाई मंगळवारी (दि.११) दुपारी जव्हार येथे करण्यात आली. तक्रारदाराच्या नावावर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झाले आहे. या घरकुलाच्या बांधकामासाठी तक्रारदाराने नवीन ट्रॅक्टर खरेदी केला होता. संबंधित ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी ट्रॅक्टर जप्त न करण्यासाठी तसेच कामात अडथळा न आणण्यासाठी प्रत्येकी १० हजार रुपये अशी एकूण २० हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर येथे करण्यात आली होती. तक्रारीची पडताळणी करून सापळा रचण्यात आला. त्यानुसार मंगळवारी संध्याकाळी तक्रारदाराकडून २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना दोन्ही अधिकाऱ्यांना रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईदरम्यान आरोपींचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून त्यांच्या घरांची झडती घेण्यासाठी स्वतंत्र पथके पाठवण्यात आली आहेत. तसेच, या प्रकरणी जव्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# फडके विद्यालयात बटरफ्लाय गार्डनचे उद्‌घाटन

## फुलपाखरांच्या सानिध्यात घडणार विद्यार्थ्यांचे निसर्गप्रेम

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेचे जतन करण्याच्या उद्देशाने, नवीन पनवेल येथील फडके विद्यालयात नवनिर्मित बटरफ्लाय गार्डनचा (फुलपाखरू उद्यान) उद्‌टन सोहळा अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना निसर्गाच्या जवळ नेणारा हा अनोखा उपक्रम जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे.



निसर्ग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि बग लेडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. शुभलक्ष्मी यांच्या हस्ते फीत कापून या उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले. या विशेष सोहळ्यासाठी कृषीरत्न पुरस्काराने सन्मानित चंद्रशेखर भडसावळे आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पुरणसिंग मेहरा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात चंद्रशेखर भडसावळे यांच्या हस्ते उद्यानाच्या माहिती फलकाचे अनावरण करून झाली, तर पूरणसिंह मेहरा यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून उपक्रमाचे अधिकृत उद्धाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी फुलपाखरांचे जीवनचक्र, त्यांचे पर्यावरणातील महत्त्व आणि निसर्ग साखळीतील त्यांचे स्थान यावर प्रकाश टाकला. ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सोहळ्यास शाळा समितीचे महामात्र डॉ. रविकांत झिरमिटे, हितचिंतक शुक्ल, सर्व विभागांच्या मुख्याध्यापिका, पालक प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने हितचिंतक उपस्थित होते. साधारणपणे इयत्ता १ ली ते ७ वीचे साडेचारशेहून अधिक विद्यार्थी या सोहळ्याचे साक्षीदार झाले.

## दोन श्वानांना विष घालून मारले

**पनवेल :** नेरे गावात एका माथेफिरूने दोन भटक्या श्वानांना विष घालून मारले. नेरे गावाजवळ असलेल्या कृष्णा किराणा दुकानाच्या परिसरात दोन भटक्या श्वानांचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे आढळले. येथील रहिवासी अनुराधा पासी (३६) यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात धाव घेत याबाबत माहिती दिली. पोलिसांनी घटनेची गंभीर दखल घेऊन माथेफिरूविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच या घटनेतील दोषींचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

## भरधाव टेम्पोची स्कूल बसला धडक



**पनवेल :** पुणे-मुंबई हायवेवर पारपुंड गावाजवळील वेलकम हॉटेलच्या समोरील रस्त्यावर गुरुवारी (दि.१३) भरधाव टेम्पोने स्कूल बसला धडक दिली. चालक संदीप मोहिते हा त्याच्या ताब्यातील स्कूल बस घेऊन जात होता. याचवेळी समोरुन आलेल्या टेम्पोचालक मिलींद सपकाळ (वय ४३,रा.मुंबई) याने गाडी हयगयीने चालवून समोरुन स्कूल बसला जोरात धडक दिली. या अपघातात स्कूल बसमधील ८ वर्षीय मुलगी तसेच १६ वर्षीय मुलगा हे दोघे जखमी झाले आहेत. तसेच स्कूल बसचेसुद्धा नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून टेम्पो चालकाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## गुरु तेग बहादूर साहिब यांचा शताब्दी महोत्सव

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

हिंदू धर्माच्या रक्षणासाठी आणि मानवी मूल्यांसाठी सर्वोच्च बलिदान देणारे शिखांचे नववे गुरु, गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या प्रकाश पर्व (शताब्दी महोत्सव) निमित्त नवघर शाळेत भव्य रॅली आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी (दि.१२) पार पडलेल्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी गुरुंच्या जीवनकार्याचा आदर्श घेतला.



याप्रसंगी भार्जे येथील गुरुद्वाराचे गुरु श्री बचित्तरसिंग यांनी प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गुरु तेग बहादूर साहिब यांचे बालपण, त्यांचे आध्यात्मिक जीवन आणि अन्यायाविरुद्धचा लढा यावर त्यांनी प्रकाश टाकला. औरंगजेबाच्या जुलूमाविरुद्ध त्यांनी दिलेला लढा आणि काश्मिरी पंडितांच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान यामुळेच त्यांना हिंद दी चादर (हिंदुस्थानचे रक्षण करणारे कवच) असे का संबोधले जाते, हे त्यांनी सोप्या शब्दांत उलगडून सांगितले. व्याख्यानानंतर बचित्तरसिंग यांनी सांगितलेल्या माहितीवर आधारित विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा घेण्यात आली. या प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना जागीच भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळाला.

या कार्यक्रमाला रिओप्लास्टचे व्यवस्थापक सुखविंदर सिंग, तसेच गुरु बच्चन सिंग आणि गुरुद्वाराचे ग्रंथी ग्यानी जी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

**मुंबईच्या लोकलला वंदे मेट्रोची साथ लाभणार | प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित होणार**

# उपनगरीय प्रवासाचा चेहरा-मोहरा बदलणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गेल्या १०० वर्षात मुंबई लोकलमध्ये मोठे बदल झाले. मुंबईभरात लोकलचं जाळं तयार झाल्यामुळे पर्यटकांना एकाच दिवसात १०० किलोमीटरहून अधिक (ये-जा) प्रवास करता येतो. गेल्या काही वर्षांपासून मुंबईतील लोकल सेवेवरील ताण वाढत आहे. दरम्यान मुंबईच्या लोकलला वंदे मेट्रोची साथ लाभणार आहे. त्यामुळे येत्या काही वर्षात मुंबई लोकलचं बदललेलं रुप पाहता येणार आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळ मुंबईच्या उपनगरीय नेटवर्कसाठी २,८५६ वंदे मेट्रो डब्यांची खरेदी करणार आहे. यामुळे मुंबईकरांचा दैनंदिन प्रवास अधिक आधुनिक, वेगवान आणि सुरक्षित होणार आहे.



मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट टप्पा ३ आणि ३- अंतर्गत एकूण २३८ वंदे मेट्रो एसी लोकल गाड्या घेतल्या जातील. प्रत्येक गाडी १२ डब्यांची असेल. या गाड्यांमध्ये वॉक-थ्रू डिझाइन असेल, ज्यामुळे प्रवासी एका डब्यातून दुसऱ्या डब्यात सहज जाऊ शकतील आणि गर्दीचे विभाजन होईल. तसेच आरामदायी कुशन सीट्स, दिव्यांगांसाठी विशेष जागा आणि मोठ्या खिडक्या असतील.

कंत्राट दिल्यानंतर अडीच वर्षांत पहिली प्रोटोटाइप गाडी येण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर यशस्वी चाचण्या झाल्यावर पुढील ४ ते ६ वर्षांत सर्व गाड्यांचा पुरवठा केला जाईल. या लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे असतील, ज्यामुळे फूटबोर्डवरून होणारा प्रवास थांबेल.

याशिवाय सीसीटीव्ही कॅमेरे, धूर आणि आग शोधणारी यंत्रणा आणि आपत्कालीन टॉक-बॅक सिस्टम असेल. मुंबईच्या हवामानाचा विचार करून लोकल सेवा या वॉटरप्रूफ आणि गंज-रोधक बनवल्या जातील. या गाड्यांचा ताशी वेग १३० किमीपर्यंत असू शकतो. यामध्ये प्रवाशांसाठी यूएसबी चार्जिंग पोर्ट, वाय-फाय आणि डिजिटल रूट मॅप यांसारख्या आधुनिक सुविधा असतील.

मेक इन इंडिया मोहिमेचा भाग असलेल्या या वंदे मेट्रो गाड्यांमुळे मुंबईतील लोकल प्रवासाचा दर्जा उंचावणार असून प्रवाशांना जागतिक दर्जाचा अनुभव मिळेल, असा विश्वास रेल्वे अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# निवडक



## मुरुडच्या बाजारात रताळी दाखल

**आगरदांडा :** मुरुड शहरातील मुख्य बाजारपेठेत महाशिवरात्री उपवासासाठी कोर्लईची रताळी बाजारात दाखल झाली आहेत. रताळी घेण्यासाठी शहरातील पंचक्रोशी भागातील नागरिकांनी गर्दी केली आहे. येत्या रविवारी दि.१५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री उत्सव असून हा उत्सव सर्व हिंदू धर्मीय उत्सवात साजरा केला जातो. यानिमित्त अनेकजण उपवास करत असतात. या उपवासाकरिता रताळी मुख्य पदार्थ असून ती आवडीने खाल्ली जातात. ही रताळी तालुक्यातील कोर्लेई या ठिकाणी पिकवली जातात. ही रताळी गोड, चविष्ट व पौष्टिक असन याला मागणी भरपूर असते. ही रताळी विकण्यासाठी दोन दिवस बाजारपेठेतील कारेकर गल्लीत मंडप करुन ३० ते ४० कोर्लेई गावातील महिला रताळी रोज विक्री करीत असतात. यामध्ये छोटी रताळी १२० रुपये किलो, मोठी व चांगली रताळी १६० किलो दराने तर कोनफळ १०० रुपयाने विकली जातात. या व्यवसायामधून चांगले आर्थिक उत्पन्न महिलांना मिळत आहे.



## विश्वधर्मी विश्वनाथ सभागृहाचे उद्‌घाटन

**चिरनेर :** उलवे येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या विश्वधर्मी विश्वनाथ सभागृहाचा उद्‌घाटन समारंभ उत्साहात पार पडला. माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, सहचारणी उषा विश्वनाथ कराड यांच्या प्रमुख उपस्थितीबरोबर पद्मश्री परशुराम गंगावणे यांच्यासह माईर्स एमआयटीच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे यांच्या हस्ते हा उद्‌घाटन सोहळा पार पडला. आजच्या आधुनिकतेच्या काळात भारतीय ज्ञान-परंपरा व आधुनिक शिक्षणाची सांगड घालणारी आणि विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कृती व भारतीय मूल्ये रुजवणारी शाळा म्हणजे एमआयटी विश्वशांती गुरुकुल आहे, असे गौरउद्गार गंगावणे यांनी यावेळी बोलताना काढले. याप्रसंगी पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक राजेंद्र पाटील, उषा विश्वनाथ कराड, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या प्रकल्प संचालिका प्रा. प्रभा कासलीवाल, अण्णासाहेब टेकाळे, विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या मुख्याध्यापिका अंशू सक्सेना, कडेमिक हेड शीतल वर्मा, मार्केटिंग व ऑपरेशन्स हेड प्रा. के.सी. मिश्रा उपस्थित होते.



## उल्का महाजन यांना कुसुम पुरस्कार

**पाली/गोमाशी :** आंतर भारती शिक्षण मंडळ कोल्हापूर व पाटगावकर कुटूंबियांच्या वतीने कुसुम पुरस्कार सर्वहारा जन आंदोलनाच्या संस्थापिका उल्का महाजन यांना प्रदान करण्यात आला. गुरुवारी (दि.१२) प्रबोधनकार इंद्रजित देशमुख यांच्या हस्ते त्यांना शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्वातंत्र्यसैनिक चंद्रकांत पाटगावकर, साने गुरुजी अशा थोर व्यक्तीच्या नावाने मिळालेल्या पारितोषिकाने नव्या काळातील दुसऱ्या स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय राहण्याची ऊर्जा दिली. हा आनंद सर्वहारा जनआंदोलनाच्या सोपान सुतार शेजारी संजीव पारीख, संजीव पाटगावकर, जीनस्त रोटे, मुचेता कोरगावकर, पालवी कोरगावकर, सुचेता पडळकर, एम. एस. पाटोळे यासर्व कार्यकर्त्यांसमवेत सामूहिकपणे स्वीकारत आहोत, अशा भावना सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी यावेळी व्यक्त केल्या.

## शिवजयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**आगरदांडा :** मुरुड तालुक्यातील मजगावच्या शिवप्रेमी मित्र मंडळातर्फे दि.१९ फेब्रुवारी रोजी साजऱ्या केल्या जाणाऱ्या शिवजयंतीचे औचित्य साधून शिवरायांचे विचार यावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना मंडळातर्फे पारितोषिके देऊन गौरविण्यात येईल. या स्पर्धा १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मजगावच्या विठ्ठल मंदिर आगरआळी सभागृहात घेण्यात येणार आहे. स्पर्धा तीन गटात घेण्यात येणार आहे. गट पहिला- पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथी विषय शिवछत्रपतींचे विकसित बालपण व त्याची पुढील पिढीसाठी मिळणारी प्रेरणा, वेळ-३ मिनिटे. गट दुसरा इयत्ता पाचवी ते आठवी विषय श्री शिवछत्रपतींचा शिवराज्याभिषेक व त्याचे दूरगामी झालेले परिणाम, वेळ-४ मिनिटे. तर तिसरा गट इयत्ता नववी ते बारावी- विषय श्री शिवछत्रपती झालेच नसते तर? यासाठी वेळ पाच मिनिटे असणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १५ फेब्रुवारीपूर्वी नोंदणी करणे अत्यावश्यक आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी आशिष बुल्लू मो.- ८२३७२७५६६८ यांच्याशी संपर्क साधावा.

## ऑनलाईन सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

**पालघर :** नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एस्कॉर्ट सर्विसच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे परिमंडळ-१ चे पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण यांना मुंबईतील एका स्वयंसेवी संस्थेकडून मिळाली होती. माहितीनुसार आरोपी महिला दलाल ग्राहकांना मुलींचे फोटो पाठवून त्यांच्याकडून गुगल पेद्वारे ऑनलाईन पैसे घेत असे आणि त्यानंतर मुली पुरवत असे. पोलीस उप आयुक्त राहुल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाण्याच्या पथकाने बोगस ग्राहक पाठवून सापळा रचला. यावेळी पोलिसांनी छापा टाकून एका महिला दलालला ताब्यात घेतले आणि दोन पीडित मुलींची सुटका केली. अटक केलेली महिला आणि मुंबईतील मुख्य सूत्रधार महिला गेल्या एक वर्षापासून मुंबई, वसई-विरार आणि मिरा-भाईंदर परिसरात हे रॅकेट चालवत होत्या. या टोळीने आतापर्यंत किती मुलींना या व्यवसायात ढकलले आहे आणि त्यांचे जाळे किती मोठे आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. अटक करण्यात आलेल्या आणि फरार आरोपी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, सुटका करण्यात आलेल्या दोन्ही मुलींना महिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# रेवदंडा -मुरुड एसटी सकाळी सुरू करण्याची मागणी

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथून सकाळी ६.१५ वा.सुटणारी अलिबाग -मुरुड एस.टी. गाडी भरुन येत असल्याने रेवदंडा येथून सकाळी सातच्या दरम्यान रेवदंडा-मुरुड गाडी सुरु करण्याची मागणी जोर धरत आहे.



गेल्या काही महिन्यांपासून या मार्गावर सकाळच्या वेळेत येणारी अलिबाग - मुरुड गाडी भरुन येत असल्याने रेवदंडा, कोर्लई, बोर्ली मांडला, काशिद, नांदगाव, मजगांव येथील शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी आणि आयटीआय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच ऐन परीक्षेच्या काळात त्रास व हाल सहन करावा लागत आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाने व मुरुड आगार प्रमुख यांनी यात तातडीने लक्ष पुरवून सकाळी सातच्या दरम्यान रेवदंडा-मुरुड गाडी सुरु करण्याची मागणी जोर धरत आहे.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०३ (तीन) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे-टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| फिरोज कावस टिटिना | १७ | ३/अ | २-०६-०० | १ | ६२ |
| | या पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे १ आर ६६ पॉ ०० मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-१४/०२/२०२६

---

### PUBLIC NOTICE

This is to declare that M/s. Nouryon Chemicals India Pvt. Ltd. located at E- 18, 19, 20 & C 61(Part/ Part) MIDC Area, Mahad-Raigad, Maharashtra, PIN: 402302 has been accorded Environmental Clearance, Vide No. EC25B2412MH5544540N dated 22/12/2025 by the Ministry of Environment, Forest and Climate Change, Government of India [issued by the State Environment Impact Assessment Authority (SEIAA), Maharashtra], under Schedule 5(f) of the EIA Notification, 2006 and its subsequent amendment viz. Synthetic Organic Chemicals Industry.

A copy of the Environmental Clearance letter is available on the MOEF&CC, GOI Website: https://parivesh.nic.in/

M/s. Nouryon Chemicals India Pvt. Ltd. E-18, 19, 20 & C 61 (Part/ Part) MIDC Area, Mahad-Raigad, Maharashtra, PIN: 402302,

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे-देऊळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| १) जगदीश के गंगर<br>२) हसमुख तेजमल अग्रवाल<br>३) शाहीद हुसेन रुवाला<br>४) मंगुलीका हसमुख अग्रवाल | १३ | १ | ०-३०-१० | २ | ०६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-१४/०२/२०२६

---

### सार्वजनिक सूचना

संबंधितांना सुचना करणेत येते की, नोरयॉन केमिकल्स इंडिया प्राइवेट लिमिटेड प्लॉट नं. ई- १८, १९, २० आणि C-६१ (भाग/भाग), एमआयडीसी क्षेत्र, महाड-रायगड, महाराष्ट्र, पिन कोड: ४०२३०२ यांना पर्यावरण मंजुरी पत्र क्रमांक EC25B2412MH5544540N दिनांक २२/१२/२०२५ रोजी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार कडून राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) यांचेमार्फत जारी, EIA अधिसूचना, २००६ आणि त्यानंतरच्या सुधारित अधिसूचनेंतर्गत ५(f) म्हणजेच सिंथेटिक ऑर्गेनिक केमिकल्स उद्योग साठी प्रदान करण्यात आले आहे.

पर्यावरण मंजुरी पत्राची प्रत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे https://parivesh.nic.in/

नोरयॉन केमिकल्स इंडिया प्राइवेट लिमिटेड
ई-१८, १९, २० आणि C-६१ (भाग/भाग), एमआयडीसी क्षेत्र, महाड-रायगड, महाराष्ट्र, पिन कोड: ४०२३०२

---

अर्जदाराचे वकील- श्री. पुष्कर धनदास मोकल
प्रोसेस जमा रु. ५०/-

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात**

दि.चौ. अर्ज क्र. १९३/२०२५

१. श्रीमती जागृती जितेंद्र घरत,
उ.व.४०, धंदा - गृहिणी,
आधार नं. ३१२५ ८८०५ ३५७५
मो.नं. ९३२४३९३५३४
२. कुमारी सृष्टी जितेंद्र घरत,
उ.व १७, धंदा - शिक्षण, — अर्जदार
आधार नं. २१४६ ०११९ ८२७४
३. कुमारी मनस्वी जितेंद्र घरत,
उ.व.१५, धंदा - शिक्षण,
आधार नं. ३४०२ ६३३१ ६४७१
४. कुमार नक्ष जितेंद्र घरत,
उ.व. ९, धंदा - शिक्षण,
आधार नं. ८९५९ ०५३१ ०१०१
अर्जदार नं. १ स्वतःकरीता व
अर्जदार नं. २ ते ४ यांची अ.पा.क. आई,
अर्जदार सर्व रा. खारपाडा,
ता. पेण, जि. रायगड
विरुध्द
कुणीही नाही

ज्याअर्थी सदरील अर्जदार यांनी या न्यायालयात ते कै. जितेंद्र धनाजी घरत यांचे वारस आहेत असा दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे व त्यामध्ये ते कै. जितेंद्र धनाजी घरत यांचे वारस आहेत व इतर कोणीही वारस नाहीत, असे कथन केले आहे. कै. जितेंद्र धनाजी घरत हिच्या जंगम मिळकतींचा तपशील खालील प्रमाणे-

२. अर्जदार यांची आई कै. महानंदा शेषराव कराड हिचे मृत्युसमयी तिचे नावे स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा पेण, ता. पेण, जि. रायगड येथे खालील प्रमाणे जंगम मिळकत आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

अ) जंगम मिळकतीचा तपशिल पुढील प्रमाणे

कै. जितेंद्र धनाजी घरत यांना त्यांचे मृत्युपश्चात रायगड जिल्हा सिक्युरीटी गार्ड बोर्डाकडुन रक्कम रुपये ४,७६,४२४/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख शहात्तर हजार चारशे चोवीस मात्र) आणि ग्राच्युईटी रक्कम रुपये ६६,५७०/- (अक्षरी रक्कम रुपये सहासष्ट हजार पाचशे सत्तर मात्र) अशी एकुण रक्कम रुपये ५,४२,९९४/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख बेचाळीस हजार नऊशे चौऱ्यान्नव मात्र) प्राप्त होणार आहे.

त्याअर्थी सदर कै. महानंदा शेषराव कराड हिला अर्जदार हेच वारस आहेत दाखला देणेस कोणाचीही कसलीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसांचे आत सदर न्यायालयात हजर होऊन लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणी उपस्थित न केल्यास अर्जदार यांचे लाभात वारस दाखला देण्यात येईल. व त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

अलिबाग
तारीख

न्यायालयाच्या आज तारीख - १२/०२/२०२६ रोजी आमच्या सही शिक्यानिशी दिली.

सही/- (वरिष्ठ/कनिष्ठ लिपीक) दिवाणी न्यायाधिश व. स्तर अलिबाग
सही/- अधिक्षक दिवाणी न्यायाधिश व स्तर अलिबाग

---

### हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री विनायक हरिश्चंद्र पाटील मु. पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या वारसा हक्काच्या व खुद्दमालकीच्या व ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | जुना गट नं. | क्षेत्र. (हे. आर.) | आकार |
|---|---|---|---|---|
| झिराड ता. अलिबाग | ९४ | - | १-३३-०० | १.९० |
| | ९५ | - | ००-७१-३० | ७.५५ |
| | ९७/१ | ९८ | १-३८-८० | ५.९० |
| | ९८ | ९९ | ००-०४-५० | ०.४५ |
| | ९९ | १०० | ०-७५-४० | ८.६५ |
| | १०० | १०१ | ०-०४-०० | ०.०५ |
| | १०१ | १०२ | ०-३०-४० | ४.५० |
| | १०७ | १०८ | ०-६६-४० | ६.३५ |
| | ११२ | ११३ | ०-४६-०० | १.०५ |

सदर वर वर्णनांकित मिळकती आमचे अशिल श्री. विनायक हरिश्चंद्र पाटील, यांचे वारसा हक्काच्या तसेच मालकी व ताबेकब्जा वहिवाटीची असून सदर वर नमुद मिळकती आमच्या अशिलांचा ताबेकब्जा व वहिवाट हक्क व मालकी असताना आमच्या अशिलांचा हक्क डावलून परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे व त्याबाबतचा विक्रीचा करारनामा करणार असल्याने आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये, त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत राहील. याउपरही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचनचिठ्ठी, सामंजस्य करार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक .../०२/२०२६

सही/-
**ॲड. स्वप्निल सु. पाटील**
वायशेत, अलिबाग रायगड
मो. ९७६४९०४७४८

---

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे कोप्रोली, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. महेश हरिभाउ गोंधळी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. दत्तात्रेय गोविंद चोगले यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| गाव | सर्व्हे नं./गट न./हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कोप्रोली | ६५/६ | ०.०४.५०<br>पो.ख. ०.००.००<br>०.०४.५० | ०.८७ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी, वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि. १४/०२/२०२६

सही/-
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९

---

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- मुले/मुली पाहिजेत. जय संतोषी मां. पंप, वाडगाव फाटा, सीएनजी पंप, मो. ९१३०५४४१२८, ८४११००९९९९
- नामांकित FM.GG कंपनीसाठी PSR आणि सेल्समन पाहिजे, आकर्षक पगार+ इंन्सेटीव्ह संपर्क :९८८१४१८४४८/०२१४१२२३०६
- कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे– १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे १) उरण–उलवा २) पेण पोयनाड ३) माणगाव–महाड–बिरवाडी, पोलादपूर, कर्जत/खोपोली, २) डिलेवरी एस.टी.ने अथवा बाईकने (पेण–अलिबाग) (रेवदंडा–मुरुड–अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर (मुलगी) पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. संपर्क– ८८८८२२०२२१.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-धामोते ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं./ प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री. रायसिंग मनमोहनसिंग अहुजा | १२१/१२ | २२१०.०० चौ.मी. | ००.०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

रायसिंग मनमोहनसिंग अहुजा

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत,
जि. रायगड फोन नं. ९८८१२७९८१७

---

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागि[…] नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक श्री. मारुती नारायण भोकटे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

**मौजे - चेवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| २६ | ३ | ०-३९-००<br>पो.ख. ०-०३-०० | ०-५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

---

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात मौजे अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ए ८९७, बी ८९७, के ८९७, ए ८९८, बी ८९८, के ८९८, ८९८/१, ८९८/२, ९००/ए/१, ८९९, ९००/के/ए (९०० इ), ९००/१, ९०१, ९००/के/सी, ९००/ए/४, ९००/ए/३, ९००/के/बी, ९००/ए/२, ९००/२, ९००/ए/३, ९०४/१, ९०२ वर उभारण्यात आलेल्या कुबेराक्षे बिल्डींग क्र. ०१ मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. सी/२०५, क्षेत्र ३०.७५ चौ.मी. कारपेट व २.६९ चौ.मी. कारपेट एकूण क्षेत्र ३३.४४ चौ.मी. ही प्राची योगेश म्हात्रे व योगेश शरदचंद्र म्हात्रे यांचे नावे व ताबेकब्जा वहिवाटीत असलेली सदनिका विकत घेण्याचे ठरविले आहे.

संदर्भित निवासी सदनिकेवर बँक ऑफ इंडिया चोंढी व्यतिरिक्त अन्य कुणाचेही कर्ज नसून त्याव्यतिरिक्त संदर्भित निवासी सदनिका मिळकत ही पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, अखत्यारपत्र, बक्षिस, ताबा, बोजा, असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत खाली सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन आमची खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १३.०२.२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु. नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९८२२१८६७४०

---

### पाली नगरपंचायत

ता. सुधागड, जि.-रायगड. पिन-४१०२०५
ईमेल- Palinagarpanchayat2021@gmail.com

जावक क्र.-बांवि/:१८०१/२०२६ — दिनांक :- १३/०२/२०२६

**जाहीर निविदा सूचना**

पाली नगरपंचायत जि. रायगड यांस कडून खालील कामांसाठी राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गातील नोदणीकृत अनुभवी व इच्छुक ठेकेदाराकडून द्विनोंद लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत (ऑफलाईन पद्धतीने)

| अ.. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | निविदा फॉर्म फी | काम करण्याची मुदत | इसारा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाली नगरपंचायत हद्दीत प्रभाग क्र. ४ सावंतआळी येथे बंदिस्त गटार बांधकाम करणे, ता. सुधागड. | ९,९९,५०८/- | १०००/- | ९० दिवस | ९,९९५/- |
| २ | पाली नगरपंचायत हद्दीत प्रभाग क्र. ८ येथे गटाराचे बांधकाम करणे, ता. सुधागड. | ९,९९,७७२/- | १०००/- | ९० दिवस | ९,९९७/- |
| ३ | पाली नगरपंचायत हद्दीत प्रभाग क्र.८ येथे झाकणासहित बंदिस्त गटार बांधणे, ता. सुधागड. | ९,९९,८४७/- | १०००/- | ९० दिवस | ९,९९८/- |
| ४ | पाली नगरपंचायत हद्दीत झाप येथे स्मशानभूमी विकसित करणे, ता. सुधागड. | ९,९९,०९७/- | १०००/- | ९० दिवस | ९,९९०/- |
| ५ | पाली नगरपंचायत हद्दीत प्रभाग क्र.८ अंतर्गत रस्ता करणे. | ९,९९,५६३/- | १०००/- | ९० दिवस | ९,९९५/- |
| ६ | पाली नगरपंचायत हद्दीतील आगरी समाज स्मशान भूमीकडे जाणारा रस्ता काँक्रेट करणे, ता. सुधागड. | ९,९८,१३८/- | १०००/- | ९० दिवस | ९,९८१/- |
| ७ | पाली नगरपंचायत हद्दीतील तळई येथील स्मशान भूमीकडे जाणारा रस्ता काँक्रेट करणे | ९,९९,६३३/- | १०००/- | ९० दिवस | ९,९९६/- |
| ८ | पाली नगरपंचायत हद्दीतील अंबेमाता मंदिर ते महाडकर यांच्या घरापर्यंतचा रस्ता काँक्रेट करणे, ता. सुधागड. | ९,९८,३८२/- | १०००/- | ९० दिवस | ९,९८३/- |
| ९ | पाली नगरपंचायत हद्दीतील तळई येथे सामाजिक सभागृह बांधणे, ता. सुधागड | ९,५६,१९४/- | १०००/- | ९० दिवस | ९,५६१/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

१. निविदा फॉर्म विक्री कार्यालयीन वेळेत दि. १६/०२/२०२६ ते २६/०२/२०२६ पर्यंत सकाळी १०.३० ते ५.३० पर्यंत आवक जावक विभागात राहील.
२. I) निविदे सोबत लखोटा क्र. १ मध्ये तांत्रीक बोलीबाबतची पुढील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
१) महाराष्ट्र राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग वर्गातील नोंदणी प्रमाणपत्र २) इसारा रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष ३) पॅनकार्ड ४) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र ५) कामगार भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र ६) आयकर विवरणपत्र (मागील ३ आर्थिक वर्षे) ७) परिशिष्ट अ मधील प्रतिज्ञापत्र ८) काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र.
II) निविदे सोबत लखोटा क्रं. २ मध्ये अर्थिक बोलीचा लिफाफा सादर करणे आवश्यक आहे.
३. निविदा फॉर्म व इसारा रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष दि.२७/०२/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.
४. निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ४.३० वाजता अथवा कार्यालयाचे प्रशासकीय सोईप्रमाणे उघडणेत येतील.
५. सशर्त निविदा नाकारली जाईल कोणतीही एक निविदा स्विकारणेचा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा अधिकार नगरपंचायत राखुन ठेवला आहे.
६. कामासंबधी अतिरिक्त माहीती नगरपंचायत बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.
७. अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जादा दराची निविदा मंजूर केली जाणार नाहीत.
८. सदर कामांची देयके ही नगरपंचायतकडील उपलब्ध निधीनुसार अदा केले जातील.

**सही/-**
**नगरअभियंता**
**पाली नगरंपचायत, पाली**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**पाली नगरपंचायत, पाली**




## राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित सुवार्ता कानी येईल. भावंडांचं उत्तम सहकार्य लाभेल. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळेल.
- **वृषभ** : किरकोळ वाद उगाच वाढवू नका. प्रवासात मौल्यवान वस्तुंची काळजी घ्यावी. धार्मिक यात्रा घडेल.
- **मिथुन** : रखडलेल्या कामांना गती येईल. आर्थिक देव-घेवीचे व्यवहार मनाजोगे होतील. बाकी चिंता नको.
- **कर्क** : अनुभवींचा सल्ला कामी येईल. नवे करार तुर्तास करू नये. शिक्षण, स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील.
- **सिंह** : स्पर्धांमध्ये यश मिळेल. खर्चाचं प्रमाण वाढलं तरी प्राप्ती तशीच राहील. ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल.
- **कन्या** : सरकारी कामं विलंबानं होतील. स्थावर बाबतीत समाधान लाभेल. व्यवसायात पुरेसं स्थैर्य लाभेल.
- **तूळ** : आज आपल्या हातून महत्त्वाचं कार्य घडणार आहे. प्रगतीच्या संधी लाभतील. धनलाभाचे योग आहेत.
- **वृश्चिक** : चिंता निर्माण करणाऱ्या घटना संभवतात. विचारानं रहायला हवं. छोटा-मोठा प्रवास करावा लागेल.
- **धनु** : सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. मनासारख्या घटना धडल्यानं समाधान लाभेल. विचारानं रहावं.
- **मकर** : महत्त्वाची कामं रखडतील. कर्ज प्रकरणासाठी पाठपुरावा करावा लागेल. अधिक विचार करू नये.
- **कुंभ** : प्रयत्नात आणि प्रत्यक्ष कार्यात सातत्य ठेवावं. जामीन कोणास राहू नका. जुनी येणी वसूल होतील.
- **मीन** : आर्थिक स्थिती उत्तम राहील. मनाजोगी खरेदी करू शकाल. वाहनाचा वापर जपून करावा.

स्टाईल स्टेटमेंट

## स्टायलिश बॉटम्स

✻ ट्राउजर स्टाईल पँटचा ऑप्शनही आहे. अशा पँटमध्ये तुम्हाला खूप आरामदायी वाटतं. आपली आवड आणि कंफर्टचा विचार करून ट्राउजर पँट शिवून घेता येतील.

✻ स्टायलिश आणि ट्रॅडिशनल लूकसाठी कुर्तीसोबत शरारा घालता येईल. यावर लाँग किंवा शॉर्ट यापैकी कोणतीही कुर्ती घालता येईल. लग्नप्रसंगी शरारा आणि कुर्ती कॅरी करता येईल.

✻ पलाझोचा ट्रेंडही सध्या जोरात आहे. विविध स्टाईलच्या, डिझाइनच्या पलाझो बाजारात उपलब्ध आहेत. डिझायनर कुर्त्यांवर प्लेन पलाझो घालता येईल. फॉर्मलवेअर म्हणून पलाझो आणि कुर्ती कॅरी करता येईल.

✻ पार्टी किंवा विशेष प्रसंगी कुर्त्यासोबत लेहंगा स्कर्ट कॅरी करा. यामुळे तुम्हाला हटके लूक मिळेल. अत्यंत आरामदायी अशा या पेहरावात तुम्ही खूप स्टायलिश दिसाल.

## १४ फेब्रुवारी

दिनविशेष

- २०१३ : सहकार क्षेत्रावर परिणाम करणारी केंद्राची ९७ वी घटनादुरुस्ती राज्याने मंजूर केली.
- २०१४ : केजरीवाल यांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा.
- २०१६ : 'मेक इन इंडिया' सप्ताहाअंतर्गत गिरगाव चौपाटीवर आयोजित 'महाराष्ट्र रजनी' कार्यक्रमाचे व्यासपीठ जळून खाक.
- २०१८ : पंजाब नॅशनल बँकेतील मुंबईतील काही शाखांमध्ये ११ हजार ३६० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचं उघड झालं.

सफर देशांची

## बुरुंडीविषयी...

'बुरुंडी' हा आफ्रिकेतला छोटासा देश. 'बुजुंबरा' ही या देशाची राजधानी. जगातल्या खूप गरीब देशांमध्ये बुरुंडीची गणना होते. 'किरुंडी' आणि 'फ्रेंच' या इथल्या अधिकृत भाषा. बुरुंडी चारही बाजूंनी जमिनीने वेढला आहे. टांझानिया, कांगो आणि आरवंडा हे या देशाचे शेजारी. पंधराव्या शतकात बुरुंडीवर 'एमवानी' नावाच्या राजाचं राज्य होतं. १८५६ मध्ये इथे युरोपियन लोकांचं आगमन झालं. पण तेव्हा कोणी बुरुंडीवर राज्य केलं नाही. १८९९ मध्ये जर्मनीने या देशाचा ताबा घेतला. १९१६ मध्ये इथे बेल्जियमची सत्ता आली. एक जुलै १९६२ रोजी बुरुंडी स्वतंत्र झाला. यानंतरही या देशात स्थैर्य नव्हतं. १९९० च्या दशकात बुरुंडीमध्ये अंतर्गत युद्ध पेटलं. बुरुंडीतल्या हुतुस आणि तुटसी या गटांमध्ये बरीच अशांतता निर्माण झाली. हे युद्ध २००६ मध्ये संपलं. यात दीड लाख लोकमारले गेले. आता बुरुंडी काही प्रमाणात सावरलं आहे. या देशाचा बराच मोठा भाग डोंगराळ आहे. पूर्व भाग पठारी असून काही भाग सपाट आहे. इथे थोडे फार उद्योग आहेत. या देशात ब्लँकेट, बूट, साबण तयार होतात. अन्नावर प्रक्रिया करण्याचे उद्योगही आहेत. इथे कॉफी, कापूस, चहा, मका, रताळी, केळी पिकवली जातात.

आरोग्यमंत्र

## वार्धक्याकडे वाटचाल ?

वाढत्या वयात काही काळजी घ्यावीच लागते. याची चर्चा करत असताना आणखी काही मुद्दे दखलपात्र ठरतात.

✻ वाढत्या वयात राग सोडा आणि काळजी करणे थांबवा. गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करा. त्रासदायक परिस्थितीत स्वत:ला गुंतवू नका कारण याच गोष्टी आरोग्य खराब करतात. त्यामुळेच नेहमी सकारात्मक लोकांशी बोला आणि त्यांचे ऐका.



✻ ज्येष्ठत्वाकडे झुकत असताना सर्वप्रथम पैशाची आसक्ती सोडून द्या. तुमच्या आजूबाजूच्या लोकांशी संपर्क साधा, हसवा आणि बोला. पैसा जगण्यासाठी आहे, पैशासाठी आयुष्य नाही.

✻ स्वत:बद्दल किंवा तुम्ही जे साध्य करू शकले नाही अशा कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा ज्या गोष्टीचा तुम्ही अवलंब करू शकत नाही त्या बद्दल कोणत्याही प्रकारचे दु:ख करू नका. त्याकडे दुर्लक्ष करा आणि विसरुन जा.

✻ पैसा, पद, प्रतिष्ठा, सत्ता, सौंदर्य, जात आणि प्रभाव या सगळ्या गोष्टी अहंकार वाढवतात. पण नम्रता ही लोकांना प्रेमाने जवळ आणते हे लक्षात ठेवा.

✻ केस पांढरे झाले त्याचा अर्थ आयुष्याचा अंत झाला असा होत नाही. ही एका चांगल्या जीवनाची सुरुवात आहे. तेव्हा वाढत्या वयातही आशावादी रहा. स्मृतीसह जगा, प्रवास करा. घरातील लहान मुलांना प्रेमाने, सहानुभूतीने आणि आपुलकीने भेटा. त्यांना जीव लावा.

## पंचांग

**शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, माघ कृ. १२, चंद्रराशी : धनु, नक्षत्र : पूर्वाषाढा, योग : सिद्धी, सूर्योदय ७.१०, सूर्यास्त ६.३६

## फॉरवर्डस

**ताज़-ओ-तख़्त हो या फ़क़ीरी क़ी राह...**

**दो गज़ ज़मीं हीं ज़िन्दग़ी क़ा आख़िरी ईनाम हैं...!**

## फॅशन पॅशन

✻ स्पोर्टी लूकसाठी पोलो शर्टसोबत खाकी शॉर्टस घाला. त्यावर नो शो सॉक्स आणि बोट शूज उठून दिसतील.

✻ कॅज्युअल ऑकेजनसाठी पोलो शर्टसोबत चिनोज किंवा लिनन ट्राउझर्स घालता येतील. नो शो सॉक्स विथ लोफर्ससोबतच ब्राऊन बेल्ट, कॅज्युअल वॉच आणि गॉगल अशा ॲक्सेसरीज परफेक्ट लूक देऊन जातील.


✻ कॅज्युअल सूट लूकसाठी पोलो शर्टसोबत लाईट ग्रे रंगाचा सूट निवडा. ब्राऊन बेल्ट, कॅज्युअल वॉचसह नो शो सॉक्स आणि लोफर्स कॅरी करा.

**(क्रमश:)**

फिटनेस फंडा

## व्यायाम चुकतोय ?

दोस्तांनो, तुम्हाला व्यायामाचं महत्त्व वेगळं सांगायला नको. तुमच्यापैकी अनेकजण नियमित व्यायाम करतात. शक्यतो जीम टाळत नाहीत. मात्र आजारपण, प्रवास किंवा इतर कामांमुळे अधूनमधून व्यायाम चुकतो. मात्र, याचं वाईटही वाटतं. आपलं वजन वाढेल की काय, सगळी मेहनत पाण्यात जाईल की काय असे विचार मनात येतात. पण अधूनमधून व्यायाम चुकवल्यामुळे शरीर बेढब होत नसतं हे लक्षात घ्यायला हवं.



✻ तुम्ही तीव्र स्वरुपाचा व्यायाम करत असाल तर एखाद-दुसरा दिवस जीमला जाता आलं नाही तरी काळजी करू नका. एखाद्या दिवशी व्यायाम न केल्यामुळे तुमचं वजन वाढणार नाही. एखाद्या दिवसाची विश्रांती स्नायूंना आराम मिळवून देते. शिवाय त्यांची झीज भरून काढायलाही मदत होते. अर्थात कारणाशिवाय व्यायाम चुकवू नका.

✻ व्यायाम थांबवल्यानंतर लगेच वजन वाढत नाही. नियमित व्यायाम करत असाल, आठवड्यातले पाच ते सहा दिवस जीमला जात असाल तर लगेच वजन वाढणार नाही. अगदी आठवडाभर ब्रेक घेतला तरी काळजीचं कारण नाही. तंदुरुस्तीची पातळी पुन्हा गाठू शकता.

✻ विश्रांतीच्या काळात तीव्र स्वरुपाचा व्यायाम शक्य नसेल, जीमची सुविधा नसेल तर चालणं, धावणं, दोरीच्या उड्या मारणं याद्वारे फिटनेस टिकवून ठेवू शकता.

खेचाखेची

## सुखी दिवस

प्रत्येक दिवस सुखाने जाईल, पण...
.
.
.
.
.
त्यासाठी तुम्ही निर्लज्ज असायला हवं...

## वेगळं काही

ऑक्सिजन आणि इंधननिर्मितीसाठी कृत्रिम पानाला शुद्ध आणि दबावयुक्त कार्बन डायॉक्साइड दिला जात आहे. ही पानं अशाच कार्बन डायॉक्साइडला दाद देतात. १.७ मीटर लांब आणि ०.२ मीटर रुंद असलेली ३६० कृत्रिम पानं एका दिवसात अर्धा टन कार्बन मोनॉक्साइड तयार करतील. याचा वापर सिंथेटिक इंधन बनवण्यासाठी केला जाईल. या कृत्रिम पानांसाठी 'आर्टिफिशियल सेमी-परमिएबल मेंब्रेन' तयार करण्यात आलं. त्यावर ऊन पडलं की पाण्याचं रुपांतर बाष्पात होतं. बाष्प तयार झाल्यावर पानं आपोआप कार्बन डायॉक्साइड शोषून घेतात. त्यानंतर 'आर्टिफिशियल फोटो सिंथेटिक युनिट' कार्बन डायॉक्साइडचं कार्बन मोनोऑक्साइड आणि ऑक्सिजनमध्ये रुपांतर करतं.

समुपदेशन

## धडाडीने पुढे जा

आम्ही दोघी मैत्रिणींनी एकत्र येऊन तिच्या जागेमध्ये केटरिंग व्यवसाय सुरू केला. व्यवसायाचा चांगला जम बसला आहे. ग्राहकसंख्या अधिक असून नफ्याचं प्रमाणही चांगलं आहे. पण आत्तापर्यंत जीवाभावाची असणारी ही मैत्रीण आता भागीदारी संपवण्याची भाषा बोलतीये. मला व्यवसायातून बाहेर काढून स्वत:च्या बहिणीला सामावून घेण्याचा तिचा मानस आहे. हा विश्वासघात आहे. शिवाय या निर्णयामुळे मला मोठा आर्थिक फटका बसणार आहे. दुसरीकडे व्यवसाय सुरू करण्यासाठी माझ्याकडे जागा नाही. कामगारवर्गही तिने वळवून घेतला आहे. अशा स्थितीत काय करु?



- पैसा दिसू लागला की भलेभले भुलतात. त्यामुळे या धक्क्यातून लवकर सावरुन पुढील नियोजन कर. तुला कुठे वाव आहे याचा विचार कर. भाड्याने एखादी जागा बघ. ग्राहकांपर्यंत पोहोचणं शक्य नसेल तर मंगल कार्यालयात, हॉलमध्ये, मेसमध्ये अथवा विकेंड होम्सच्या स्कीममध्ये केटरिंग सेवा देण्याच्या संधींची चाचपणी कर. त्यासाठी नवीन टीमची जुळणी करावी लागेल. पण आता पाऊल मागे घेऊ नकोस. तुझं भांडवल, गुडवील घेऊन बाहेर पड आणि धडाडीने पुढे जा. एक दिवस मैत्रिणीला कृत्याचा पश्चाताप होईल असं यश मिळवण्याची स्वप्नं पहा.

## सुडोकू ६४


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | | २ | ३ | | | | |
| | | | | | | | | १ |
| | ८ | ७ | ६ | | | ३ | ५ | ९ |
| ९ | | १ | | ६ | | ८ | ४ | ५ |
| | | | ७ | ९ | ८ | | | |
| ८ | ३ | २ | | ५ | | ९ | | ७ |
| १ | २ | ६ | | | ५ | ४ | ३ | |
| ७ | | | | | | | | |
| | | | | ४ | ६ | | ७ | २ |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ४ | १ | ६ | ५ | ३ | ८ | २ | ९ |
| ३ | ८ | ९ | १ | २ | ८ | ७ | ५ | ४ |
| ८ | ५ | २ | ४ | ९ | ७ | ३ | ६ | १ |
| ६ | ९ | ५ | २ | ३ | ४ | १ | ८ | ७ |
| १ | ३ | ८ | ७ | ६ | ५ | ४ | ९ | २ |
| २ | ७ | ४ | ८ | २ | ९ | ६ | ३ | ५ |
| ४ | ८ | ३ | ९ | ७ | २ | ५ | १ | ६ |
| ५ | २ | ६ | ३ | ४ | १ | ९ | ७ | ८ |
| ९ | १ | ७ | ५ | ८ | ६ | २ | ४ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक ६४



**आडवे शब्द :-**
१) एकत्व, जीव आणि ब्रह्म एकच आहे असे मत
३) निर्ढावलेला, बेशरम
७) हिंमत, धैर्य
१०) फाळणी (हिं.)
१२) उगवत्या सूर्याचा देश
१४) आवड, फळातील द्रवपदार्थ
१५) कमळाचे तळे
१८) अर्धे शरीर लुळे पडण्याचा आजार
२०) अरण्य
२२) अतिशय जाडे शरीर
२३) समुद्र
२६) गर्द लाल रंग
२८) जन, प्रजा, परकी माणसे
२९) बेदाणे
३०) जावळा
३३) अवधान, चित्त
३४) रात्र
३६) सरसकट
४०) काव्य रचणारा
४१) वर्ष, साल
४२) ख्याल गाणारा
४३)कबूतर
४४) शिखराचे टोक
४५) नशा आणणारा
४७) दागदागिने
४९) सहाय्य
५०) पिठाची गिरणी
५१) शरम
५२) आवडलेला, मान्य
५३) सरिता
५४) यजमान, पती
५५) कलंक, बट्टा
५६) मयूर
५७) जाळणारा
५८) केस
६०) बिना वासाचे पांढरे फूल
६२) सायीची घट्ट बासुंदी
६४) पाढे, उजळणी
६६) सदोदित
६८) कारस्थान
६९) जीव
७०) सुकुमार

**उभे शब्द :-**
१) दुर्बोध, कळण्यास कठीण
२) जोडीतील एक चर्मवाद्य
३) दूर करणारा, निवारण करणारा
४) फणसातील गर
५)हत्ती
६) डाक
८) उर्ध्व दिशा
९) आचार्य अत्रे यांचे जन्मगाव
११) पर्वताचा उंच तुटलेला कडा, चकितपणे
१३) हुबेहूब सोंगे वठवणारा
१६) निर्बुद्ध
१७) टरफल
१९) एक द्विदल धान्य
२१) प्रत करणारा
२४) भूपती, नृपती
२५) संगीतातील एक राग
२७) ✻✻✻ माता, महाराष्ट्राची देवता
२८) काचेचा लोंबता मणी
३१) राजगादी, तख्त
३२) न कर्त्याचा वार, मंदवासर
३३) स्तुती करणारा
३५) जनन
३७) एकाग्र नजर
३८) चिवचिवाट
३९) पुन्हा पुन्हा
४०) अतिशय थोडा (फरक), जाणता अजाणता
४१) संतोषजनक
४३) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
४५) मुकटा, रेशमी धोतर
४६) केर कचरा साठवण्याची जागा
४८) मला
४९) मत देणारा
५५) लहानपण, बाल्यावस्था
५९) अमावस्या
६१) जागवणारा आवाज
६३) लट, केसांची कपाळावर येणारी लट
६५) चक्र
६६) आठवण
६७) बूड

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

रंगबहार

**शरद कोरडे**

# लतादीदींचे चित्रपटसृष्टीतले तीन भाऊ





भारतरत्न गानकोकिळा लता मंगेशकर यांनी आपल्या आठ दशकांच्या कारकिर्दीत चित्रपटसृष्टीतील जिवलग असे तीन भाऊ मिळविले. त्यांत सर्वश्रेष्ठ संगीतकार मदनमोहन, अभिनय सम्राट दिलीप कुमार व सुस्वाभावी अभिनेता सुनील दत्त यांचा समावेश आहे. लता मंगेशकर यांनी पन्नासाव्या दशकाच्या सुरुवातीस चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले. त्यावेळी त्यांचे वय अगदी लहान होते. त्या काळात त्यांना जुन्या संगीतकारांनी व अभिनेत्यांनी सहकार्य दिले आणि त्यांनी त्याची आयुष्यभर जाण ठेवली. सन १९४० ते ५० यादरम्यान बहुतेक सर्व स्टुडिओ मालाड येथे होते, त्यात देविकाराणींचा 'बॉम्बे स्टुडिओ' व शशिधर मुखर्जींच्या 'फिल्मीस्थान स्टुडिओ' यांचा सहभाग होता. कलाकार मंडळी नेहमी बांद्र्याहून मालाडला लोकल ट्रेनने जात असत. या सकाळच्या प्रवासात एकदा संगीतकार अनिल विश्वास यांनी लता मंगेशकर यांची ओळख दिलीप कुमार यांच्याशी करून दिली. ही मराठी मुलगी असून हिचे वडील मराठीतले नामवंत संगीतकार व गायक अभिनेते होते', असे त्यांनी सांगितले. 'ही मुलगी गायिका असून आत्ता काही चित्रपटातून गात आहे.' दिलीप कुमारने हे ऐकल्यानंतर मराठींतील गायकांचे उर्दूचे उच्चार हे दाल चावल याप्रमाणे ज्याला मराठीत 'वरण भात' म्हणतात, असे असतात. अशी मल्लिनाथी केली. लता मंगेशकर यांना हे आवडले नाही. परंतु त्या काहीही बोलल्या नाहीत. त्यावेळी त्या सलील चौधरी यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गाणे गात होत्या, त्यांचे सहाय्यक महंमद शफी यांच्याशी त्या याबाबत बोलल्या. तेव्हा शफी यांनी अनेक गायक व अभिनेते हे उर्दूचे शिक्षण घेत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी भेंडी बाजार येथील एका मौलवीकडे लता मंगेशकर यांच्या उर्दूची शिकवणी घेण्यासाठी शब्द टाकला, त्यानुसार नंतर लताजी त्यांच्याकडे उर्दूचे शिक्षण घेत होत्या. कमल अमरोही यांच्या महल या चित्रपटाचे काम १९४९ मध्ये चालू होते. या चित्रपटाला खेमचंद प्रकाश हे संगीत देत होते. या चित्रपटांतील एक गाणे 'आयेगा आनेवाला' हे लता मंगेशकर गाणार होत्या. या गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळेला स्टुडिओमध्ये कमाल अमरोही, नर्गीस व त्यांची आई जद्दनबाई या उपस्थित होत्या. ज्या ठुमरी व गझल यांत वाकबगार होत्या व संगीतकारही होत्या.

हे गाणे रेकॉर्ड झाल्यावर सर्वांनी लतादीदींवर कौतुकाची बरसात केली. जद्दनबाईंनी तर त्यांना मिठी मारून 'जिस सफाई से तुमने गाना गाया है, इसीसे पता चलता है की तुम्हारी उर्दू बहुत अच्छी है!'. दिलीप कुमार त्यावेळी फिल्मीस्थानच्या 'शबनम' या चित्रपटात काम करीत होता. दुपारच्या लंचला स्टुडिओ आल्यावर त्याला वरच्या रेकॉर्डिंग स्टुडिओ मध्ये गाणे चालू असल्याचे कळले, कुतूहल म्हणून दिलीप कुमार स्टुडिओमध्ये गेले, त्याला तेथे नर्गिस व जद्दनबाई दिसल्यामुळे तो आत गेला. तेथे लता मंगेशकर यांनी गायलेले गाणे पुन्हा लावण्यात आले होते. दिलीप कुमारने ते ऐकले आणि तो भारावून गेला. हे गाणे कोणी गायले आहे असे विचारताच नर्गिस यांनी लता मंगेशकर यांच्याकडे बोट दाखवले. त्यांना पाहताच दिलीपकुमार पुढे झाला व त्याने उत्कट प्रेमाने लतादीदींना मिठी मारली व 'अरे ही तर माझी छोटी बहीण आहे,' असे म्हटले. पुढे दिलीप कुमारने आयुष्यभर हा शब्द पाळला व मोठ्या भावाप्रमाणे त्यांनी त्यांची कायम पाठराखण केली. ऋषिकेश मुखर्जी यांच्या १९५७ सालच्या 'मुसाफिर' या चित्रपटासाठी सलील चौधरी यांनी एक गाणे लताजी व दिलीप कुमार यांच्या आवाजात रेकॉर्ड केले होते. 'लागी नाही छुटे' हे गाणे त्यावेळी पिलू रागात रेकॉर्ड केले होते. पुढे चित्रपटाच्या लांबीमुळे ते गाणे चित्रपटात आले नाही. मेहबूब खान यांच्या १९४९ सालच्या 'अंदाज' चित्रपटात नायक आपल्या बालवयात बहिणी समवेत एक गाणं गातो. 'पिंजरे मे पंछी बोले मेरा छोटासा दिल डोले', हे गाणे संगीतकार नौशाद यांनी लता मंगेशकर व मदनमोहन यांच्या आवाजात रेकॉर्ड केले होते. यावेळीच संगीतकार मदनमोहन व लतादीदी यांची प्रथम ओळख झाली. त्यावेळी स्टुडिओमध्ये मदनमोहन म्हणाले, 'आपण बहिण भावाचे गाणे गायले आहे . त्यामुळे आज पासून आपण बहिण भाऊ झालो आहोत', त्यानंतर कायमच मदनमोहन लतादीदींचा 'मोहन भैय्या' झाला. यानंतर १९५० साली मदनमोहन यांना 'आँखे' हा चित्रपट स्वतंत्र संगीतकार म्हणून मिळाला. मदन मोहन यांनी त्यानंतर एकूण ९१ चित्रपटांसाठी संगीत दिले, त्यांतील सुमारे ८० चित्रपटांत लता मंगेशकर यांनी गाणी गायली व अप्रतिम संगीताचा खजिना श्रोत्यांसाठी उघडून दिला. त्यांत रेल्वे प्लॅटफॉर्म, भाई भाई, देख कबीरा रोया, आदालत, जेलर, संजोग, हकीकत, अनपढ, गझल, जहाँ आरा, वह कौन थी?, मेरा साया, हंसते जख्म, चिराग, हीर रांझा, हिंदुस्तान की कसम व मौसम या चित्रपटांचा समावेश आहे.

मार्च १९७४ मध्ये लता मंगेशकर यांना लंडनच्या रॉयल अल्बर्ट हॉल मध्ये कार्यक्रम करण्याची संधी मिळाली. त्यावेळी भारतभर त्यांचा गौरव करण्यात आला. अल्बर्ट हॉलमध्ये कार्यक्रम करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय आहेत. या कार्यक्रमाचे प्रथम निवेदन दिलीप कुमार यांनी केले. त्यांनी म्हटले, 'फुलांच्या सुगंधाला रंग नसतो. वाहत्या पाण्याच्या लाटेला सीमेचे बंधन नसते, सूर्याच्या किरणांना धर्मपंथ वेगळे करू शकत नाहीत, त्याचप्रमाणे लताचा आवाज म्हणजे निसर्गातील सर्वात मोठे आश्चर्य आहे'. त्यावेळी प्रेक्षकांनी प्रचंड टाळ्या वाजवून लता मंगेशकर यांचे स्वागत केले. पुढे दिलीप कुमारने लता मंगेशकर यांची उर्दूमध्ये ओळख करून दिली. या कार्यक्रमासाठी संगीतकार एस.डी. बर्मन, नौशाद तसेच गायक किशोरकुमार, हेमंत कुमार व हृदयनाथ मंगेशकर उपस्थित होते. ६००० प्रेक्षक वर्ग असलेला हा हॉल पूर्ण भरून गेला होता. भारताचे दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू मेमोरियल फंडासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या दोन लॉंग प्ले रेकॉर्डस् तयार करण्यात आल्या होत्या. त्यांतील सुमारे एक लाख तेहतीस हजार ध्वनीमुद्रिकांची पुढे विक्री झाली. या कार्यक्रमाचे पुढील निवेदन अभिनेता सुनील दत्त यांनी केले. सिनेमासृष्टीतील अनेक मोठ्या हस्ती या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. अभिनेता व निर्माता सुनील दत्त यांनी यापूर्वीच लता मंगेशकर यांना आपली बहिण मानले होते. त्यांची पत्नी नर्गिस यांचे व मंगेशकर कुटुंबाचे खूप स्नेहाचे संबंध होते. लतादीदी सुनील दत्त यांना नेहमी राखी बांधत असत. निर्माता झाल्यावर सुनील दत्त यांनी आपली अजंठा आर्ट्स ही सिनेसंस्था स्थापन केली. या संस्थेतर्फे ते नेहमी सीमेवर जाऊन जवानांसाठी कार्यक्रम करीत असत आणि या कार्यक्रमात लता मंगेशकर नेहमी सामील होत असत. त्यांच्या उपस्थितीमुळे सीमेवरील जवानांना खूप आनंद होत असेल व त्यांच्या गाण्यांचा आस्वादही नाचून ते घेत असत. त्यानंतर लतादीदींच्या परदेशातील अनेक कार्यक्रमासाठी सुनील दत्त हे निवेदक म्हणून जात असत. भारत चीन युद्धानंतर १९६२ साली दिल्लीमध्ये एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये सिनेसृष्टीतील अभिनेते संगीतकार निर्माते व गायक यांनी मोठा सहभाग घेतला होता. यावेळी लता मंगेशकर यांनी राष्ट्रकवी प्रदीप यांनी लिहिलेले व सी. रामचंद्र यांनी संगीत दिलेले 'ए मेरे वतन के लोगो, जरा आँख में भर लो पानी' हे गीत पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत सादर केले. हे गीत ऐकून पंडितजींच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यांनी लता मंगेशकर यांच्या गायकीचे खूप कौतुक केले व दुसऱ्या दिवशी सर्व कलाकारांना आपल्या घरी जेवणाचे निमंत्रण दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ही दिलीप कुमार यांनीच केले होते. आयुष्याच्या अखेरच्या पर्वात वयाच्या ९० वर्षानंतर दिलीप कुमार आजारी होते, विकलांग होते व त्यांना स्मृतीभ्रंशही झाला होता. या काळातही राखी पौर्णिमेला लतादीदी त्यांच्याकडे जात असत व त्यांच्या आवडीचे पदार्थ त्यांना खायला देत असत. अशाच एका वेळी लतादीदी आल्यावर त्यांची पत्नी सायरा बानो यांनी व्हीलचेअर वर बसलेल्या दिलीप कुमारला बोटाने खूण करून विचारले, 'ही कोण आहे?' त्यावर दिलीप कुमार यांनी लताजींकडे पाहून आपल्या मनगटावर बोट ठेवून रक्षाबंधनाचा संदेश दिला . अशीही बहीण भावंडे व त्यांचे स्वर्गीय आत्मिक प्रेम आपल्यांना बरेच काही शिकवून जाते.

●●

# पौर्णिमेच्या चंद्राला लाजवणारे लावण्य वहिदा रहेमान

**गुरूदत्तचे ते अप्रतिम गाणे बघताना गोळ्यांचे पारणे फिटते. अगदी युवती असलेली वहिदा दिवाणखान्यात शांत झोपली आहे. गुरूदत्त तिचे सौंदर्य नेहाळत गात आहे, 'चौदवी का चांद हो या आफताब हो, जो भी हो तूम खुदा की कसम लाजवाब हो' अहाहा काय गाणं जमलय? शतकातील एक अप्रतिम गाणं म्हणता येईल. वहिदा रहेमान यांनी केलेला प्रत्येक चित्रपटातील भूमिकेसाठी खरंच कुर्निसात.**



**श्रीराम शेटये**

आपल्या सर्वांगसुंदर अभिनयाने ओळखल्या जाणाऱ्या वहिदा रहमान यांनी हिंदीसह तेलगू, तामिळ आणि बंगाली चित्रपटातून भूमिका करत ५०, ६० आणि ७० अशी तब्बल तीन दशके हिंदी चित्रपटसृष्टीवर राज्य केले आहे. त्यांच्या या कारकिर्दीकरिता त्यांना २०१३ मध्ये भारतीय चित्रपटातील सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्वाचा शताब्दी पुरस्कार व फिल्मफेअर लाइफटाइम अचिव्हमेंट ॲवार्डने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या कारकिर्दीत एकदा सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार व दोन फिल्मफेअर ॲवार्ड त्यांच्या नावे आहे.

वहिदा रेहमानचा जन्म ३ फेब्रुवारी १९३८ ला तामिळनाडूतील चेंगलपेट येथील जिल्हा आयुक्त मोहम्मद अब्दुर रेहमान आणि त्यांची पत्नी मुमताज बेगम यांच्या चार मुलींपैकी सर्वात लहान मुलगी म्हणून दख्खनी मुस्लिम कुटुंबात झाला. तिने विशाखापट्टणम येथील सेंट जोसेफ कॉन्व्हेंटमध्ये शिक्षण घेतले. लहानपणापासून डॉक्टर बनण्याचे त्यांचे स्वप्न होते. पण फुफ्फुस्सात झालेल्या इन्फेक्शनमुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला आणि त्या डॉक्टर होऊ शकल्या नाहीत. वहीदा रहमान यांनी आपल्या बहिणीसोबत भरतनाट्यमचे धडे गुरु त्रीचुंबर मिनाक्षी सुंदरम पिल्लई आणि मुंबई येथे गुरु जयलक्ष्मी अल्वा यांच्याकडून घेतले होते. भरतनाट्यम शिकणाऱ्या वहिदा यांना त्यांच्या गुरुंनी अभिनय करण्याची प्रेरणा दिली. तथापि, १९५१ मध्ये तिच्या वडिलांचे निधन झाले तेव्हा त्यांच्यावर याचा लक्षणीय परिणाम झाला. वहिदा यांच्या स्वप्नांना कुटुंबाचे उभ्या राहिलेल्या आर्थिक आव्हानांमुळे, नंतर त्यांच्या आईच्या आजारपणामुळे आणखी वळण लागले. कुटुंबाला आर्थिक आधार देण्याच्या गरजेमुळे, त्यांनी चित्रपट उद्योगात मिळालेल्या संधींचा स्वीकार केला.

रुपेरी पडद्यावरील आपल्या कारकिर्दीची सुरुवात १९५५ मध्ये 'रोजुलु मरायी' या तेलगु चित्रपटापासून केली. या चित्रपटात त्यांनी नृत्य सादर केले होते. या चित्रपटात त्यांना यशही मिळाले. त्याचवर्षी त्यांनी जयसिम्हा (१९५५) या चित्रपटात एन. टी. रामाराव यांच्याबरोबर मुख्य नायिकेची भूमिका साकारली तसेच अलीबाबवम ४० थिरुदरगलम (१९५६) या चित्रपटात पाहुण्या कलाकाराची भूमिका साकारली. या चित्रपटातील अभिनयाने हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज दिग्दर्शक गुरुदत्त यांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी वहिदा यांना मुंबईला बोलावले व सीआयडी (१९५६) या राज खोसला दिग्दर्शित चित्रपटात नकारात्मक छटा असलेली भूमिका दिली. या चित्रपटासाठी गुरुदत्त यांनी वहिदा यांना नाव बदलण्याचा सल्ला दिला होता. मात्र गुरूदत्त यांच्या नाव बदलण्याच्या सल्याला त्यांनी खंबीरपणे नकार दिला. गुरुदत्त आणि वहिदा यांची जोडी प्रेक्षकांना आवडली होती. त्यांनी प्यासा, कागज के फूल, १२ ओ' क्लॉक, चौदहवीं का चांद, साहिब – बिबी और गुलाम यासारखे अनेक चित्रपट सोबत केलेत. साहिब बीबी और गुलाम या चित्रपटातील भूमिकेकरिता त्यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीच्या श्रेणीत पहिले फिल्मफेअर नामांकन मिळवून दिले. या चित्रपटांनी हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांना सक्षम अभिनेत्री म्हणून ओळख मिळाली. या दरम्यान त्यांच्यात जवळीक वाढल्याची चर्चाही चित्रपटसृष्टीत होती. पण १० ऑक्टोबर १९६४ ला गुरुदत्त यांनी आत्महत्या केल्यानंतर या चर्चांना पूर्णविराम मिळाला. यानंतर वहिदा यांनी आपल्या कारकिर्दीवर लक्ष केंद्रीत केले. दरम्यान गुरुदत्त व्यतिरिक्त त्यांनी देव आनंद यांच्यासोबतही चित्रपट केले. यात सोलवा साल (१९५८), काला बाजार (१९६०) आणि बात एक रात की (१९६२) हे चित्रपट होते. १९६२ मध्ये वहिदा यांनी प्रसिद्ध बंगाली चित्रपट निर्माते सत्यजित रे यांच्या सौमित्र चॅटर्जी यांच्यासोबत त्यांच्या 'अभियान' (१९६२) या चित्रपटात अभिनय साकारला. त्यानंतर त्यांनी अशोक कुमार आणि प्रदीप कुमार यांच्यासोबत राखी (१९६२), राज कपूर यांच्यासोबत एक दिल सौ अफसाने (१९६३), सुनील दत्त यांच्यासोबत मुझे जीने दो (१९६२), बीस साल बाद (१९६२) कोहरा (१९६४) आणि विश्वजीत यांच्यासोबत मजबूर (१९६४) या गाजलेल्या चित्रपटात भूमिका साकारल्यात.

१९६५ मध्ये विजय आनंद यांनी १९५८ मध्ये प्रकाशित झालेल्या आर. के. नारायण यांच्या गाइड या पुस्तकावर आधारित 'गाइड' हा चित्रपट केला. या चित्रपटात वहिदा रहमान यांनी बंडखोर आणि दृढ इच्छाशक्ती असलेल्या स्त्रीची भूमिका साकारली. विश्वासघातकी पुरातत्वशास्त्रज्ञाशी झालेले लग्न मोडून स्वतःची स्वप्न पूर्ण करणाऱ्या रोझी ही भूमिका साकारणे तत्कालीन काळात आव्हानात्मक होते. या भूमिकेने त्यांनी त्या काळातील प्रचलित चित्रपट रूढीवादी विचारांला छेद दिला. 'गाईड' ने लक्षणीय व्यावसायिक यश मिळवले. या चित्रपटाने केवळ प्रेक्षकांचीच पसंती मिळवली नाही तर समीक्षकांचीही प्रचंड प्रशंसा मिळवली. आव्हानात्मक भूमिकेतील वहिदा रहमान यांच्या उत्कृष्ट अभिनयाचे कौतुक झाले. या चित्रपटाला भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोत्तम कामगिरी मानले गेले. त्यांना या चित्रपटातील अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळवून दिला. गाइडला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला.

१९७३ मध्ये आलेल्या राजिंदर सिंग बेदी दिग्दर्शित फागुन या चित्रपटात त्यांनी जया भादुरी यांच्या आईची भूमिका साकारल्याने, त्यांच्याकडे मुख्य नायिकेच्या भूमिका येणे बंद झाले. त्यांना मग आईच्या भूमिकांचीच विचारणा सुरु झाली मात्र त्यांनी या भूमिका नाकारल्या. १९७६ मध्ये वहिदा यांनी अमिताभ बच्चन यांच्यासोबत 'कभी कभी' आणि 'अदालत' या चित्रपटातून भूमिका केल्या. यश चोप्रा यांच्या 'कभी कभी' (१९७६) या चित्रपटात वहिदा यांनी अंजली या अविवाहित आईची भूमिका साकारली होती. मात्र त्यानंतर दोनच वर्षात त्यांना अमिताभ यांच्या आईची भूमिका करावी लागली. तो चित्रपट होता त्रिशुल (१९७८). या चित्रपटात संजीवकुमार यांच्यासोबत त्यांनी भूमिका केली होती. त्यानंतर 'नमक हलाल' (१९८२) आणि 'कुली' (१९८३) या चित्रपटांमध्ये त्यांनी पुन्हा अमिताभ यांच्या आईची भूमिका साकारली. त्या काळातील त्यांचे इतर चित्रपट म्हणजे ज्वालामुखी (१९८०) गुलजार यांचा नमकीन (१९८२) या चित्रपटासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री फिल्मफेअर पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते, धरमकांटा (१९८२), दिलीपकुमार यांच्यासोबत मशाल (१९८४), चांदनी (१९८९) आणि लम्हे (१९९१) या चित्रपटातील लम्हे या चित्रपटानंतर त्यांनी चित्रपट क्षेत्रातून विश्रांती घेतली.

एप्रिल १९७४ मध्ये, सहअभिनेता कमलजीत (शशी रेखी) यांनी त्यांच्यासमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला. चित्रपट कारकिर्दीच्या यशोशिखरावर असताना वहिदा यांनी त्यांच्याशी विवाह केला. कमलजीत यांनी शगुन (१९६४) या चित्रपटात वहिदा यांच्यासोबत अभिनय साकारला होता. ●●

# मानवतेची सुखद जाणीव शुद्ध प्रेम



**रवींद्र माहिमकर**

पाश्चिमात्य संस्कृतीचे लोण (चं) आपल्याकडे फारच मुरलंय. एकेक नवीन फॅड म्हणायचे! या व्हॅलेंटाईन डे म्हणजे प्रेम दिनाच्या विरोधात कर्मठ संस्कृतीवाल्यांची आंदोलने, मोर्चा, चर्चा इ. असे बरेच काही दरवर्षी नित्यनियमाने होत असते. या 'व्हॅलेंटाईन डे'चा खरा अर्थ किंवा वैशिष्ट्य काय?

व्हॅलेंटाईन हा संत होता. एक प्रेषित होता. एक पुण्यकर्म म्हणून तो जेलमधील कैद्यांची पत्रे त्यांच्या नातेवाईकांकडे पोहचवत असे. त्या आरोपीला तुरुंगातील शिक्षा कठोर असे. केव्हा एकदा सुटतो आणि घरदार गाठतो असे बंदिवानाला वाटे. आजच्यासारखे अटकपूर्व जामीन, पैसे भरून सुटका, कैद्यांचे लाड, जेलरला चिरीमिरी देऊन पळणे असले प्रकार नव्हते. आज कैद्यांना पत्राची, चिठ्ठीची गरजच पडत नाही म्हणा. फोन-मोबाईलद्वारे निरोप, चोचले 'मॅनेज' केले जातात. थोडक्यात संत व्हॅलेंटाईन जसा कैद्यांचा पत्रांची देवाण-घेवाण वाटपाचे सत्कार्य करायचा तशी आता गरज नाही. मात्र या संताच्या नावे 'व्हॅलेंटाईन डे' म्हणजे प्रेमदिन म्हणून काही राष्ट्रात साजरा होतो. तोही प्रामुख्याने तरुण वर्गात. त्यांचा उत्साह उतू जात असतो.

आज व्हॅलेंटाईन दिनाला बाजारी स्वरूप आले आहे. काहींना हे एक निमित्त झाले आहे. चंगळ-वादी, स्वैराचारी व भोगवादी प्रवृत्तीच्या लोकांना वासनेने भरलेले, शारीरिक आकर्षण म्हणजे प्रेम असे वाटते. सत्ता सुखलोलुप, धनदांडग्यांपुढे कोणाचे काय चालणार? महागड्या आकर्षक भेटकार्डांचा धंदा वधारलाय. जाहिरात, प्रसार व प्रचार माध्यमांचे नको तितके सहाय्य आहे. साथीला अगतिकवेडी तरुण ग्राहक मंडळी आहेत. व्यापारी वर्ग, इ-मेल, एस.एम.एस. इ. इ. सर्वच हात धुवून घेतात. अशा 'डेज ॲण्ड वेज' द्वारे नवीन 'संस्कृती-खूळं' आयात केली जात आहेत.

खरं तर आपली संस्कृती, परंपरा ही निखळ प्रेम, त्याग व करुणा यावर आधारित आहे. हिच परंपरा आजही समाजात रुजवता येऊ शकते. प्रेमाची अनुभूती गोकुळांतील प्रत्येक गौळणीने तसेच प्रत्येक कृष्णभक्ताने अनुभवली आहे. मध्ये वाचले होते की समजा 'श्रीकृष्ण-डे' साजरा केला तर. 'राधा गौळण करिते मंथन । मनात हरीचे अविरत चिंतन ।' ही सद्प्रेमभावना किती उच्चकोटीची आहे. आपण चांगल्या विचारांची, सुखद घटनांची चेष्टाच करतो. कोजागिरी पौर्णिमेला हल्ली दुध कोण पितोय? कोजागिरीला उत्तेजक पेयांच्या व उत्तान नाचगाण्याच्या धुंद पार्ट्याही रंगतात. गटारी अमावास्या हा सार्वजनिक 'लिकर डे' म्हणूनच कुप्रसिद्ध झाला आहे. आपले काही स्वदेशी पवित्र सण 'देशी-विदेशी' तिर्थात बुडाले आहेत. स्वैराचाररुपी नवजागृतीच्या नावाखाली या सणांचे स्वरूपच बदलले आहे. त्यामुळे कौटुंबिक व समाजस्वास्थ्य बिघडले आहे हे सत्य आहे.

आज समाजात प्रेमाचा, मायेचा, दिलासा मिळण्याची खरी गरज कोणाला आहे ? तर्कशून्य, स्वैराचारी रीतीने व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यापेक्षा, समंजस, विचारी तरुणांकडून विधायक कार्य करण्याची आज समाजाला गरज व अपेक्षा आहे. रुग्णांची, वृद्धांची सेवा, अनाथालयातील आश्रित, तसेच गरीबांविषयी माया, सहकार्य देऊन, प्रेम देऊनही हा प्रेमदिन साजरा करता येईल. वर्षांतून एकच दिवस कशाला, आपली कामाची वेळ, नोकरी, प्रपंच, कर्तव्य सांभाळून रोजच तो साजरा करता येईल. तशी आंतरिक इच्छा मात्र पाहिजे.

काहीजण तर घरातल्या मांजरा-कुत्र्यांवर इतके प्रेम करतात, लाड करतात की त्या मुक्या प्राण्यांना त्याचे अजीर्ण होत असेल. भूतदया म्हणायची झाले. पण स्वतःच्या आईवडिलांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवतात. काही (सुधारलेले!) आपल्या माता-पित्यांना गॅलरीत, व्हरांड्यात ठेवतात. अशी हृदयशून्य मनाचीही 'थोर' बालके असतात. आईवडिलांचे आपल्यावरचे प्रेम, माया, आपल्याला मोठे करण्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट ही लेकरे सोयीस्करपणे या प्रेमदिनी विसरतात. अस्सल श्रावणबाळ होण्याऐवजी कोणाचे तरी ऐकून हे 'श्रवणबाळ' होण्यात धन्यता मानतात. माता-पित्यांच्या सेवेचा, प्रेमाचा आदर्श ठेवणारा पुंडलिक आठवा. त्याच्या घरी तर रोजचाच प्रेमदिन होता म्हणायचं. माता पित्यांबरोबरीचे नातेसुद्धा फादर्स मदर्सडेला, त्यादिवशीच फक्त असते.

फक्त व्हॅलेंटाईन डे हाच प्रेमदिन का असावा? रोजच्या जीवनात प्रेमाचे असे अनेक क्षण आपण आणू शकतो. पण तशी मानसिकता पाहिजे. अशा प्रेमाला वयाचे बंधन नाही, नात्याचे, जाती-धर्माचेही बंधन नाही. आपल्या अंतःकरणात सद्बुद्धीची, सद्विचारांची जाण पाहिजे. रोजच्या जीवनात फक्त सुखाशीच नव्हे तर पर-दुःखाशीही एकरूप व्हायला पाहिजे. प्रेम म्हणजे 'शेअरिंग व केअरिंग'सुद्धा. या प्रेमात सोशिकता असते, जगण्याचा मानसिक आधार असतो. कृतज्ञता असते. जीवनात एकमेकांना सांभाळून घेणे, जबाबदारी पूर्ण समंजसपणा दाखवणे, सोयीनुसार तडजोड करणे, सहकार्य करणे म्हणजे प्रेमच होय. ही आंतरिक प्रिती समजून तोच व्हॅलेंटाईन दिवस साजरा करा. प्रेमदिन हा देखावा नको. अविचाऱ्यांसाठी असे सुख क्षणभंगूर ठरते. पण उत्शृंखल अगतिक वेड्यांना हे कसे समजावे? त्यांच्या जीवनात तो क्षणिक जल्लोष माहोल वेगळाच असतो. बेट्यांनो, आयुष्य इतके सोपे कधीच नसते. प्रत्येकाला हे नंतर समजते.

या प्रेमदिनानिमित्त तसेच अलौकिक उत्कट प्रेमाबद्दल आठवते ती दर्द दिवाणी, विरहिणी प्रेमिका संत मीराबाई. मीराबाई कृष्णाच्या प्रेमासाठी जन्मभरची प्रेमिका होती. पाचशे वर्षांपूर्वीची ही प्रेम कहाणी. तिच्या स्वप्नातल्या भावनांचा आध्यात्मिक प्रेमविवाह ! उदात्त भावनांचा हा एकतर्फी प्रेमकल्लोळ ! मीराबाई राजघराण्यातील होती. तिच्या दिराने रागावून तिला विषाचा प्याला प्यायला दिला. गिरीधरावरील निखळ प्रेमापोटी तिने ते विषप्राशन केले. प्रेमामृत म्हणून ती विष प्यायली. मिराच्या हृदयात कृष्णाविषयी आंतरिक शुद्ध प्रेम होते. तिच्यावर त्या विषाचा काहीच परिणाम झाला नाही.

....आणि आज प्रेम या भावनेचे व्यापारी स्वरूप झाले आहे. सुंदर शरीरावर मोहित होणारी वैषयिक ओढ हे खरे प्रेम का? प्रेमात 'संबंध' ही भावना नगण्य आहे. विवाह ही प्रेमाची आंतरिक निष्पन्नता नव्हे तर सुरूवात असते. सुखी व आनंदी सहजीवन महत्वाचे असते. प्रेमी विवाहापूर्वी प्रेम करतात प्रियेला हनी, स्वीटहार्ट म्हणून संबोधणारे, नंतर त्यांचे संबंध अगोड का व्हावेत? शुद्ध निर्व्याज प्रेम ही मानवतेची सुखद जाणीव आहे. ते संवेदनशील असते व अनेक पातळ्यांवर होऊ शकते. वेड्या भावनेपोटी प्रेम हे आंधळे नसावे. ते डोळसच पाहिजे. नाहीतर त्याचे परिणाम नंतर भोगावे लागतात. अशा उत्शृंखल प्रेमवीरांच्या ललाटी प्रेमदिनाऐवजी प्रेम 'दीन' होण्याची आपत्ती येते. संत कबीर म्हणतात, 'ढाई अक्षर प्रेम का । पढे सो पंडित होय ।।' प्रेम करायला आणि टिकवायला पांडित्याबरोबर बहुश्रुततासुद्धा पाहिजे. नाहीतर प्रेमाचं 'लफडं' व्हायला वेळ लागत नाही. प्रेम दोन्ही बाजूंनी असावं लागतं. नाहीतर वेदनाच.

कठोर मनाचा योद्धा नेपोलियन बोनापार्टने म्हणे, आपली पत्नी जोसेफाईनला लग्नाआधी व नंतर तब्बल पंचाहत्तर हजार पत्रे लिहिली. अर्थातच ती सर्व प्रेमपत्रे होती. हा खरा 'प्रेमयोद्धाच' की. नाटककार जॉर्ज बनार्ड शॉ याने ब्रिटीश अभिनेत्री स्टेला हिला सलग चाळीस वर्षे प्रेमपत्रे लिहिली. या चिकाटीने त्यांचे जीवन सुधारले (आणि अक्षरही...) निष्ठावान प्रेमासाठी जोडीदारांचा एकमेकांवर विश्वास हवा. तसेच एकमेकांबद्दल कृतज्ञता, ममत्व, आत्मियता पाहिजे. तेव्हाच असे अमरप्रेम टिकतात. यशस्वी होतात. आयुष्यभर असे प्रेमिक रोजच व्हॅलेंटाईन डे साजरा करतात म्हणायचे. शिंपल्यानी मोत्याला जपावे तसे प्रेमिकांनी एकमेकांना जपायला पाहिजे हे नेहमीचेच सुंदर वाक्य. पण प्रेम हे जगण्याची आशा देते. काही वेळा विरहाची अनुभूतीही प्रेमाची लज्जत, गंमत वाढविते. प्रेम म्हणजे मैत्र, सहवास व विरह यांचा सुंदर मिलाफ ! व हा मिलाफ म्हणजेच सुखी जीवन जगण्याचा आधार, मग तो व्हॅलेंटाईन डे असो वा प्रेमदिन असो. ●●





# बालांगण

## कॅसिओपेआ म्हणजे काय?

कॅसिओपेआ हा सौर ऊर्जेशी संबंधित एक महत्त्वाचा वैज्ञानिक प्रयोग आहे. सूर्याची ऊर्जा थेट अवकाशातून पृथ्वीवर आणणे ही या प्रयोगामागची कल्पना आहे. सध्या आपण पृथ्वीवर सौर पॅनल लावून वीज तयार करतो. पण ढग, पाऊस, धूळ आणि रात्र यामुळे ती ऊर्जा सतत मिळत नाही. म्हणून शास्त्रज्ञांनी अवकाशातील सौर ऊर्जेचा विचार केला.




अवकाशात ढग नसतात आणि रात्र होत नाही त्यामुळे तिथे सूर्यप्रकाश सतत मिळतो. म्हणूनच सतत ऊर्जा गोळा करू शकणाऱ्या सौर पटलाची कल्पना शास्त्रज्ञांच्या मनात आली. या प्रयोगात पृथ्वीच्या खूप वर अवकाशात एक मोठा उपग्रह उभारला जाणार आहे. त्या उपग्रहावर प्रचंड सौर पटल असतील. ही सौर पटले सर्व ऊर्जा गोळा करतील. गोळा केलेली ऊर्जा थेट तारांमधून पृथ्वीवर पाठवता येत नाही. म्हणून ती आधी खास प्रकारच्या ऊर्जालहरींमध्ये बदलली जाईल. या लहरी पृथ्वीवरील एका ठराविक केंद्राकडे पाठवल्या जातील. त्या केंद्रात विशेष यंत्रांच्या मदतीने त्या पुन्हा विजेत रूपांतरित केल्या जातील. नंतर ही वीज घरे, शाळा, कारखाने यांसाठी वापरता येईल. हा प्रयोग यशस्वी झाला तर स्वच्छ वीज मोठ्या प्रमाणात मिळू शकते. कोळसा, पेट्रोल, डिझेल यांचा वापर कमी होईल आणि प्रदूषणही कमी होईल. दूरच्या भागांनाही सतत वीज देणे शक्य होईल. हा कॅसिओपेआ प्रयोग ब्रिटनमधील ‘स्पेस सोलर’ नावाची कंपनी करत आहे. ही कंपनी अवकाशात मोठे सौर पटल बसवून त्यातून वीज मिळवण्यावर काम करते. या प्रकल्पात ब्रिटनमधील संशोधक, अभियंते आणि काही आंतरराष्ट्रीय संस्था एकत्र काम करत आहेत. यामध्ये अंतराळातील यंत्रणा तयार करणाऱ्या तज्ज्ञ कंपन्यांचीही मदत घेतली जात आहे. हा प्रयोग खूप कठीण आहे. अवकाशात एवढी मोठी रचना उभारणे, ती सुरक्षित ठेवणे आणि

**रंजक विज्ञान**

ऊर्जा अचूकपणे पृथ्वीवर पाठवणे हे मोठे आव्हान आहे. त्यामुळे सध्या लहान चाचण्या आणि अभ्यास सुरु आहेत. सर्व काही यशस्वी झाले तर २०३५ च्या आसपास कॅसिओपेआ प्रयोग पूर्ण क्षमतेने काम करू शकेल आणि तेव्हा सूर्याची शक्ती थेट अवकाशातून वापरण्याचे माणसाचे स्वप्न साकार होऊ शकेल.

## जग सच्च्या मित्रांचं

कुत्रं आपला सच्चा मित्र बनू शकतं. घरी छानसं कुत्रं आणण्यापूर्वी नीट संशोधन करणं गरजेचं आहे. भारतात कुत्र्यांच्या अनेक प्रजाती आहेत. या प्रजातींमधून योग्य प्रजातीची निवड करायला हवी. कुत्र्यांच्या विविध प्रजातींविषयी जाणून घेऊ या...




✻ पाळण्यासाठी लॅब्रेडोर जातीच्या कुत्र्यांना पसंती दिली जाते. या जातीचे कुत्रे लगेच माणसाळतात. त्यांना प्रशिक्षण देणं सोपं असतं. खेळकर आणि हुशार अशी ही प्रजाती आहे. त्यांच्यावर जास्त खर्च करावा लागत नाही. ते कोणत्याही वातावरणाशी जुळवून घेतात. म्हणूनच पहिल्यांदाच कुत्रं पाळायचं असेल तर या जातीला प्राधान्य देण्यास हरकत नाही.

**माय पेट**

✻ पग ही अत्यंत गोंडस अशी प्रजाती आहे. छोट्या आकाराचं, अत्यंत प्रेमळ म्हणून या जातीचं श्वान ओळखलं जातं. त्यांचे डोळे खूप बोलके असतात. पग ही जगातल्या सर्वात प्राचीन प्रजातीपैकी एक आहे असं म्हटलं जातं. या जातीचे कुत्रे अगदी सहज माणसाळतात.

✻ जर्मन शेफर्ड जातीचा कुत्रा भारतात लोकप्रिय आहे. ही जात हुशार आणि कणखर असते. ते शत्रूपासून मालकाचं संरक्षण करतात. त्यांना प्रशिक्षण देणं फारसं कठीण नसतं. सुरक्षेसाठी त्यांचा वापर केला जातो.

✻ कुत्र्यांबद्दल खूप प्रेम असेल तर परिया जातीचा कुत्रा पाळायला हरकत नाही. ते खूप प्रेमळ आणि इमानदार असतात. ही प्रजाती सहजपणे उपलब्ध होते.



✻ कुत्र्यांची इंडियन स्पिट्झ ही प्रजातीही खूप गोंडस आहे. ते पोमेरेनियन कुत्र्यांसारखे दिसतात. पण प्रत्यक्षात त्यांच्यात खूप फरक आहे. या दोन्ही वेगळ्या प्रजाती आहेत हे लक्षात घ्या.

✻ डॅचशंड जातीचे श्वानही गोंडस असतात. घर छोटं असेल तर पाळण्यास ही प्रजाती योग्य ठरते. हे श्वानही भारतीय वातावरणात सहज सामावून जातात.

## सर्वात उंचीवरचा रस्ता

वाहनं जाऊ शकणारा जगातला सर्वात उंचीवरचा रस्ता म्हणजे मोटरेबल रोड भारतात आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत लडाखमधला खारदुंग ला किंवा खारदुंग पास हा जगातला सर्वाधिक उंचीवरचा मोटरेबल रस्ता मानला जात होता. जगातला सर्वात उंचीवरचा हा रस्ता भारतात आहे याचा आपल्याला अभिमान वाटायला हवा. हा रस्ता जवळपास १७,६०० फूट उंचीवर आहे. पण आता या भागात आणखी एक रस्ता बांधण्यात आला आहे. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनने हा रस्ता बांधला आहे. आता हा रस्ता जगातला सर्वात उंचीवरचा मोटरेबल रस्ता ठरला आहे. हा रस्ता लडाखमधल्या चिसुमले आणि डेमचॉक या गावांदरम्यान बांधण्यात आला आहे. हा रस्ता लेहपासून अवघ्या २३० किलोमीटर अंतरावर आहे. चीन सीमेपासून तो




**माहीत आहे?**

फार लांब नाही.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या रस्त्याचं बांधकाम करण्यात आलं आहे. हा रस्ता ८६ किलोमीटरचा आहे. समुद्रसपाटीपासून १९,३०० फूट उंचीवर त्याची उभारणी करण्यात आली आहे. ‘हिमांक’ असं या प्रकल्पाचं नाव होतं. एवढ्या उंचीवर रस्त्याची उभारणी करणं अजिबात सोपं नव्हतं. यात अनेक धोके होते. या भागातलं तापमान खूप थंड असतं. इथे हाडं गोठवणारी थंडी असते. ऑक्सिजनची पातळीही खूप कमी असते. भर उन्हाळ्यात इथलं तापमान उणे १० ते २० अंश सेल्सियसपर्यंत असतं. थंडीमध्ये ते उणे ४० पेक्षाही खाली जातं. उंचीवरच्या ऑक्सिजनच्या पातळीपेक्षाही इथली ऑक्सिजनची पातळी अवघी ५० टक्के असते. एवढ्या उंचीवर आणि प्रतिकुल परिस्थितीत यंत्रही नीट काम करत नव्हती. या वातावरणामुळे काही कामगारांची दृष्टी काही काळासाठी गेली. त्यांना काही आठवेनासं झालं. पण अशा परिस्थितीतही कर्मचाऱ्यांनी हा रस्ता पूर्ण केला. ही बाब अभिमानास्पद म्हणायला हवी.

## आहारतज्ज्ञ व्हायचंय?

सध्या आरोग्यरक्षणाप्रती जागृती झाली आहे. पोषक आहार घेणं, वजन नियंत्रणात ठेवणं या बाबींकडे लोक लक्ष देऊ लागले आहेत. त्यामुळे न्यूट्रिशन आणि डाएटेटिक्समध्ये करीअरच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. योग्य आहार आणि नियमित व्यायाम यांच्या बळावर आरोग्यदायी आयुष्य जगता येतं याची जाणीव आता होऊ लागली आहे. म्हणूनच आहारतज्ज्ञांची मागणी वाढू लागली आहे. पोषक आहारविषयक अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्हीही या क्षेत्रात करीअर करू शकता.



आरोग्यदायी आयुष्य जगण्यासाठी आहारात विविध पोषक घटक असणं गरजेचं असतं. पण कोणता पोषक घटक किती प्रमाणात असावा, कधी काय खावं याची जाणीव आपल्याला नसते. आहारतज्ज्ञ याबाबतचं मार्गदर्शन करतात. देशभरात आहारविषयक विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. ते पूर्ण करून तुम्ही नोकरी करू शकता किंवा स्वत:चा स्वतंत्र व्यवसायही सुरु करू शकता. या क्षेत्रात वेगवेगळ्या विषयांमध्ये नैपुण्य मिळवून तुम्ही पुढे जाऊ शकता. वजन नियंत्रण, लहान मुलांचा आहार, मधुमेहींचा आहार अशा काही क्षेत्रांमध्ये विशेष प्राविण्य मिळवता येऊ शकतं.

**कोण होणार?**

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विविध रूग्णालयं, आरोग्यसंस्था, शासकीय कार्यालयं, जीम आदी ठिकाणी नोकरी करता येते. पुरेशा अनुभवानंतर तुम्ही वैयक्तिक मार्गदर्शक म्हणूनही काम करू शकता. योगशास्त्र किंवा व्यायामविषयक प्रशिक्षण घेऊन तुम्ही आपलं कौशल्यं वाढवू शकता.

## असा आहे दवाई दोस्त

एखादा आजार झाल्यावर औषधं घ्यावी लागतात. औषधांच्या ठराविक वेळा असतात. वेळच्या वेळी औषध घेतलं तरच त्याचा उपयोग होतो. आजी-आजोबांनाही वेगवेगळी औषधं घ्यायची असतात. त्यांना मधुमेह, उच्च रक्तदाबावरील औषधं दिलेली असतात. ही औषधं वेळेत घ्यावी लागतात. पण रोजच्या धावपळीत किंवा काही कारणांनी आजी-आजोबा औषधं घ्यायला विसरतात. याचा परिणाम त्यांच्या तब्येतीवर होतो. पण आता आजी-आजोबांना औषधांची वेळ लक्षात ठेवण्याची गरज नाही. कारण एक ॲप त्यांना औषधांच्या वेळेची आठवण करून देईल. आर्यमन कुंजरू याने ‘दवाई दोस्त’ नावाचं ॲप विकसित केलं आहे.

हे ॲप व्हॉईस नोटिफिकेशनने ज्येष्ठ नागरिकांना औषधांची आठवण करून देतं. बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना स्मार्टफोनचा वापर करताना अडचण जाणवते. टच स्क्रीनवर झटपट टाईप करणं त्यांना जमत नाही. त्यामुळे व्हॉईस नोटिफिकेशनचा त्यांना लाभ होऊ शकतो. सध्या हे ॲप हिंदी आणि तमिळ या दोन भाषांमध्ये उपलब्ध आहे. लवकरच ते




इतर भारतीय भाषांमध्येही उपलब्ध होईल. यावर काम सुरू आहे. या ॲपमध्ये औषधाचा फोटोही टाकता येतो. म्हणजे ठराविक वेळेला कोणतं औषध घ्यायचं हे देखील कळू शकतं. दवाई

**स्मार्ट ॲप**

दोस्त फक्त ज्येष्ठ नागरिकांचाच नाही तर औषध घ्यायला विसरणाऱ्या प्रत्येकाचं मित्र बनू शकतं. त्यामुळे मोठ्यांना स्मार्टफोनमध्ये हे ॲप नक्की डाउनलोड करून द्या. औषधांचे फोटो टाका. त्यामुळे सगळी माहिती वेळच्या वेळी मिळेल आणि ते निरोगी राहतील.

## प्रथिनं आहेत महत्त्वाची

प्रथिनं हा आपल्या आहारातला खूप महत्त्वाचा घटक. वाढत्या वयाच्या मुलांनी तर प्रथिनं खायला हवी. दूध, अंडी, मासे, चिकन, विविध फळं, धान्य आणि भाज्यामधून ही प्रथिनं मिळत असतात. अर्थात त्यांचंही एक प्रमाण आहे.

४ ते ८ या वयोगटातल्याला मुलांनी १९ ग्रॅम प्रथिनं खायला हवी. ९ ते १३ वर्षांच्या मुलांनी ३४ ग्रॅम प्रथिनं खाणं गरजेचं आहे. १४ ते १८ या वयात मुलांनी ५२ ग्रॅम तर मुलांनी ४६ ग्रॅम प्रथिनं घ्यायला हवी.



प्रथिनांची गरज भागवण्यासाठी दिवसातून दोन वेळा संतुलित आहार घ्या. जेवणात पोळी, भाजी, आमटी, भात, ताक, कोशिंबिर असे पदार्थ खा. पिझ्झा, बर्गर, वेफर्स, फ्रेंच फ्राईजसारखं जंक फूड टाळा. चीजमध्ये प्रथिनं असल्याने ते खाता येईल. तसंच मधल्या वेळेत चणे, दाणे, सुकामेवा खा. दाण्यांमधूनही भरपूर प्रथिनं मिळतात. डाळी हा प्रथिनांचा मुख्य स्रोत आहे. रोज सकाळी आणि संध्याकाळी दूध प्या. अंडी आवडत असतील तर तीही खाता येतील. प्रथिनांची गरज भागवण्यासाठी बरेच जण प्रोटिन शेक पितात. प्रोटिन पावडरचा वापर केला जातो. पण शक्यतो हे टाळा. वाढत्या वयात जास्त प्रथिनयुक्त घटक खाल्ल्याने पुढे त्रास होऊ शकतो. त्यामुळे प्रथिनं चांगली म्हणून ती भरपूर प्रमाणात खाऊ नका.

**हेल्थ वेल्थ**

## फ्रुटी टोफू स्मूदी

उन्हाळा सुरू झाला आहे. त्यातच मुलांच्या परीक्षा तोंडावर आहेत. अशा वेळी काहीतरी हेल्दी खायला हवं. ‘फ्रुटी टोफू स्मूदी’ हा खूप चांगला आणि झटपट होणारा ऑप्शन आहे. यासाठी पाउण कप ॲपल ज्यूस, अर्धा कप मऊ टोफू, एक कप ताज्या बेरी, एक केळं, फ्रूट फ्लेवर्ड योगर्ट, एक चमचा मध आणि चार बर्फाचे तुकडे हे साहित्य घ्या. ॲपल ज्यूस, केळं, बेरी, मध आणि टोफू हे सगळं साहित्य ज्यूसरच्या भांड्यात घाला. नीट फिरवून घ्या. या भांड्यात बर्फाचे तुकडे घालून पुन्हा फिरवून घ्या. टोफू स्मूदी तयार. ग्लासमध्ये ओता. गारेगार प्या.




## जपा तुमचा पीसी

ऑनलाईन सर्फिंग करताना आपण वेगवेगळ्या साईट्सचा वापर करतो. मात्र यातल्या काही साईट्स कॉम्प्युटरसाठी धोकादायक ठरू शकतात. या साईट्समधून कॉम्प्युटरमध्ये व्हायरस घुसू शकतो. त्यामुळे आपला पीसी सुरक्षित कसं ठेवायचा याची माहिती असायला हवी.

✻ पीसीमध्ये विंडोज १० असेल तर त्यात विंडोज डिफेंडरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे व्हायरस आणि मालवेअरपासून पीसी सुरक्षित राहतो. फक्त विंडोज डिफेंडरचं काम नीट सुरू आहे ना, हे बघून घ्या.

✻ विंडोज १० मध्ये येणाऱ्या ॲप्समध्ये सिक्युरिटी पॅच असतात. हे पॅच आपल्या सिस्टिमधल्या सगळ्या फीचर्सवर लक्ष ठेवतात. त्यामुळे तुमच्या पीसीमधली सगळी अपडेट्स सतत तपासत रहा.




✻ कॉम्प्युटरमधल्या डेटाची बॅकअप फाईल बनवून ठेवणं गरजेचं आहे. यातला डाटा पेन ड्राईव्ह किंवा हार्ड डिस्कमध्ये जपून ठेवा.

✻ व्हायरसचे वेगवेगळे प्रकार असतात. ई मेलमधल्या लिंकमधून असे व्हायरस पाठवले जातात. त्यामुळे अनोळखी लिंक ओपन करू नका.

**स्मार्ट टिप्स**

✻ फाईल डाउनलोड करण्याआधी संबंधित वेबसाईट तपासून घ्या. एखाद्या फाईलमधून व्हायरस किंवा मालवेअर पीसीमध्ये प्रवेश करतात. त्यामुळे ही फाईल कुठून डाउनलोड झाली आहे ते तपासून बघा.

## निलगिरी पर्वतरांग

निलगिरी पर्वतरांग ही भारतातील एक महत्त्वाची आणि निसर्गसंपन्न पर्वतरांग आहे. ती दक्षिण भारतातील तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटक या तीन राज्यांमध्ये पसरलेली आहे. नील म्हणजे निळा आणि गिरी म्हणजे पर्वत. दुरून पाहिल्यावर या पर्वतरांगांवर पसरलेल्या निळसर धुक्यामुळे आणि निलगिरीच्या झाडांमुळे या पर्वतांवर निळसर छटा उमटलेली दिसते.म्हणून त्यांना निलगिरी पर्वत असे नाव पडले. निलगिरी पर्वतरांग पश्चिम घाटाचा भाग आहे. येथील हवामान थंड आणि आल्हाददायक असते. त्यामुळे ब्रिटिश काळात हे ठिकाण उन्हाळी राजधानी म्हणून वापरले जात होते. उटी, कुन्नूर आणि कोटागिरी ही येथील प्रसिद्ध ठिकाणे आहेत. निलगिरी पर्वतरांगांमध्ये अनेक नद्या उगम पावतात. भवानी, काबिनी आणि मयार या नद्यांचे उगम या भागात आहेत. या नद्या शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी खूप उपयुक्त आहेत. या पर्वतरांगेमुळे इथल्या परिसरात पाऊस चांगल्या प्रमाणात पडतो आणि हिरवेगार जंगले तयार झाली आहेत. या पर्वतरांगांमध्ये घनदाट जंगले, गवताळ प्रदेश आणि चहाच्या मळ्यांचे सुंदर दृश्य दिसते. चहा, कॉफी आणि मसाल्यांच्या लागवडीसाठी हा प्रदेश प्रसिद्ध आहे. निलगिरी पर्वतरांगांमध्ये हत्ती, वाघ, चित्ता, हरिण, माकडे, विविध पक्षी आणि दुर्मिळ प्राणी आढळतात. त्यामुळे हा भाग जैवविविधतेने समृद्ध मानला जातो.



निलगिरी पर्वतरांगांमध्ये राहणाऱ्या काही आदिवासी जमातीही महत्त्वाच्या आहेत. टोडा, कोटा, कुरुंबा आणि इरुला या जमाती येथे पारंपरिक जीवन जगतात. त्यांच्या संस्कृती, घरे आणि रीतिरिवाज वेगळे आणि अभ्यासनीय आहेत.

निलगिरी पर्वतरांगांना ऐतिहासिक महत्त्वही आहे. ब्रिटिश काळात बांधलेली रस्ते व्यवस्था आणि निलगिरी माउंटन रेल्वे ही येथील खास ओळख आहे. ही रेल्वे आजही चालू असून जागतिक वारसा म्हणून ओळखली जाते. निसर्गसौंदर्य, थंड हवामान, घनदाट जंगले आणि समृद्ध संस्कृती यामुळे निलगिरी पर्वतरांग भारतातील एक अत्यंत महत्त्वाची आणि आकर्षक पर्वतरांग मानली जाते.

## धोके स्वस्तातल्या हेडफोनचे

चांगल्या दर्जाचे हेडफोन घ्यायचे तर थोडे जास्त पैसे खर्च करावे लागतात. त्यातच मुलं हेडफोन लवकर खराब करता म्हणून स्वस्तातले हेडफोन आणून घेतले जातात. पण रस्त्यावर मिळणाऱ्या स्वस्तातल्या हेडफोनमुळे ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

✻ स्वस्तातल्या हेडफोनमधून आवाज स्पष्ट ऐकू येत नाही. नीट ऐकू यावं म्हणून तुम्ही फोनचा आवाज वाढवता. यामुळे कानाच्या पड्यांना त्रास होतो. सततच्या मोठ्या आवाजामुळे ऐकण्याची क्षमता कमी होते. हळूहळू तुम्ही बहिरे होऊ लागता.

✻ अशा हेडफोनमध्ये गाण्याचा आवाज कमी-जास्त होत राहतो. ८५ डेसिबलपर्यंत ऐकण्याची आपल्या कानांची क्षमता असते. पण या हेडफोन्सचा आवाज ११५ डेसिबलपर्यंतही पोहचू शकतो. म्हणूनच एवढ्या मोठ्या आवाजात दररोज पंधरा मिनिटं गाणी ऐकली तरी कानांवर वाईट परिणाम होऊ शकतो.

**बी केअरफुल**

✻ स्वस्तातले इयरफोन बनवण्यासाठी दर्जेदार वस्तूंचा वापर केला जात नाही. असे हेडफोन कानांमध्ये नीट बसत नाहीत. ते कानांमध्ये दाबून बसवावे लागतात. त्यातच या हेडफोनमधून मोठा आवाज येत असल्याने तुमच्या ऐकण्याचा क्षमतेवर वाईट परिणाम होतो. त्यामुळे स्मार्टफोनसोबत आलेले चांगल्या दर्जाचे हेडफोन खराब होऊ देऊ नका. ते खराब झाल्यावर चांगल्या दर्जाचेच हेडफोन वापरा.



## मजबुतीसाठी कोबाल्ट

कोबाल्ट हा एक महत्त्वाचा खनिज धातू आहे. तो निसर्गात शुद्ध स्वरूपात फार कमी प्रमाणात आढळतो. बहुतेक वेळा तो तांबे, निकेल आणि लोखंड यांच्यासोबत खडकांमध्ये मिसळलेला असतो. पृथ्वीच्या पोटात खोलवर असलेल्या खाणींतून कोबाल्ट काढला जातो. कोबाल्टचे मोठे साठे आफ्रिकेतील काँगो देशात आढळतात. याशिवाय ऑस्ट्रेलिया, कॅनडा, रशिया आणि काही आशियाई देशांमध्येही कोबाल्ट सापडतो. भारतात कोबाल्ट फार कमी प्रमाणात मिळतो आणि तो बहुतेक वेळा इतर धातूंमधून वेगळा केला जातो. कोबाल्ट मिळवण्यासाठी खाणीतील खडक आधी फोडले जातात. नंतर त्यावर विविध रासायनिक प्रक्रिया केल्या जातात.



या प्रक्रियेमध्ये कोबाल्ट इतर धातूंमधून वेगळा केला जातो आणि शुद्ध स्वरूपात मिळवला जातो. ही प्रक्रिया वेळखाऊ तर आहेच शिवाय ती अत्यंत काळजीपूर्वक करावी लागते. कोबाल्ट हे नाव एका जुन्या युरोपियन शब्दावरून पडले आहे. जर्मन भाषेत कोबोल्ड या शब्दाचा अर्थ खोडकर भूत असा होतो. पूर्वी खाणीत काम करणाऱ्या लोकांना वाटायचे की हा धातू त्यांची फसवणूक करतो आहे, कारण तो दिसायला उपयोगी वाटायचा पण प्रत्यक्षात मात्र त्याचा फार उपयोग होत नसे. त्यामुळे त्या धातुला कोबोल्ड म्हणू लागले. त्याचेच पुढे कोबाल्ट बनले. आधुनिक काळात कोबाल्ट अत्यंत महत्त्वाचा खनिजधातू आहे. आजच्या काळात वापरल्या जाणाऱ्या पुनर्भरण (रिचार्ज) करता येणाऱ्या बॅटऱ्यांमध्ये कोबाल्ट मोठ्या प्रमाणात वापरला जातो. मोबाइल, संगणक, इलेक्ट्रिक वाहनं यामध्ये वापरल्या जाणाऱ्या बॅटऱ्या कोबाल्टमुळे जास्त काळ टिकतात आणि सुरक्षित राहतात. तसेच कोबाल्टचा वापर मजबूत मिश्रधातू बनवण्यासाठी केला जातो. हे मिश्रधातू उष्णतेला सहन करू शकतात म्हणून त्यांचा वापर विमानं, यंत्रसामग्री आणि अवजड उद्योगांमध्ये होतो. कोबाल्टपासून निळा रंग तयार होतो. त्यामुळे काच आणि मातीच्या भांड्यांना निळा रंग देण्यासाठी कोबाल्ट वापरला जातो. काही औषधांमध्येही कोबाल्टचा उपयोग होतो. परंतु तो मानवी शरीरासाठी अतिशय कमी प्रमाणात आवश्यक असतो. कोबाल्टचा अति वापर किंवा चुकीच्या पद्धतीने उत्खनन केल्यास पर्यावरणाचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे आज शास्त्रज्ञ कोबाल्टचा पुनर्वापर करण्यावर आणि त्याला पर्यायी पदार्थ शोधण्यावर भर देत आहेत. कोबाल्ट हा धातू आधुनिक जगासाठी खूप उपयुक्त आहे. योग्य वापर आणि काळजी घेतली तर तो मानवाच्या प्रगतीत मोठी मदत करू शकतो.

**खनिजांची माहिती**

